नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## नूहमध्ये २४ तासांसाठी इंटरनेट बंद

■ वृत्तसंस्था, नूह, दि. १३ :

हरियाणातील नूह (मेवात) येथे होणाऱ्या ब्रजमंडल यात्रेच्या पार्श्वभूमीवर इंटरनेट बंद करण्यात आले आहे. या काळात बल्क एसएमएस सेवा देखील बंद राहतील. हा आदेश १३ जुलै रोजी रात्री ९ ते १४ जुलै रोजी रात्री ९ वाजेपर्यंत २४ तासांसाठी लागू असेल. तथापि, या काळात बँकिंग आणि मोबाईल रिचार्जशी संबंधित एसएमएस सुविधा पूर्वीप्रमाणेच सुरू राहतील. गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या मते, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी हे आदेश देण्यात आले आहेत. २०२३ मध्ये ब्रजमंडल यात्रेदरम्यान नूहमध्ये हिंसाचार झाला होता. ज्यामध्ये काही लोकांचा मृत्यूही झाला होता.

* वर्ष ५२ * अंक १४ * * अकोला * | सोमवार, दिनांक १४ जुलै २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

### लग्न सोहळ्याचाही वाढदिवस

भारतात भारताचे भारताला चालवणारे दोन उद्योगपती आहेत. त्यापैकी एक मुकेश अंबानी सुद्धा आहेत. आपल्या बलदंड मुलाला पती बनवण्यासाठी त्यांना एक नाजूक सून हवी होती. ती राधिकेच्या रूपाने त्यांना मिळाली. कोणत्याही आई बापाला आपल्या मुलाचा विवाह उत्तम प्रकारे व्हावा असे वाटणे स्वाभाविक आहे. पण या विवाह सोहळ्याचे जे अवडंबर माजवले गेले आहे. ते म्हणजे आपल्याकडच्या अफाट संपत्तीमुळे मिळवलेल्या ऐश्वर्याचे आणि त्या संपत्तीचे प्रदर्शन आहे असे सर्वजण म्हणतात. कारण तेव्हा जागतिक कीर्तीच्या प्रतिष्ठितांना आमंत्रित करण्याचे बरेच कार्यक्रम संपन्न झाले. विशेष म्हणजे त्यांनीच या लग्न सोहळ्यास 'भारताचा प्रतिष्ठित लग्न सोहळा' असे नामकरण केलेले आहे. भारतातील इतर महा श्रीमंतांचे लग्न सोहळे प्रतिष्ठित असतात की नाही हे आम्हाला ठाऊक नाही, पण सर्वसामान्य जनतेचे सोहळे प्रतिष्ठित नसतात असे अंबानी कुटुंबाला वाटले आहे काय. राम मंदिराचे लोकार्पण झाले त्यापेक्षाही हा लग्न सोहळा सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि जागतिक पर्वणीचा ठरला. लग्न सोहळ्याची प्रतिष्ठा भव्य दिव्य गोष्टींचे प्रदर्शन आणि त्यासाठी केलेल्या खर्चावर अवलंबून होती यात संशयच नाही. लग्न सोहळ्यात ज्या ज्या विधी करण्यात येतात. त्या प्रत्येक विधी म्हणजे त्या तरुण जोडप्याने भारतीय परंपरांचा सन्मान उंचावला आहे असे म्हटले गेले. आजच्या या लग्न सोहळ्याच्या वाढदिवशी अंबानी कुटुंब म्हणते की, परंपरांचा सन्मान केवळ दाखवण्यापुरता नव्हता तर ती आम्ही मनापासून केलेली कृती होती. आता तुम्ही विचार करा आणि सांगा की, लग्न सोहळा करताना इतरांचे जे जे विधी होतात ते केवळ दाखवण्याकरता होतात असे या जागतिक श्रीमंतांना वाटते काय. या जोडप्याने धर्म आणि भक्तीच्या भक्कम पायावर उभे राहून आपला जीवन प्रवास करण्यास एकत्र सुरुवात केली आहे. लग्न झाल्यावर नवरदेव आणि नवरी यांची जी काही सुरुवात होते ती एकत्रच होते. कोट्यावधी रुपये खर्च करून या लग्न सोहळ्याचे जे बटबटीत आणि झगमगीत प्रदर्शन झाले होते, त्याला आपण सांस्कृतिक सोहळा म्हणावा आणि हे लग्न इतिहास घडवणारे ठरले असे म्हणावे अशी अंबानी कुटुंबाची अपेक्षा होती. ती त्यांनी दाखवून दिली त्यासोबतच लग्नाच्या निमित्ताने त्यावेळी सातत्याने पुढे पुढे धावणारे जग थांबून गेले होते असे तेच म्हणतात. मेहंदी, मामेरू, हळदीपासून संगीत ते शुभविवाहा पर्यंतच्या सगळ्या विधी मनापासून आणि प्रामाणिकपणे प्रत्येक विधी विधिपतपणे साजरा केला. म्हणजे भारतातील तमाम हिंदूंची लग्न मनापासून आणि प्रामाणिकपणे होत नाहीत असे कदाचित त्यांना म्हणावयाचे असेल सुद्धा. बरं या लग्नसोहळ्यात अनंत शक्ती असलेल्या अनंताची आई नीताबाई यांनी The Valley of God हे नृत्य सादर केले होते, त्याला त्यांनी कलेच्या माध्यमातून केलेले अभिवादन म्हटले. सर्वांच्याच लग्नाचे विधी भारतात तरी अग्नी आणि ज्येष्ठांच्या सानिध्यातच पार पडतात, पण हा सोहळा श्रीमंतीचे भयंकर प्रदर्शन दाखवीत अत्यंत दिमाखाने पार पडला. लग्नानंतर वधू-वरांना भेटण्यासाठी भारतातील एकूण एक महाश्रीमंत फार्फार तर एक किंवा दोन रिसेप्शन म्हणजे स्वागत समारंभ आयोजित करतात. या ठिकाणी विशिष्ट लोकांसाठी वेगळे, कर्मचाऱ्यांसाठी वेगळे, मोठमोठे असे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सेलिब्रेटी आणि बिग टायकूनसाठी वेगळे अशा प्रकारच्या रिसेप्शनचे म्हणजे स्वागत समारंभाचे नियोजन झाल्याची प्रचंड मोठ्या प्रमाणात चर्चा आहे. हा लग्न सोहळा आणि त्या लग्न सोहळ्यामधील सर्व विधिवत कार्यक्रम परंपरांमध्ये घट्ट रुजलेले होते असे अंबानी कुटुंबीय म्हणतात. त्यांनी या सोहळ्यात बनारसला न जाताही बनारस अक्षरशा तिथेच जिवंत केले होते. सोहळ्यासाठी सर्व पक्षाचे बडे बडे नेते त्याचप्रमाणे बडे बडे अभिनेते व अभिनेत्र्या तसेच आपल्या पत्नी किंवा मैत्रिणींसह सर्व बडे बडे खेळाडू यांनी जातीने आपली उपस्थिती दाखवली आणि त्यासोबत थोडीशी कलाही दाखवली?. केवळ इतकेच नाही तर धार्मिक क्षेत्रातील बडे बडे संत महंत त्यामध्ये स्वामी सदानंद सरस्वती, स्वामी अमुक्तेश्वरानंद, गौरांगदास प्रभू, राधानाथ स्वामी, गौतमभाई ओजा, बाबा रामदेव, स्वामी अवदेशानंद गिरी महाराज साध्वी ऋतुंबरा आणि इतर शेकडो प्रसिद्ध संत महंत या लग्न सोहळ्याला उपस्थित होते. अनेक मुख्यमंत्री भारतातील शेकडाभर मंत्री, बहुसंख्य केंद्रीय मंत्री, आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या देशाचे महामंत्री माननीय नरेंद्र मोदीजी यांनीही आपली उपस्थिती या जागतिक कीर्तीच्या लग्नाला लावली होती. हा सोहळा येथे अनेक पिढ्यांना प्रोत्साहन देईल असा होता, असे अंबानी कुटुंबाचे म्हणणे आहे. या कुटुंबाने लग्नाआधी ५० गरीब गरजू विवाह इच्छुक जोडप्यांचा लग्न सोहळा आयोजित केलेला होता. हे आतापर्यंत चाळीस-पन्नास वेळा त्यांनी मोठ्या दिमाखात सांगितलेले आहे. पण त्यांच्या गुजरात मध्येच एक हिऱ्यांचा व्यापारी दरवर्षी अशा प्रकारे सामूहिक लग्नाचा भव्य दिव्य सोहळा पार पाडतो आणि प्रत्येकाला इतकी सप्रेम भेट देतो की, त्यापुढे अंबानी यांचा अनंताच्या लग्नापूर्वीचा आयोजित सामूहिक लग्न सोहळा अत्यंत तुच्छ वाटावा. आता या विवाह सोहळ्याच्या निमित्ताने यावर्षी त्याचा वाढदिवस साजरा झाला. दरवर्षी त्यांनी असाच वाढदिवस साजरा करून त्या गुजरात राज्यातील हिरे व्यापाऱ्यांप्रमाणे त्यांच्याहून जास्त जोडप्यांचे सामूहिक विवाह पार पाडावे, एवढीच आमची साधी अपेक्षा आहे. वर्षभरापूर्वीचे वरवधू अनंत सुखे भोगत राहोत, ही आमची मनापासूनची शुभकामना आहेच.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## मालगाडी रुळावरून घसरली
# ५ डब्यांना आग



■ वृत्तसंस्था, तिरुवल्लूर, दि. १३ :

मनालीहून कर्नाटकला जाणारी डिझेल मालगाडी जोलारपेटमार्गे तामिळनाडूतील तिरुवल्लूर रेल्वे स्थानकाजवळ रुळावरून घसरली. त्यानंतर तिला आग लागली. सुरुवातीला पाच बोग्यांना आग लागली. रविवारी पहाटे ५.३० वाजता ही घटना घडली. मालगाडीत ५२ बोगी होत्या.

जिल्हाधिकारी एम प्रताप यांनी सांगितले की, जळत्या ट्रेनपासून ४० डबे वेगळे करण्यात आले आहेत. त्याच वेळी, रेल्वे स्थानकाभोवती राहणाऱ्या लोकांना बाहेर काढून सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले. जवळपासची शहरे आणि जिल्ह्यांमधूनही अग्निशमन दलाच्या पथकांना पाचारण केले जात आहे. आग जवळजवळ आटोक्यात आली आहे. या रेल्वे अपघातामुळे, डॉ. एमजीआर चेन्नई सेंट्रल स्टेशनवरून निघणाऱ्या अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या किंवा त्यावर परिणाम झाला.

दक्षिण रेल्वेने एका निवेदनात म्हटले आहे की, तिरुवल्लूरजवळ आगीच्या घटनेमुळे, सुरक्षिततेच्या उपाय म्हणून ओव्हरहेड वीज बंद करण्यात आली आहे. यामुळे, रेल्वेच्या वेळा बदलण्यात आल्या आहेत.

प्रवाशांना प्रवास करण्यापूर्वी नवीनतम अपडेट्स तपासण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

## महाराष्ट्रात सर्वोत्तम सायबर न्यायसहायक प्रयोगशाळा

### प्रयोगशाळा बळकटीसाठी लोकाभिमुख पद्धतीचा अवलंब : मुख्यमंत्री

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

महाराष्ट्रात देशातील सर्वात अत्याधुनिक सायबर न्यायसहायक वैज्ञानिक व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. आधुनिक सायबर प्रयोगशाळांसह मोबाईल न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा उभारल्या जात आहेत. तंत्रज्ञान, सायबर आणि फसवणुकीचे वाढते गुन्हे लक्षात घेता येत्या काळात लोकाभिमुख व ब्लॉकचेन पद्धतीचा अवलंब करुन न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांची व्यवस्था अधिक मजबूत करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.



येथील धंतोली परिसरात प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन आणि गृह विभागाच्या तीन नवीन प्रकल्पांचे ऑनलाईन लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार संदीप जोशी आणि संजय मेश्राम, महासंचालक (न्यायिक व तांत्रिक) संजय वर्मा, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक अर्चना त्यागी आणि न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाचे संचालक डॉ. विजय ठाकरे यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गुन्ह्यांची सिद्धता होऊन गुन्हेगारास शासन व पिडीतांना न्याय मिळवून देण्यासाठी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांची भूमिका महत्त्वाची ठरते. नवीन भारतीय फौजदारी कायद्यांनी न्यायसहायक पुराव्यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे तसेच विवक्षित गुन्ह्यांमध्येही यास अनिवार्यता प्राप्त झाली आहे. राज्यात गुन्हे सिद्धतेचे प्रमाण वाढविण्यासाठी २०१४ नंतर विशेष प्रयत्न झाले असून वैविध्यपूर्ण पद्धतीचा अवलंब, तांत्रिक पुरावे आणि न्यायसहायक वैज्ञानिक पुराव्यांवर भर देण्यात आला व १४ शासन निर्णय काढून गुन्हे सिद्धतेचे प्रमाण ९ वरुन ५४ टक्क्यांवर आणले. विकसित भारताच्या दिशेने मार्गक्रमण करतांना गुन्हे सिद्धतेचे हे प्रमाण ९० टक्क्यांपुढे घेऊन जावे लागेल, असेही त्यांनी सांगितले. राज्यात आधुनिक सायबर न्यायसहायक प्रयोगशाळा, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, मोबाईल न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा आणि नवी मुंबई येथे सायबर केंद्र उभारुन त्याचे महामंडळात रुपांतर करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. नागपूर येथील प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा ही अत्याधुनिक करण्याच्या दिशेने पावले टाकण्यात आली. फेब्रुवारी २०२७ पर्यंत या इमारतीचे बांधकाम पूर्ण व्हावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## अजित पवारांकडून स्वबळाचे संकेत

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. १३ :



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची पुणे जिल्ह्याची आढावा बैठक उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थित पार पडली. या बैठकीत अजित पवार यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना कामाला लागण्याचे आदेश दिले आहेत. निवडणुकीचा जो निर्णय होईल तो होईल, मात्र प्रत्येक प्रभागात तयारी करा. पुण्यात आपल्याकडे संख्या फार चांगले आहे. त्यामुळे प्रत्येक प्रभागापर्यंत पक्ष पोहोचवून नोंदणी करण्याचे आदेश अजित पवार यांनी दिले आहेत. यासंदर्भात आपण ऑगस्ट महिन्यात आढावा घेणार असून नवीन शहराध्यक्षांना कार्यकारिणी तयार करण्याच्या सूचना देखील अजित पवार यांनी केल्या आहेत.

सर्वच राजकीय पक्षांनी आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. या निवडणुकीमध्ये महायुती एकत्र लढणार असल्याचे स्पष्ट करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तसे संकेतही दिले आहेत.

## जिल्हा परिषद शाळेतच मुख्याध्यापकाचे मद्यपान

■ महासागर प्रतिनिधी
परभणी, दि. १३ :

शाळेला आपण विद्येचे मंदिर म्हणतो, पण याच मंदिराला अपवित्र करण्याचे काम परभणी जिल्ह्यातील एका मुख्याध्यापकाने केले आहे. जिल्हा परिषदेचा मुख्याध्यापक शाळेतच मद्यपान करताना पालकांनी रंगेहात पकडले असून विद्यार्थी व पालकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. परभणी जिल्ह्यातील गंगाखेडमधील खोकलेवाडी येथील शाळेतील ही घटना आहे.

खोकलेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकाने शाळेतच मद्यपान केल्याची घटना समोर आली आहे. विद्यार्थ्यांच्या पालकांनीच या मुख्याध्यापकाला रंगेहात पकडले आहे. या घटनेची माहिती पुराव्यासह शिक्षण विभागाला पालकांनी दिली असून या मुख्याध्यापकाची तात्काळ बदली करण्याची मागणी पालकांनी केली.

## मध्य प्रदेशात पावसामुळे ५ जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १३ :

मध्य प्रदेशात मुसळधार पावसामुळे रेवा, सतना आणि छतरपूरसह ५ जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती आहे. खजुराहोमध्ये ९ तासांत ६.३ इंच पाऊस पडला. छतरपूरच्या नौगावमध्ये ३.४ इंच पाऊस पडला. चित्रकूटमध्ये बोटीद्वारे लोकांना वाचवण्यात आले. येथे बनसागर धरणाचे ७ दरवाजे उघडण्यात आले. बर्गी धरणाचे ५ दरवाजे उघडण्यात आले आहेत.

झारखंडमधील सरायकेला-खरसावन आणि लोहारदगा जिल्ह्यात वीज पडून दोन जणांचा मृत्यू झाला. एक जण भाजला. हे सर्वजण शेतात काम करून घरी परतत होते. आज राज्यात पावसाचा इशारा देण्यात आला आहे. बिहारमध्ये शनिवारी फक्त रोहतासमध्ये पाऊस पडला, जिथे वीज पडून एका महिलेचा मृत्यू झाला. शनिवारी राजस्थानमधील झालावाड, धोलपूर, करौली आणि अलवर येथे मुसळधार पाऊस पडला. झालावाडमध्ये ४ इंचापेक्षा जास्त पाणी साचले. यादरम्यान तीन मुले बुडाली, दोघांचे मृतदेह सापडले आहेत, तर एकाचा शोध सुरू आहे.

## मिनी बसची उभ्या ट्रकला धडक
# ४ जणांचा मृत्यू, १० जखमी

■ वृत्तसंस्था, कोटा, दि. १३ :

रविवारी सकाळी कोटा येथील दिल्ली-मुंबई एक्सप्रेस वेवर एका मिनीबसची उभ्या असलेल्या ट्रकला धडक झाली. या अपघातात एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला, तर १० हून अधिक लोक जखमी झाले. रविवारी पहाटे ५ वाजता बुधादित परिसरात (कोटा ग्रामीण) हा अपघात झाला. सर्व मृत करौलीचे रहिवासी होते.

ग्रामीण पोलिस अधीक्षक सुजीत शंकर म्हणाले- सकाळी दिल्ली-मुंबई एक्सप्रेस वेवरील चंबळ पुलावर उभ्या असलेल्या ट्रकला मागून एक मिनी बस (ट्रॅव्हलर) धडकली. अपघात पाहता असे दिसते की मिनी बसचा वेग खूप जास्त होता. मिनी बसमध्ये प्रवास करणारे सुरेश सोनी (४५), ब्रजेश सोनी (४५), गीता सोनी (६३) आणि अनिल सोनी (४८) हे जागीच ठार झाले. हे लोक करौलीच्या सीताबारी भागातील रहिवासी होते. अनिल आणि ब्रजेश हे सख्खे भाऊ होते. त्यांची आई गीता होती. सुरेश हे गीता यांचे जावई होते. अनिल आणि ब्रजेश ज्वेलर्स होते. सुरेश हे सरकारी शिक्षक होते. ते भरतपूरमध्ये तैनात होते.

रविवारी सकाळी कोटा येथील दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवेवरील चंबळ पुलावर झालेल्या अपघातात एका मिनी बसचे मोठे नुकसान झाले. रविवारी सकाळी कोटा येथील दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवेवरील चंबळ पुलावर झालेल्या अपघातात एका मिनी बसचे मोठे नुकसान झाले. माहिती मिळताच बुधादीत पोलीस घटनास्थळी पोहोचले. सर्व जखमींना कोटाच्या एमबीएस रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## कायदेतज्ञ उज्ज्वल निकम यांची राज्यसभेवर निवड

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :

ज्येष्ठ सरकारी वकील उज्ज्वल निकम यांची नियुक्ती आता राज्यसभेवर करण्यात आली आहे. राष्ट्रपती नामनिर्देशित सदस्य म्हणून ते आता संसदेचे वरीष्ठ सभागृह असलेल्या राज्यसभेचे सदस्य असतील. या संदर्भातले वृत्त आल्यानंतर निकम यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांचे आभार मानले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठी भाषेत बोलू की, हिंदी भाषेत बोलू, असा प्रश्न आपल्याला विचारला होता, असे देखील त्यांनी सांगितले. या वेळी मी त्यांना तुम्हाला दोन्ही भाषा उत्कृष्ट येत असल्याचे म्हटले.




## विषारी वायू गळतीमुळे शेतकऱ्याचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि. १३ :

विहिरीतील पाण्यात बुडालेला विद्युत मोटर पंप बाहेर काढण्यासाठी विहिरीत उतरलेल्या एका तरुण शेतकऱ्याचा विहिरीतील विषारी वायू गळतीमुळे मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. लाखनी तालुक्यातील पालांदूर येथील मऱ्हेगाव मार्गावरील शेत शिवारात रविवारी (दि.१३) सकाळी ६.३० वाजताच्या सुमारास घडली. छगन बाळकृष्ण गोटेफोडे (वय ४२ वर्ष)असे मृत तरुण शेतकऱ्याचे नाव आहे. या बाबत मिळालेल्या माहितीनुसार, पालांदूर येथील नरेश देवराम तलमले यांनी भाड्याने केलेल्या अंताराम गायधने यांच्या मालकीच्या शेतातील विहिरीत खाली उतरून मोटरपंप खोलत असताना त्यास गुदमरल्यासारखे वाटल्याने त्याने वर चढण्याचा प्रयत्न केला व वर चढत असतानाच अचानक तसाच तो विहिरीत पडून विषारी वायुने गुदमरून मरण पावला. अशा प्रकारची फिर्याद मृतकाचा मोठा भाऊ गोविंदा बाळकृष्ण गोटेफोडे याने दिली आहे. घटनेच्या वेळी परिसरातील लोक धावून आले.

# संजय जगताप यांचा काँग्रेस जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा



**जेजुरी :** पुरंदर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संजय जगताप यांनी जिल्हाध्यक्षपदाचा आणि काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचाही राजीनामा दिला आहे. कोणत्या पक्षात प्रवेश करणार आहे, हे त्यांनी अद्याप स्पष्ट केलेले नाही.जगताप यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या कार्यालयाकडे ई-मेलद्वारेराजीनामा पाठवला असून, काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष संग्राम मोहोळ यांच्याकडे राजीनामा पत्र दिले आहे. वैयक्तिक कारणामुळे राजीनामा देत असल्याचे जगताप यांनी राजीनामा पत्रात नमूद केले आहे.

पुरंदर विधानसभा मतदारसंघात २००९ आणि २०१४ या सलग दोन निवडणुकांमध्ये विजय शिवतारे निवडून आले होते. मात्र, २०१९ च्या निवडणुकीत संजय जगताप यांनी त्यांचा पराभव केला. २०२४ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने संभाजी झेंडे यांना उमेदवारी दिली. झेंडे यांनी ४७ हजार मते घेतल्याने मतांच्या विभाजनाचा फटका जगताप यांना बसला. शिवसेनेचे (शिंदे) शिवतारे विजयी झाले. तेव्हापासून जगताप नाराज होते. ते काँग्रेसमधून बाहेर पडणार असल्याची चर्चा होती.

## रस्ता अडवल्यास थेट ३५३ नुसार गुन्हे दाखल करा, त्यांना उचला : अजित पवार



**पिंपरी च्चिंचवड :** आयटी हब हिंजवडीमध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचा दौरा करत आहेत. हिंजवडीमध्ये अनेक विकास काम सुरू आहेत. वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी अनेक ठिकाणी रस्ता करण्यात येत आहे. विप्रो कंपनीच्या शेजारी रस्त्यावरून अजित पवारांनी थेट रस्ता अडवणाऱ्याला इशारा दिला आहे.रस्ता अडवणाऱ्यावर सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी ३५३ कलमानुसार गुन्हे दाखल करा, त्यांना उचला. असा आदेश अजित पवारांनी पोलीस प्रशासनाला दिला. ज्या व्यक्तींची जागा आहे. त्या व्यक्तींना योग्य मोबदला दिला जाईल, असेही त्यांनी यावेळी अधोरेखित केलं. हिंजवडीमध्ये अनेक ठिकाणी मेट्रो आणि पीएमआरडीच ढिसाळ नियोजन पाहण्यास मिळालं. क्रोमा चौक येथे मेट्रो स्टेशनचा सरकता जिना चुकीच्या पद्धतीने उभारल्याचं अजित पवारांना काही जणांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर तात्काळ त्या ठिकाणी योग्य ती उपाययोजना करून वाहतूक कोंडी होणार नाही. यासाठी उपाय योजना करण्याचे पीएमआरडी आणि मेट्रो प्रशासनाला सांगितलं. त्या चौकातून दररोज लाखो आयटी अभियंते नोकरीला जातात.

## कांजूरमार्ग येथे बहुमजली इमारतीत भीषण आग



**मुंबई :** कांजूरमार्ग येथील आर. देशमुख मार्गावरील गांधी मार्केटजवळ असलेल्या एन. जी रॉयल पार्क इमारतीला रविवारी सकाळी साडे अकराच्या सुमारास भीषण आग लागली. सुदैवाने या आगीत कोणीही जखमी झाले नाही. सद्यस्थितीत अग्निशमन दलातर्फे आग विझविण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. एन. जी रॉयल पार्क या २० मजली इमारतीच्या १६ ते १८ व्या मजल्यादरम्यान आग पसरली.विद्युत वाहिन्यांमध्ये आग पसरल्याचे लक्षात रहिवाशांनी तात्काळ इमारतीबाहेर पळ काढला. तसेच, दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी मदतकार्य हाती घेतले. आगीमुळे इमारतीत प्रचंड धूर निर्माण झाल्याने अग्निशमन दलाच्या जवानांना आग विझविण्यात अडचणींचा सामना करावा लागत आहे. अग्निशमन दलाचे ३ फायर इंजिन आणि अन्य अद्ययावत यंत्रे कार्यान्वित करण्यात आली आहे. आगीची तीव्रता लक्षात घेऊन अग्निशमन दलाने दुपारी १२ वाजून १० मिनिटांनी आग भीषण स्वरूपाची (क्रमांक - १ ची वर्दी) असल्याचे घोषित केले. तसेच, आग विझविण्यासाठी अद्यापही अग्निशामक प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहेत.

## आवक वाढल्याने लसूण, घेवडा, शेवग्याच्या दरात घट



**महासागर प्रतिनिधी,**
**पुणे, दि. १२ :**
मार्केट यार्डातील घाऊक बाजारात आवक वाढल्याने लसूण, घेवडा, शेवग्याच्या दरात घट झाली. अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती घाऊक बाजारातील व्यापाऱ्यांनी दिली.श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून मिळून ११० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत फळभाज्यांची आवक वाढली. कर्नाटक, गुजरातमधून मिळून ४ ते ५ टेम्पो कोबी, आंध्र प्रदेश, तामिळनाडूतून मिळून ४ ते ५ टेम्पो शेवगा, हिमाचल प्रदेशातून २ टेम्पो मटार, कर्नाटकातून ३ ते ४ टेम्पो घेवडा, आंध्र प्रदेश, कर्नाटकातून २ टेम्पो तोतापुरी कैरी, गुजरात आणि मध्य प्रदेशातून १० ते १२ टेम्पो लसूण अशी आवक झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली. पुणे विभागातून सातारी आले ५०० ते ६०० गोणी, भेंडी ६ ते ७ टेम्पो, गवार ४ ते ५ टेम्पो, टोमॅटो ८ ते १० हजार पेटी, हिरवी मिरची ४ ते ५ टेम्पो, ढोबळी मिरची ८ ते १० टेम्पो, काकडी ६ ते ७ टेम्पो, कोबी ५ ते ६ टेम्पो, फ्लॉवर ७ ते ८ टेम्पो, भुईमूग शेंग १०० ते १२५ गोणी, तांबडा भोपळा १४ ते १५ टेम्पो, कांदा ७० ते ८० ट्रक, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून ३५ ते ४० ट्रक बटाट्याची आवक झाली. पालेभाज्यांच्या दरात घटगेल्या आठवड्याच्या तुलनेत पालेभाज्यांची आवक वाढली. आवक वाढल्याने सर्व प्रकारच्या पालेभाज्यांच्या दरात घट झाली. कोथिंबिर, मेथी, कांदापातीसह सर्व प्रकारच्या पालेभाज्यांच्या दरात पाच ते दहा टक्क्यांनी घट झाली, अशी माहिती तरकारी विभागातील व्यापाऱ्यांनी दिली. मार्केट यार्डातील तरकारी विभागात रविवारी कोथिंबिरीच्या दीड लाख जुडींची, तसेच मेथीच्या ५० हजार जुडींची आवक झाली. पालेभाज्यांचे शेकड्यातील दर पुढीलप्रमाणे - कोथिंबीर -५०० ते १०००, मेथी -१००० ते १२००, शेपू -५०० ते ८००, कांदापात -८०० ते १२००, चाकवत -४०० ते ७००, करडई -३०० ते ७००, पुदिना - ३०० ते ५००, अंबाडी -३०० ते ६००, मुळे -८०० ते १२००, राजगिरा - ४०० ते ७००, चुका- ५०० ते ८००, चवळई -३०० ते ६००, पालक ६०० ते १२००

# आंतरराष्ट्रीय विमानतळावर तिसरी धावपट्टी उभारणार : मुख्यमंत्री फडणवीस



**महासागर प्रतिनिधी,**
**नवी मुंबई, दि. १२ :** सरकारने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना देशातील सर्वाधिक पॅकेज देऊन त्यांचे पुनर्वसन केले. यामुळे पूर्वी ज्या चार गावांनी या विमानतळाला विरोध केला त्या चार गावातील शेतक-यांनी पुन्हा एकदा त्यांच्या जमिनीसह घरांचे पुनर्वसन करण्याची मागणी सरकारकडे केल्यामुळे राज्य सरकार या चार गावांतील कुटूंबियांचे पूर्नवसन करुन त्या जागेवर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पातील भविष्यातील तिसरी धावपट्टी बांधण्याचा विचार करत असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी नवी मुंबई येथे दिली.नवी मुंबई विमानतळ प्रकल्पाच्या कामाची पाहणी शनिवारी सकाळी राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली. त्यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री गणेश नाईक, आ. प्रशांत ठाकूर, मंदा म्हात्रे, महेश बालदी, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सह व्यवस्थापकीय संचालक शान्तनू गोयल, गणेश देशमुख, डॉ. राजा दयानिधी व इतर अधिकारी उपस्थित होते. विमानतळ कामाच्या पाहणीनंतर अधिका-यांकडून घेतलेल्या माहितीनंतर मुख्यमंत्र्यांनी या विमानतळातून पहिले विमान सप्टेंबर अखेरपर्यंत उडणार असे यावेळी पुन्हा एकदा स्पष्ट केले. या विमानतळाच्या पहिल्या टप्याचे काम ९४ टक्के पूर्ण झाले असून दररोज १३ हजार कर्मचारी या विमानतळाचे काम पुर्ण करण्यासाठी दिवसरात्र झटत असल्याने अदानी समुह आणि सिडको महामंडळाने दुप्पट मजूर लावून हे पुढील ८० दिवसात विमानतळाचे काम पुर्ण करावे अशाही सूचना यावेळी अदानी समुहाच्या अधिका-यांना दिल्या. विमानतळाच्या पहिल्या टप्याचे काम पूर्ण झाल्यावर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन या विमानतळाच्या उदघाटनासाठी मुख्यमंत्री त्यांची वेळ घेणार असल्याचे त्यांनी शनिवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले. विमानतळाचे काम पुर्ण झाल्यावर सुद्धा विमानतळ संचलन आणि उड्डाणासंबंधी विविध परवानग्या घेण्याची प्रक्रिया करावी लागते. तसेच या विमानतळ प्रकल्पाचे इंटेरीयरचे काम अंतिम टप्यात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जगभरातील सर्वच विमानतळांच्या तुलनेत नवी मुंबई विमानतळातील प्रवाशांची विमानापर्यंत बॅग पोहचविणारी व्यवस्था सर्वाधिक वेगवान व सूरक्षित आणि स्वंयचलित पद्धतीची असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. विमानतळ प्रकल्पातील बोर्डींग पासची यंत्रणा पूर्ण झाल्याने विमानतळ व्यवस्थापनाने यावेळी मुख्यमंत्र्यांसह मान्यवरांना विमानतळातील बोर्डींग पास रंगित तालिम म्हणून काढून दाखविला. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामध्ये दोन धावपट्टीचे नियोजन होते. त्यामधील पहिली ३७०० मीटर लांबीची एक धावपट्टी बांधून तयार आहे. या पहिल्या धावपट्टीची वेगवेगळी चाचणी व परीक्षण घेऊन तीच्यावर विमानांचे यशस्वी उड्डाणाचा सराव घेण्यात आला आहे. दूस-या धावपट्टीचे काम काही प्रमाणात सुरू आहे. २०२७ पर्यंत दूसरी धावपट्टीचे काम पुर्ण करण्यासाठी सिडको मंडळ आणि अदानी समुहाने कंबर कसली आहे.

मुख्यमंत्र्यांनी अंतिम टप्यात याच विमानतळातील तिसरी धावपट्टी बांधण्याचे संकेत शनिवारी दिल्यामुळे मागील अनेक वर्षात विमानतळ गाभा क्षेत्रालगतच्या पारगाव, दापोली, खालचे ओवळे, भंगारपाडा, कुंडेवहाळ या गावातील गावक-यांनादिलासा मिळणार आहे. विमानतळाच्या नूकसान भरपाईच्या पुनर्वसन पॅकेजमध्ये या गावांतील कुटूंबांना साडेबावीस टक्के विकसित भूखंडासोबत घरासह इतर जागेची नूकसान भरपाई मिळणार आहे.

## अमली पदार्थ तस्करीचे रॅकेट उघड

### बोळींज पोलिसांकडून एकाच गुन्ह्यात १२ जणांना अटक



**वसई :** अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश करण्यात विरारच्या बोळींज पोलिसांना यश आले आहे. एकाच गुन्ह्यात पोलिसांनी १२ अमली तस्कर आरोपींना अटक केली आहे. यात एका नायजेरियन महिलेचा ही सहभाग आहे. यात अटक करून त्यांच्याकडून ७१ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.विरारच्या बोळींज पोलीस ठाण्याच्या हद्दीत १७ मे रोजी विरारच्या म्हाडा परीसरात अमली पदार्थ विक्री करण्यासाठी आलेल्या एका आरोपीला अटक करण्यात आली होती. मात्र यात अन्य ही तस्कर सहभागी असण्याची शक्यता असल्याने बोळींज पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश कावळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण विभागाचे पोलीस निरीक्षक प्रकाश सावंत व त्यांच्या पथकाने तपास सुरू केला होता. या गुन्ह्यात मिरारोड येथून ३, नालासोपारा ३, विरार २, ठाणे १, काशीमिरा १, नायगाव १ आणि मुंबई दिंडोशी १ असे एकूण १२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. यात दोन महिलांचा समावेश असून यातील एक महिला नायजेरियन आहे तिच्यावर यापूर्वी तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. या अटक आरोपींकडून ३३ लाख ७६ हजार किंमतीचे १७० ग्रॅम वजनाचा एमडी, १५ लाख ५२ हजार रोख रक्कम, एक चारचाकी व २६ मोबाईल असा एकूण ७१ लाख ८८ हजार किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

## कोंढव्यात टोळक्याची दहशत, तरुणावर कोयत्याने वार; सात जण अटकेत

**पुणे :** टोळक्याने कोयते उगारून दहशत माजविल्याची घटना कोंढवा भागात घडली. टोळक्याने एका वैमनस्यातून एका तरुणावर कोयत्याने वार केले. दहशत माजविणे, तसेच खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी कोंढवा पोलिसांनी सात जणांना अटक केली. याप्रकरणी दोन अल्पवयीनांना ताब्यात घेण्यात आले आहे.तन्वीर अक्रम शेख (वय १९), सुरेंद्र उर्फ अमर भुवनेश्वर साव (वय १९), राजू उर्फ राजा संगप्पा गुळकर (वय १८), कैलास बाबुराव गायकवाड (वय २२), कवीराज उर्फ केडी सुदाम देवकाते (वय १९), प्रेम उर्फ पप्या यल्लेश घुंगरनी (वय २२), यश अंबर सोनटक्के (वय १८) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी दोन अल्पवयीनांना ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी बिबवेवाडी-कोंढवा रस्त्यावर राहायला आहेत. याबाबत एका तरुणाने कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तरुणाचा आरोपींशी वाद झाला होता.

## प्राध्यापक अडकले फेसबुक तरुणीच्या मायाजालात

### गमावले दोन कोटी रुपये

**मुंबई:** एका तरुणीच्या मोहजालात अडकून एका नामांकित महाविद्यालयाच्या सेवानिवृत्त प्राध्यापकाने जवळपास २ कोटी रुपये गमावले आहेत. फेसबुकवर मैत्री करून या तरुणीने मधाळ बोलुन प्राध्यापकाला क्रिप्टो करंसीत (आभासी चलन) पैसे गुंतवणूक करण्यास भाग पाडले आणि १ कोटी ९० लाख रुपये घेऊन पोबारा केला. पश्चिम सायबर विभागात या प्रकरणी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.६२ वर्षीय तक्रारदार हे मुंबईच्या एका नामांकित महाविद्यालयातून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांना फेसबुकवर आयशा नावाच्या तरुणीची रिक्वेस्ट आली. तक्रारदाराने ती स्विकारली. त्यानंतर आयशाने त्यांचा मोबाईल नंबर घेतला आणि ते दोघे व्हॉटसअपवर बोलू लागले. ती गुरूग्राम येथे राहणारी होती. तिने ग्लोबल आर्ट कंपनीत काम करत असल्याचे सांगितले. आयशाने तक्रारदार प्राध्यापाकाशी मधाळ बोलून विश्वास संपादन केला. नंतर त्यांना क्रिप्टो करंसी (आभासी चलन) बद्दल माहिती दिली. कशा प्रकारे गुंतवणूक केल्यास फायदा होतो याच्या काही टिप्स दिल्या. तिच्यावर विश्वास बसलाःतक्रारदार प्राध्यपकाने तिने दिलेल्या टिप्स पडताळून पाहिल्या. ती माहिती खरी निघाली आणि त्या टिप्स परिणामकारक असल्याचे आढळून आले. त्यामुळे त्यांचा आयशावर पुर्ण विश्वास बसला. मात्र आयशा आणि तिच्या साथीदारांनी तो एकप्रकारचा सापळा लावला होता. तिने बिटकॉईन मध्ये गुंतवणूक करण्यास सांगितले. त्यानुसार आयशाने त्यांचे आधार कार्ड, ईमेल आयडी घेऊन बिनान्स खाते सुरू केले आणि वेगवेगळ्या बँक खात्यात काही रक्कम भरण्यास सांगितली. त्यानुसार त्यांनी पैसे भरण्यास सुरवात केली. मात्र काही दिवसांनी आयशाने संपर्क तोडून टाकला. त्यामुळे तक्रारदार अस्वस्थ झाले होते.

दुसऱ्या सापळ्यात पुन्हा अडकलेतक्रारदार प्राध्यापक सायबर भामट्यांनी लावलेल्या पहिल्या सापळ्यात अलगद सापडले होते. त्यानंतर मग पुढचा सापळा लावण्यात आला. कोयल नावाच्या दुसर्या तरूणीने फोन केला. त्यांनी गुंतवलेले पैसे ४-५दिवसात मिळवून देते असे सांगितले. त्यानंतर त्यांना प्रशांत पाटील नामक इसमाचा फोन आला. त्याने पहिल्या टप्प्यात साडेसात लाख मिळतील मात्र त्यासाठी ४२ हजार ७३५ रुपेय भरावे लागतील असे सांगितले. त्यांतर मग तक्रारदार प्राध्यपकाला वेगवेगळ्या कारणाने पैसे भरायला लावण्यात आले. क्रिप्टो करंसी, बिट कॉईन मध्ये गुंतवणूक नंतर ते पैसे काढण्यासाठी पुन्हा पैसे भरत गेले. त्यांनी एकूण १ कोटी ९३ लाख रुपये भरले होते. त्यांनर मात्र त्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

# मराठीत बोलणे मराठी भाषकांची जबाबदारी



**पुणे :** 'मराठीच्या अभिजाततेसाठी कृत्रिम प्रज्ञेला (एआय) मराठी शब्दांची, भाषिक व्यवहारांची माहिती पुरवणे गरजेचे झाले आहे. त्यामुळे मराठीत बोलत राहणे, ही प्रत्येक मराठी भाषकाची जबाबदारीच आहे,' असे मत महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे (एमकेसीएल) मुख्य सल्लागार विवेक सावंत यांनी रविवारी व्यक्त केले. ''एआय'ला मराठी आल्यास इतर भाषांमध्येही साहित्याचा, भाषिक व्यवहारांचा अनुवाद करणे, सोपे होईल,' असेही त्यांनी सांगितले.शेठ चिमणलाल गोविंददास मेमोरिअल ट्रस्टच्या वतीने सावंत यांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. त्यावेळी त्यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्तेचे दैनंदिन जीवनातील उपयोग' या विषयावर भाष्य केले. ज्ञान प्रबोधिनीचे संचालक डॉ. गिरीश बापट, ट्रस्टचे अध्यक्ष मोहन गुजराथी, डॉ. नलिनी गुजराथी, जयंत गुजराथी, कन्हैयालाल गुजराथी, अविनाश शेटजी या वेळी उपस्थित होते. 'अॅटम्बर्ग टेक्नॉलॉजीज'चे मनोज मीना, 'काका हलवाई'चे सुरेंद्र आणि अनिल गाडवे यांना 'उद्यमगौरव', तर रायगड येथील शबरी सेवा समितीचे प्रमोद करंदीकर, नांदेड येथील डॉ. अशोक बेलखोडे यांना 'सेवागौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# लाडक्या बहिणीला पैसे देण्यासाठी भाऊ, पती, बापाला हे सरकार बेवडे करणार, आव्हाडांची सरकारवर कडाडून टीका


**महासागर प्रतिनिधी,**
**ठाणे, दि. १२ :** १९७४ मध्ये तत्कालीन सरकारने मद्यविक्री परवाने खुले करण्याचा निर्णय घेतला होता. त्याविरोधात मृणालताई गोऱ्हे, अहिल्याबाई रांगणेकर, मधु दंडवते आदींनी राज्यभर रान पेटवले होते. त्यावेळी सरकारने हा निर्णय मागे घेतला होता. आता तब्बल ५० वर्षानंतर राज्यात ३२८ वाईन शॅपला परवाने दिले जाणार आहेत. लाडकी बहिण योजनेमुळे महाराष्ट्राच्या तिजोरीवर पडणारा भार कमी करण्यासाठी आणि महसूल वाढविण्यासाठी या सरकारने लाडक्या बहिणींच्या पतीला, पित्याला आणि भावाला बेवडा करण्याचा चंग बांधला आहे. पाशवी बहुमतामुळे सत्तेची झिंग चढलेले हे सत्ताधुंद सरकार साधुसंतांच्या महाराष्ट्राला मद्यधुंद करणार आहे, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस आमदार डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी सरकारच्या



मद्यविक्री धोरणाचा कडाडून विरोध केला.महसुलात वाढ करण्यासाठी राज्य सरकारने मद्यविक्री परवाने खुले करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयास डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी कडाडून विरोध केला. या निर्णयाविरोधात महिलांनी रस्त्यावर उतरावे, असे आवाहनही त्यांनी केले. पन्नास वर्षापूर्वी मद्यविक्रीचे परवाने बंद करण्यात आले होते. पण, आता पुन्हा ते खुले करून तथाकथीत 'लोकहिताचे निर्णय' घेणाऱ्या सरकारच्या विरोधात कोणी बोलू नये, यासाठी महाराष्ट्रातील जनतेने शुद्धीत राहूच नये, याची तजवीज हे सरकार करीत आहे. पन्नास वर्षांपूर्वीचे परवाने १५ कोटी रूपयांना विकले जात आहेत. आता हे नवीन परवाने १-१कोटी रुपयांना विकले जाणार आहेत. अनब हे परवाने ज्या ४७ कंपन्यांना दिले जाणार आहेत, त्यांचे संचालक कोण आहेत, हे जरा तपासून पहा, असे म्हणत डॉ. आव्हाड यांनी ४७ कंपन्यांची यादीच वाचून दाखविली. या कंपन्यांच्या संचालकांनी मंत्रालयाच्या पहिल्या मजल्यापासून सहाव्या मजल्यापर्यंत ठाण मांडले आहे. त्यांच्या फायद्यासाठी सत्तेची झिंग चढलेले हे सरकार पाशवी बहुमताच्या जोरावर महाराष्ट्राला गटारगंगेत टाकत आहे. त्यामुळेच या सरकारची निशाणी मॅकडोनाल्ड, जॉनी वॉकर अशीच असणार आहे. १९७४ मध्ये जसे मद्यधोरण मृणाल गोऱ्हे यांनी उधळून लावले होते. तसेच आताही होणार आहे, राज्यात लोकक्षोभ उसळणार आहे.

# मुंबईतील मतदार वाढले; आठ वर्षांत दहा लाखांहून अधिक वाढ

**महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. १२ :**
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता असून त्यासाठी मतदारयाद्या अद्ययावत करण्याचे कामही वेगात सुरू आहे. मुंबई महापालिकेची मुदत संपून जवळपास साडेतीन वर्षे पूर्ण झाली असून महापालिकेची निवडणूक होऊन आता आठ वर्षे झाली आहेत. या आठ वर्षांत मुंबईत मतदारांची संख्या १० लाखांनी वाढली आहे.राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच अपेक्षित आहेत. सर्व महानगरपालिका व नगरपालिकांमध्ये प्रभागांची रचना करून ती निवडणूक आयोगाकडे मान्यतेसाठी सादर करण्याचे आदेश नगर विकास विभागाने सर्व पालिकांना दिल्यानंतर प्रभाग रचनेच्या आराखड्याचे काम वेगात सुरू झाले आहे. गेल्या सात - आठ वर्षांत मुंबईत झालेल्या विकासकामांची नोंद त्यात करण्यात येत आहे. दुसरीकडे मतदारयाद्या अद्ययावत करण्याचे



कामही अखंड सुरू आहे.

मुंबई महापालिकेची मागील निवडणूक फेब्रुवारी २०१७ मध्ये झाली होती. निवडणुकीत निवडून आलेल्या नगरसेवकांच्या कार्यकाळाची मुदत मार्च २०२२ मध्ये संपली. नगरसेवकांच्या कार्यकाळाची मुदत संपून साडेतीन वर्षे झाली.

मुंबई महापालिकेची निवडणूक पार पडली त्याला आता साडेआठ वर्षे होऊन गेली आहेत. या साडेआठ वर्षांत मुंबईतील लोकसंख्येत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे मतदारांच्या संख्येतही वाढ झाली आहे. मुंबई महानगरपालिकेच्या २०१७ मधील निवडणुकीच्या वेळी मतदारांची संख्या सुमारे ९१ लाख होती. विधानसभा निवडणुकीच्या वेळी मतदारांची संख्या एक कोटी दोन लाखांवर पोहोचली. विशेष म्हणजे २०२३ मधील लोकसभा निवडणुकीनंतर मतदारांच्या संख्येत मुंबई शहर भागात ५३ हजार ३७२, तर मुंबई उपनगरांत दोन लाख ३७ हजार ७१५ अशी एकूण दोन लाख ९१ हजार ०८७ ने वाढ झाली. या आकडेवारीवरून गेल्या आठ वर्षांत मतदारांच्या संख्येत जवळपास दहा ते साडेदहा लाखांनी वाढ झाली आहे.१ जुलैपर्यंतची यादीस्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी स्वतंत्र मतदारयादी तयार केली जात नाही. भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली यादी वापरली जाते. १ जुलै २०२५ पर्यंत नावे नोंदवलेली यादी या निवडणुकीसाठी ग्राह्य धरण्यात यावी, असे आदेश राज्य निवडणूक आयोगाने नुकतेच दिले आहेत. विधानसभेची निवडणूक नोव्हेंबर महिन्यात पार पडली होती. त्यालाही आता सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी उलटून गेला आहे. त्यामुळे मतदारांची संख्या आणखी काही हजारांनी वाढणार आहे.

## दारूच्या वादातून तरूणाचा हत्याः दोन भाऊ ताब्यात

**मुंबई :** वडाळा बस डेपो परिसरात दोन भावांनी केलेल्या हल्लयांमध्ये ३२ वर्षीय निखिल लोणधे याचा मृत्यू झाला. रघुनाथ महाडिक रोडवरील पदपथावर हा प्रकार घडला. याप्रकरणी कल्पेश कुडतरकर (२९) आणि योगेश कुडतरकर (३१) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी पोलीस तपास करीत आहेत.दारूच्या नशेत वाद झाल्यामुळे आरोपींनी हा हल्ला केल्याचे तपासात निष्पन्न झाले. मृत निखिल व आरोपी दोघेही एकमेकांचे जुने मित्र होते, तसेच तिघांविरोधात आधीपासून गुन्हे दाखल आहेत. घटनेनंतर अवघ्या १५ मिनिटांतच रफी अहमद किडवाई (आरएके) मार्ग पोलिसांच्या मोबाइल पथकाने दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलमाखाली हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे. यापूर्वी २४ फेब्रुवारी २०२५ रोजी मृत निखिलचा भाऊ वर्धन हा आईसोबत फुटपाथवर झोपला होता. त्यावेळी वेगात आलेल्या मोटरगाडीखाली आल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला होता. पोलिसांकडून संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

## उपमुख्यमंत्री पवार यांनी सकाळी सहा वाजताच हिंजवडी आयटी पार्कची पाहणी



**महासागर प्रतिनिधी,**
**पुणे, दि. १२ :**
हिंजवडी आयटी क्षेत्राला अधिक चालना देण्यासाठी या भागातील वाहतूक व्यवस्था विनाअडथळा आणि जलद गतीने कशी करता येईल, त्या दृष्टीने तातडीने उपाययोजना करणे अपेक्षित आहे. यासाठी काही नवीन रस्ते प्रस्तावित तसेच रुंद करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी रविवारी प्रशासकीय यंत्रणांना दिले. उपमुख्यमंत्री पवार यांनी सकाळी सहा वाजताच हिंजवडी आयटी पार्कची पाहणी सुरू केली. यामुळे शासकीय यंत्रांची धावपळ उडाली.आयटी पार्कची पाहणी केल्यानंतर त्यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयात त्यांनी शासकीय यंत्रणांची आढावा बैठक घेतली. नैसर्गिक ओढे - नाल्याभोवती अतिक्रमण तसेच प्रवाह अडवल्यामुळे हिंजवडी आयटी पार्कसह इतर भागात पावसाचे पाणी साचत असल्याने नागरिकांना अडचणी येत आहे. त्यामुळे अशा अतिक्रमणावर तातडीने कठोर कारवाई करण्याचे निर्देश यावेळी उपमुख्यमंत्री यांनी दिले. या भागातील उद्योग, व्यवसायाला चालना देण्यासाठी रस्ते रुंद करत विनाअडथळा वाहतूक सुरळीत होईल, अशा उपाययोजना हाती घेण्याचे निर्देश देण्यात आले. हिंजवडी, माण, मारुंजीसह शहर परिसरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पर्यायी नवीन रस्त्यांची आखणी तसेच रस्ते मोठे करणे अपेक्षित असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# ठेकेदाराच्या मनमानीने रस्ता खोळंबा

## शेतकरी व ग्रामस्थ संतप्त!

■अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

जीतापूर नाकट परिसरातील नाल्यावरील साईड रोड ठेकेदाराच्या निष्काळजी कामामुळे धोकादायक बनला आहे. नुकतीच एक घटना समोर आली असून, चिखल व निकृष्ट साईड रस्त्यामुळे ट्रॅक्टर थेट नाल्याजवळ फसले. ही घटना कुठलीही एकटी नाही, तर याआधीही अनेक वाहनधारकांना याच ठिकाणी फसावं लागलं आहे.

सध्या खरीप हंगामात शेतकरी शेतात राबत असून, पेरण्या पूर्ण होऊन निंदणी, खते, फवारणीची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. अशा स्थितीत खराब रस्त्यांमुळे वाहतूक खोळंबते आहे. रस्त्याची लांबच लांब दुर्दशा ग्रामस्थ व शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहणारी ठरते आहे.या सर्व परिस्थितीमागे ठेकेदाराची मनमानी व प्रशासनाचे पूर्ण दुर्लक्ष कारणीभूत आहे. विकासकामाच्या नावाखाली केवळ दिखावा केला जात असून,



कामांच्या गुणवत्तेकडे कुणाचेच लक्ष नाही. स्थानिक प्रशासनाने वेळेवर कामाचा आढावा न घेतल्यामुळे ही परिस्थिती ओढवली आहे.ग्रामस्थांनी प्रखर शब्दांत संताप व्यक्त करत ठेकेदारावर कारवाई करावी, कामाच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय समि ती नेमावी व रस्ता तातडीने दुरुस्त करावा, अशी मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

# काँग्रेसकडून कावड मार्गाची पाहणी

■अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

श्रावण महिन्याच्या निमित्ताने दरवर्षी आयोजित होणारा कावड महोत्सव यंदाही उत्साहात साजरा केला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर अकोला ते गांधीग्राम या कावड मार्गाची महानगर काँग्रेस कमिटीकडून शनिवार, १२ जुलै रोजी पाहणी करण्यात आली.

यावेळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी अकोला ते गांधीग्राम या मार्गाची पाहणी करत विविध सुविधांचा आढावा घेतला. अलीकडच्या काही वर्षांत या मार्गावर विकासकामे सुरू असल्यामुळे शिवभक्तांना अडचणींचा सामना करावा लागत होता.

# जिल्हा परिषद,पंचायत समितीची मतदारसंघाची रचना आज होणार जाहीर

■अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

अकोला जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठीची बहुप्रतीक्षित प्रभाग रचना उद्या, १४ जुलै रोजी जिल्हाधिकारी जाहीर करतील. ग्रामविकास विभागाने १२ जून २०२५ रोजी प्रभाग रचना निश्चित करण्याचे आदेश दिल्यानंतर ही घोषणा होत आहे. प्रारूप प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतर हरकती आणि सुनावणीचा कालावधी असेल. राज्य निवडणूक आयोग १८ ऑगस्ट रोजी अंतिम प्रभाग रचनेला शिक्कामोर्तब करण्याची शक्यता आहे. २०२० जिल्हा परिषद सार्वत्रिक च्या निवडणुकीत जिल्हा परिषदेची सदस्य संख्या ५३ होती. मात्र हिवरखेड नगरपंचायत झाल्यामुळे एक सर्कल कमी होऊन आता जिल्हा परिषदेची सदस्य संख्या ५२ आणि गणांची (पंचायत समिती) संख्या १०४ राहील असे चित्र आहे.

जिल्हा परिषदेची शेवटची सार्वत्रिक निवडणूक २०२० मध्ये झाली होती आणि तिचा कार्यकाळ सात महिन्यांपूर्वी, म्हणजे १६ जानेवारी २०२५ रोजी संपला. सवीच्च न्यायालयात ओबीसी



राजकीय आरक्षणाचा मुद्दा प्रलंबित असल्याने निवडणुका लांबणीवर पडल्या होत्या. तेव्हापासून जिल्हा परिषद आणि जिल्ह्यातील सर्व सात पंचायत समित्यांवर प्रशासक नेमण्यात आले आहेत.

६ मे २०२५ रोजी सवीच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास हिरवा कंदील दाखवला, त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने शासनाला निवडणुकीपूर्वीची प्रक्रिया सुरू करण्याच्यासूचना दिल्या. त्यानुसार प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

# वारीच्या डोहात बुडून एकाचा मृत्यू

■अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

पावसाळी सहल व देवदर्शनासाठी अकोला - बुलडाणा जिल्ह्याच्या सिमेवर असलेल्या वारी हनुमान येथील डोहामध्ये बुडून अक्षय भोजने नामक युवकाचा डोहात बुडून मृत्यू झाल्याची घटना काल रोजी घडली आहे. अक्षय सिध्दार्थ भोजने (२३) हा आपले मित्र प्रमोद डोंगरे, रविंद्र पोहनकर व राहूल विरघट या मित्रांसह वारी या ठिकाणी दर्शन व सहलीसाठी गेले होते. मंदीरातील दर्शनानंतर नदीकाठच्या उंच कड्यावरुन अक्षयने पोहण्यासाठी नदीत उडी मारली. परंतु नंतर तो वर आलाच नाही. पाण्याचा अंदाज न आल्यामुळे तो पाण्यात बुडाला असावा असा संशय व्यक्त केल्या जात आहे. पाण्यात बुडालेल्या अक्षय याचेसाठी शोध मोहिम राबविण्यात आली होती.

# अवैध देशी,वदेशी दारु ८५ हजार ३६० रु. चा साठा जप्त

■अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

मा. श्री. अर्चित चांडक, पोलीस अधीक्षक, अकोला यांचे निर्देशाप्रमाणे अकोला जिल्हयामध्ये अवैध धंदे समूळ नष्ट करण्यासाठी ऑपरेशन प्रहार मोहीम राबविण्यात येत आहे.दिनांक १२.०७.२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मि ळालेल्या गुप्त बातमी वरून श्री शंकर शेळके पोलीस निरीक्षक स्थागुशा अकोला यांनी निर्देश दिल्या वरुन खाजगी वाहनाने पो स्टे रामदास पेठ अकोला हद्दीमध्ये गुरुद्वारा चे समोर प्रो रेड केली असता, आरोपी नामे नरेश श्रीकृष्ण तेलगोटे वय २४ वर्ष रा मच्छी मार्केट अकोट फाईल अकोला याचे ताब्यातून



नमूद घटनास्थळावरून प्रति १८० श्र चे १९२ सीलबंद कॉटर्स, कि अं १५३६०/- रुपये व एक पांढऱ्या रंगाची होंडा कंपनीची एक्टिवा मोसा क्र चक३० इग ०२१५ कि अं ७०००० रु असा एकूण ८५३६०/- रु चा मुद्देमाल पंचा समक्ष जप्त करून आरोपी विरुद्ध कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायाद्यान्वये पो. स्टे रामदास पेठ अकोला येथे गुन्हा दाखल करण्यात येत आहे.सदरची कार्यवाही सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री अर्चीत चांडक साहेब, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री अभय डोंगरे साहेब, पोलीस निरीक्षक श्री शंकर शेळके यांचे मार्गदर्शनाखाली सदरची कारवाई झडख पठान साहेब कउ उमेश पराये, कउ शेख हसन,झउ श्रीकांत पातोंड झउ अभिषेक पाठक स्थानिक गुन्हे शाखा, अकोला यांनी केली.

# घरच्या घरी औषध घेऊ नका

## सर्दी,खोकल्यासाठी डॉक्टरांचा सल्ला योग्य

**अकोला** : गेल्या काही दिवसांपासून वातावरणातील बदलाने सर्दी, घसा खवखवणे यासारखे आजार वाढले आहे. विशेषतः मुलांना या आजारांचा विळखा पडला आहे. अनेकजण हे आजार तीन-चार दिवसांत आपोआप बरे होतात, म्हणून यासाठी दोन दिवस वाट पाहा डॉक्टरांकडे जाणे टाळतात, तर काहीजण स्वतःच्या मनाने औषधी घेऊन मोकळे होतात. मात्र, आजार वाढण्याआधी वैद्यकीय सल्ला घेणे फायदेशीर ठरते. डॉक्टरांना दाखवून त्यांच्या सल्लानुसार औषध घेण्याची गरज आहे. मनाने किंवा कोणी सांगितले म्हणून कुठलेही औषध घेणे हे आरोग्यसाठी धोकादायक असल्याचे वैद्यकिय क्षेत्रातील जाणकारांनी स्पष्ट केले आहे.लहान मुलांमध्ये केवळ सर्दी असेल तर सर्दी दोन-तीन दिवस वाट पाहता येते. मात्र, सर्दीसोबत ताप असेल तर तत्काळ डॉक्टरांचासल्ला घ्यावा. दिवसा खोकला येत असेल तर वाट पाहता खोकला येते. डॉक्टरांच्या सल्लयाशिवाय औषधीच्या दुकानातून औषधी घेतल्यास दुष्परिणाम होण्याची शक्यता असते. मोठ्यांची औषधी लहान मुलांना उपयोगी पडतीलच असे नाही. मोठ्यांना दिले जाणारेडोसेस आणि लहान मुलांचे डोसेस वेगवेगळे असल्याने त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.बाल दम्याच्या खोकल्याचे प्रमाण वाढत आहे. बाळाला वारंवार खोकला येत असेल, श्वासोच्छास जलद होत असेल, दूध प्यायला अथवा जेवायला त्रास होत असेल किंवा बाळाचा खेळणे, हालचाली कमी झाल्या असतील तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक असते. सर्दीसोबत ताप असेल तर वेळीच वैद्यकीय सल्ला घेणे महत्त्वाचे ठरते. सध्या अनेक बालकांच्या फुफ्फुसात इन्फेक्शनहोत असल्याची स्थिती आहे.

# बार्शीटाकळी पोलीसांकडुन २ गोवंशाना जिवनदान

■बार्शिटाकळी,दि १३ (प्रतिनिधी) :

मा. पोलीस अधिक्षक श्री अर्चीत चांडक साहेब यांनी जिल्हयातील अवैध धंदे कारवाइ करीता 'ऑपरेशन प्रहार' योजना राबवत असुन गोवंश तस्करी व वाहतुक करण्यावर कठोर कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहे आज दिनांक १२/०७/२०२५ रोजी पोलीस स्टेशन बार्शीटाकळीला गोपनीय माहिती प्राप्त झाली की एका पांढ-या रंगाच्या महिन्द्रा सुप्रो गाडी क्र एम. एच. ३० बि.डी ७७६९ या गाडीचा चालक हा गाडीमध्ये दोन गोवंश जातीचे बैल कुरतेने दोरखंडाने बांधुन कटाइ करीता वाहतुक करीत आहे, अशी माहिती प्राप्त होताच पो. स्टॉफ पो. हे.कॉ बोरसे ब. न. ५४० पो.कॉ अमोल ब. न. १३३७ पो.कॉ योगेश ब. न. १८६७ सह मिळलेल्या माहिती प्रमाणे सायंकाळी १९. ०० वा दरम्याण घटनास्थळी जावुन सदर ठिकानी नाकाबंदी करून महान पिंजर कडुन येनारी महीन्दा सुप्रो गाडी क्र. एम. एच. ३० बि. डी ७७६९ थांबवुन दोन पंचा समक्ष गाडीचे मागचे साइडने पाहणी केली असता तिथे ०२ गोवंश जातीचे बैल कुरतेने



दोरखंडाने बांधलेले मिळुन आले. किंमत अंदाजे प्रत्येकी ४५००० हजार रू प्रमाणे असे दोन बैल किंमत ९०००० रु.चे मिळुन आले तसेच महीन्द्रा सुप्रो गाडी ची किंमत ४,५०,००० रू असे एकुन ५,४०,००० रू चा मुदेमाल जप्त करुन पो. स्टे ला आणुन गोवंश जातीचे बैल पुढील देखरेखी करीता व संगोपणा करीता आदर्श गोसेवा संस्थान, म्हैसपुर येथे दाखल केले

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री अर्चीत चांडक साहेब, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री अभय डोंगरे साहेब, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सतिश कुळकणी साहेब यांचे मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस स्टेशन बार्शीटाकळीचे पोलीस निरीक्षक प्रवीण धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन बार्शीटाकळी चे पो.हे.कॉ अविनाश बोरसे ब. न. ५४०, पो कॉ अमोल हाके, पो कॉ योगेश ब. न. १८६७, यांनी केली आहे. पुढील तपास ठाणेदार सां यांचे मार्गदर्शनात पो.हे. कॉ राजेश जौंधरकर ब.न. ५५७ हे करत आहेत.

# जिल्ह्यातील ९१ शाळांची विशेष पथकांद्वारे तपासणी केली जाणार

■अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

शाळांच्या गुणवत्तेची तपासणी करण्यासाठी आणि आगामी काळात विकासाचे नियोजन निश्चित करण्यासाठी जिल्हयात जवळपास ९१ शाळांची तपासणी केली जाईल. या तपासणीसाठी ३५ पथके तयार ठेवण्याचे निर्देश शिक्षण विभागाने शिक्षणाधिकाऱ्याला दिले आहेत. ज्याप्रमाणे महाविद्यालयांचे मूल्यांकन करून 'नॅक' श्रेणी दिली जाते, त्याचप्रकारे आता जिल्हयातील ९१ शाळांची तपासणी केली जाईल. या तपासणीसाठी ३५ पथके तयार ठेवण्याचे निर्देश शिक्षणाधिकाऱ्याला देण्यात आले आहेत. प्रत्येक पथकाला ६ शाळा तपासण्याचे लक्ष्य (टार्गे ट) दिले आहे. प्रत्येक पथकामध्ये गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, डायट अधिव्याख्याता, केंद्रप्रमुख यांसारख्या ४ कर्मचाऱ्यांचा समावेश असेल. राज्यातील एकूण १ लाख ८ हजार ५३० शाळांनी 'स्कॉफ' श्रेणीसाठी स्वमूल्यांकनात माहिती भरली आहे. यासाठी राज्य शाळा मानक प्राधिकरणाची निर्मिती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शाळा गुणवत्ता आणि आश्वासन तपशील तयार करण्यात आला आहे. या तपशिलानुसार, राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या शाळांकडून ३० जूनपर्यंत स्वमूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण करून घेण्यात आली आहे. आता शाळांनी स्वमूल्यांकन करताना दिलेली माहिती बरोबर आहे की नाही, याची प्रत्यक्ष पडताळणी केली जाईल, म्हणजेच शाळांचे बाह्य मूल्यांकन केले जाईल.ही तपासणी १५ ते ३१ जुलै या १५ दिवसांच्या कालावधीत केली जाईल.

# रानभाज्या नामशेष होण्याच्या मार्गावर

तेल्हारा : मानवी आरोग्यासाठी अतिशय लाभदायक असलेल्या तरोटा, कुंजर, अंबाडी, बारीक घोळ, चवळ, लाल अंबाडी, कटुले, राजगिरा, तेखी, धोपा इत्यादी रानभाजया नामशेष होत असून नवीन पिढीला तर या भाज्यांची नावे व चवही माहित नाही. सध्याच्या स्टॅंडर्ड व श्रीमंत युगात रानभाज्यांचे महत्व कमी झाले असून पालक, पनीर मसाला, पनीर नूडल्स, पिझ्झा या सारख्या आरोग्यास घातक असणाऱ्या भाज्या व वस्तूकडे लोकांचा कल दिसून येत आहे. वीस पंचवीस वर्षापूर्वी रान भाज्यांचे अतिशय महत्व होते. पावसाळा सुरू होता प्रत्येक घरी तरोटा, कुंजर, अंबाडी, चिवडीची भाजी, लाल अंबाडीची चटणी, धोपा यासारख्या रानभाज्यांची रेलचेल असायची. रानभाजया संपेपर्यंत नागरिक तथा गृहिणी बाजारातील भाजीपाला विकत घेत नव्हत्या. हिरव्या अंबाडीची भाजी करून त्यात गव्हाची कणीक किंवा ज्वारीचे पीठ घालून त्याच्या भाकरी करून कुटुंबातील सर्वच जण आनंदाने खायचे. परंतु, अलीकडे पालक पनीर मसाला, पनीर नूडल्स, पिझ्झा, अशा आजाराला निमंत्रण देणाऱ्या चायनीज वस्तू बाजारात रेडिमेट मिळत असल्याने बिनामूल्य मिळणाऱ्या रानभाज्यांकडे दुर्लक्ष झाले आहे. त्यातही प्रत्येक शेतकरी शेतात तणनाशकाची पवारणी करत असल्याने या रानभाज्या आता नामशेषज्ञ झाल्या आहेत. त्यामुळेअलकडे बऱ्याच कृषी प्रदर्शनात स्टॉल लावून प्राचिन इतिहास टीकविण्यासाठी रानभाजी प्रदर्शनाचे आयोजन केल्या जाते.

त्यामुळे पूर्वी ज्या रानभाज्या फुकटात मिळत होत्या. त्या रानभाज्या आता नागरिकांना विकतही मिळत नसल्याचे वास्तव पुढे येत आहे. आता रसायन व कीटकनाशकाचा मोठया प्रमाणात वापर होत असल्लाने या रानभाज्यातील औषधी गुण ही नष्ट होत चाले आहे. आता आरोग्यास घातक असलेल्या बाजारातील पालेभाज्या नागरिकांना विकत घ्याव्या लागत असून या रसायन युक्त पालेभाज्यां मुळे अनेक आजारांनी तोंड वर काढले आहे.

# फाटलेले ओठ व दुभंगलेली टाळू ऑपरेशन साठी भव्य मोफत तपासणी

■अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

रोटरी क्लब ऑफ अकोला नॉर्थ अकोला जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन तसेच श्रीराम हॉस्पिटल आणि स्माईल ट्रेन यांच्या संयुक्त विद्यमाने प्लास्टिक सर्जरी दिनानिमित्त भव्य मोफत तपासणी व प्लास्टिक सर्जरी शिबिरा चे आयोजन मंगळवार दि१५ जुलै रोजी सकाळी दहा ते दुपारी तीन या वेळेमध्ये डॉ एन आर सलामपुरिया मेमोरियल श्रीराम हॉस्पिटल अमानखा प्लॉट अकोला येथे आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये जन्मापासून असलेले लिंग दोष हायपोसपीडियास चिकटलेली जीभ जन्मापासून चिकटलेल्या व जास्तीच्या बोटांची शस्त्रक्रिया डायबिटीक फूट केअर बेड सोवर मोठ्या जखमाकरिता त्वचारोपण कॉस्मेटिक सर्जरी तसेच त्वचारोग केसांच्या समस्या सौंदर्य समस्या नखांच्या समस्या विशेष म्हणजे जळाल्यानंतर आलेल्या विकृतींच्या रुग्णांसाठी मोफत तपासणी करून त्यांना मार्गदर्शन करण्यात येईल तसेच ज्या रुग्णांना प्लास्टिक सर्जरीची आवश्यकता असेल त्यांची निवड करून त्यांचे नाममात्र दरात तर काहींची मोफत प्लास्टिक सर्जरी करण्यात येणार आहे.

याकरिता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ मयूर बी अग्रवाल आणि त्वचारोग कुष्ठरोग व सौंदर्यशास्त्र तज्ञ डॉ सौ श्रद्धा एम अग्रवाल सलामपुरिया या तपासणी करून मार्गदर्शन करतील शिबिराचे उद्घाटन १५ जुलै रोजी सकाळी दहा वाजता सुप्रसिद्ध ज्येष्ठ महिला धन्वंतरी डॉ शारदा सलामपुरिया यांच्या हस्ते होणार आहे विशेष म्हणजे फाटलेले ओठ व दुभंगलेली टाळू च्या ऑपरेशन साठी कोणताही खर्च येणार नाही तसेच जळाल्या नंतर आलेल्या विकृतीच्या रुग्णांसाठी बर्नहीलिंग फाउंडेशन मार्फत शस्त्रक्रिया ही मोफत राहील यासाठी रुग्णांनी श्रीराम हॉस्पिटल प्लास्टिक सर्जरी कन्स्ट्रक्टिव्ह कॉस्मेटिक सर्जरी सेंटर हायटेक बर्न केअर सेंटर स्किन अँड हेअर क्लिनिक अमानखा प्लॉट अकोला येथे नोंदणी करून उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकातर्फे करण्यात आले आहे.

## थोडक्यात

### मागेल त्याला विहीर शासनाची योजना

**पातूर** : मागेल त्या शेतकऱ्याला मनरेगा अंतर्गत सिंचन विहिरीची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. पातूर नंदापूर परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी आपल्या शेतीचे उत्पन्न वाढवावे, यासाठी आपल्या शेतात सिंचन विहिरी करून घेतल्या. त्यासाठी उसणवारी, कर्ज काढून बाधकाम पूर्ण केले. मात्र अद्यापही त्याचे चेक खात्यात जमा झाले नाहीत. यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला आहे.मार्च २०२४ मध्ये ४ लाख रुपयाची सिंचन विहीर शेतकऱ्यांना मंजूर करण्यात आली. शेतकऱ्यांनी विहिरीचे खोदकाम पूर्ण करून बांधकाम सुद्धा पूर्ण केले. आपल्या शेतात सिंचन विहीर होणार, उत्पन्न वाढणार, आपल्याला कर्जबाजारी होण्याची गरज राहणार नाही. या आनंदाने शेतकऱ्यांनी उसनवारी, व्याजाने पैसा काढून दोन महिन्यात विहिरीचे काम पूर्ण केले. मे २०२४ मध्ये कार्यकारी अधिकारी म नरेगा बी. वैष्णवी यांनी पातूरनंदापुरला आकस्मित भेट दिल्यानंतर शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन विहिरीच्या कामाची पाहणी केली असता त्यांना उत्कृष्ट दर्जाचे काम दिसून आले.

# श्री राजेश्वर सेतू वरून ऑटो व चार चाकी वाहनांची वाहतूक सुरु

## आगामी पालखी महोत्सव पाहता प्रशासनाचा निर्णय

■अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

आमदार गोवर्धन शर्मा यांच्या क पुढाकाराने निर्माण करण्यात आलेल्या राजेश्वर ट सेतूचे म हत्त्व आता वाढले आहे. श्री राजेश्वर सेतू ल ते जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणाऱ्या रा रस्त्याचे काम पूर्ण झाल्याने व आता या रस्त्यावरून ऑटो रिक्षा व चार चाकी वाहनांच्या बी वाहतुकीला परवानगी मिळाली आहे. आगामी की पालखी व कावड महोत्सव पाहता प्रशासनाने श्री न्य राजराजेश्वर सेतू वरून ऑटो व चार चाकी . वाहनांच्या वाहतुकीला सुरू करण्याचा निणय , घेतला आहे. त्यामुळे या पुलावरील लोखंडी गर्डर र्क काढण्यात



आले आहेत, या पुलावरून ऑटो रिक्षा व चार चाकी वाहनांची वाहतूक सुरू झाल्याने

नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. कारण पालखी व कावड यात्रे दरम्यान जुने शहरातून सिटी कोतवाली व बस स्टॅन्ड तसेच रेल्वे स्टेशन कडे जाण्यासाठी अन्य मार्ग नसल्याने श्री राज राजेश्वर मंदिराच्या मागून वाहतूक सुरू ठेवावी लागत असे, वाहन चालकांसाठी हे मोठे जिकरीचे काम होते कारण या अरुंद रस्त्यांवरून वाहने काढताना मोठी कसरत करावी लागत असे. परंतु आता राजेश्वर सेतू ऑटो रिक्षा व चार चाकी वाहनांसाठी खुला झाल्याने नागरिकांना सरळ जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणे सोयीचे ठरत आहे तसेच नवीन शहरातून श्री राज राजेश्वर मंदिराचे दर्शनासाठी सुद्धा हा रस्ता सोयीस्कर ठरत आहे. ह्या लोखंडी पुलावरील गर्डर काढून संतोषी माता मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर लावण्यात आले आहेत. त्यामुळे या रस्त्यावरून ऑटो रिक्षा व चार चाकी वाहनांना प्रवेश बंदी करण्यात आली आहे. या रस्त्यावर केवळ दुचाकी वाहनांची वाहतूक सुरू राहील त्यामुळे वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता जवळपास मावळली आहे. आहे ऑटो रिक्षा व चार चाकी वाहनांना या पुलावरून वाहतूक करण्याची मुभा मिळाल्याने या वाहन चालकांची डोकेदुखी सुद्धा दूर झाली आहे.

# शिवाजी विद्यालयात जागतिक लोकसंख्या दिवस साजरा

■अकोट,दि १३ (प्रतिनिधी) :

स्थानिक श्री शिवाजी विद्यालयात जागतिक लोकसंख्या दिन, एलर्जी प्रतिबंध दिन मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य संजय वालसिंगे होते. प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. पूजा राऊत उपस्थित होत्या. कार्यक्रमास उपमुख्याध्यापक भास्कर खंडारे, पर्यवेक्षिका अंजली सपकाळ, क्रीडाशिक्षक शरद हिंगणकर, सहशिक्षिका कल्याणी चौधरी आदींची उपस्थिती लाभली. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे तपासणी अधिकारी प्रकाश अंधारे यांच्या संकल्पनेतून इयत्ता ५वी ते विद्यार्थ्यांना उन्हाळी १२ वीच्या सुट्टीसाठी वाचनासाठी पुस्तके देण्यात आली होती. या वाचनावर आधारित अनुभव विद्यार्थ्यांनी आपल्यामनोगतातून सादर केले. या उपक्रमात गुंजन उन्हाळे, एकता किरकाळे, भक्ती वाघ, आयुष खंडारे, प्रशिक तेलगोटे, गौरी राऊत, माही मेहरे, जानवी कात्रे, श्रेया रामेकर, चैताली हाडोळे आदी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# राज्यस्तरीय बुद्धीबळ स्पर्धेसाठी निवड चाचणीचे आयोजन;खेळाडूंनी सहभागी होण्याचे आवाहन

■अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

महाराष्ट्र बुध्दिबळ संघटनेशी संलग्नीत अकोला महानगर डिस्टीक्ट चेस असो. व प्रभात किड्सच्या संयुक्त विद्यमाने १३, १५, १७, १९, वर्षा आतील खुल्या गटातील मुला मुलीची राज्यस्तरीय बुध्दीबळ स्पर्धेसाठी निवड चाचणी चे आयोजन करण्यात आले आहे. केवळ अकोला जिल्ह्यासाठी आयोजित ही चाचणी दिनांक १९ जुलै व २० जुलै रोजी सकाळी ९ वाजता प्रभात किड्स स्कुल, पातुर रोड अकोला येथे आयोजित करण्यात आली असून यात १३, १५, १७, १९ वर्षाआतील व खुल्या गटातील मुलामुलीची बुध्दिबळ निवड चाचणी होणार आहे.दि १९ जुलै रोजी ९, १३, १७ व खुला गट वर्षाआतील गटातील स्पर्धा असुन दि २० जुलै रोजी ७, ११, १५, १९, या वयोगटातील स्पर्धा होऊन यामध्ये १३, १७ वर्षाआतील वयोगटात प्रथम २ मुलामुलीची निवड राज्यस्तरीय बुध्दिबळ स्पर्धेसाठी करण्यात येणार असुन १५, १९ वर्षाआतील गटात व खुल्या गटातील प्रथम ४ मुला मुलीची निवड करण्यात येणार आहे. ७,९ व ११ आतील मुलामुलीसाठी सराव बुध्दिबळ स्पर्धा होत असुन प्रत्येक गटातील प्रथम व द्वितीय क्रंमाकाना बक्षिस देण्यात येणार आहे. यामध्ये ७ वर्षाआतील गटात १ जानेवारी २०१८ नंतर जन्मलेले खेळाडु खेळु शकतात तर ९ वर्षा आतील गटात १ जानेवारी २०१६ च्या नंतर जन्मलेले खेळाडु खेळु शकतात. तर ११ वर्षा आतील गटात १ जानेवारी २०१४ नंतर जन्मलेले खेळाडु खेळु शकतात. तर १३ वर्षाच्या आतील गटात १ जानेवारी २०१२ नंतर जन्मलेले खेळाडु खेळु शकतात. तर १५वर्षा आतील गटात १ जानेवारी २०१० च्या नंतर जन्मलेले खेळाडु खेळु शकतात तर १७ वर्षां आतील गटात १ जानेवारी २००८ तर १९ वर्षा आतील गटात १ जानेवारी २००६ च्या नंतर जन्मलेले खेळाडू खेळु शकतात. या स्पर्धेसाठी एआयसीएफ नोंदणी असणे आवश्यक असुन अधिकृत जन्म प्रमाणपत्र आणणे आवश्यक आहे. स्पर्धे ची नाव नोंदणीची अंतीम तारीख १५ जुलै २०२५ असुन त्यानंतर प्रवेश दिला जाणार नाही. स्पर्धेचे आर्बिटर म्हणुन आंतरराष्ट्रीय आर्बिटर दिपक चव्हाण कामकाज बघणार आहेत. अधिक माहीती व प्रवेशासाठी जितेन्द्र अग्रवाल, ९०२८८ ३१३२२, सचिव अकोला महानगर डिस्ट्रीक्ट चेस असो. यांच्याशी साय ५ वाजे पर्यंत आरती अपार्टमेंट, गंगाधर प्लॉट, दिपक चौक व संदिप पुडकर, स्वस्तिक सायटिफफीक आशा स्विट मार्टच्या बाजुला बस स्टड जवळ अकोला याच्याशी संपर्क करून या स्पर्धे त जास्तीत जास्त खेळाडुनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

*आम्ही कोण म्हणून काय पुसता या वाक्याचा अर्थ आहे, तुम्ही कोण म्हणून काय विचारता? असा होतो. हे एक मराठीतील प्रसिद्ध वाक्य आहे, जे कवी केशवसुत यांच्या 'आम्ही कोण?' या कवितेतून घेतले आहे. म्हणूनच कवितेच्या सुरुवातीलाच केशवसुत आत्मविश्वासाने म्हणतात, आम्ही कोण म्हणून काय विचारता. आम्ही 'देवा'ची अत्यंत लाडकी अशी लेकरे आहोत. त्याने आम्हाला खेळण्यासाठी हे विश्वाचे आंगण दिले आहे, आमच्या प्रतिभेच्या जोरावर. आम्ही कोण? म्हणून काय पुसता दाताड वेंगाडुनी? आज केशवसुतांच्या कवितेची पुन्हा आठवण झाली व त्यांनी त्या काळात केलेली कविता किती दूरदृष्टीने केली होती, याचा प्रत्यय अवघ्या महाराष्ट्राला आला. आम्ही 'देवा'ची अत्यंत लाडकी अशी लेकरे हा शब्दप्रयोग कोणत्या 'देवा'ला अनुसरून वापरला होता हे कोडे कित्येक वर्षानंतर आज सुटले. धुमाकूळ घालणाऱ्या राज्यातील आमदार व मंत्र्यांना नियंत्रणात आणणे पृथ्वीवरच्या 'देवा'लाही शक्य झाले नाही. कारण एक आमदार कँटिनमध्ये 'चड्डी बनियान' गँगप्रमाणे राडा करतो, दुसरे मंत्री असलेले आमदार स्वत:च्याच बेडरुममध्ये पैशाच्या राशीत लोळतांना 'दम मारो दम' कार्यक्रम करतात. तिसरे 'ओम फट स्वाहा' फेम एक मंत्री भर अधिवेशनात तंबाखू खातात, चौथे एक मंत्री भर सभागृहात 'मातृदेवतेचे स्मरण' करून 'बाहेर ये तुझ्याकडे बघतो' ही दादागिरीची भाषा वापरतात. हे कमी पडले म्हणून की काय महाराष्ट्रातील एका खासदाराच्या परिवाराला अर्ज केल्यानंतर एका दिवसात दारूचे परवाने पटापट मिळतात. हे सर्वजण एकाच पक्षाचे आहेत, हा योगायोग मानायलाच हवा. महाराष्ट्राची मानहानी किती होत आहे, याबाबत मापन करणे देखील कठीण जाईल. आमदार निवासात जेवण निकृष्ट मिळाल्यावर आमदारांची मारहाण कायदेशीर ठरत असेल तर मुलांचे शालेय आहार निकृष्ट, शेतकऱ्यांना खत निकृष्ट, सरकारी बियाणे निकृष्ट, गावोगावी रस्ते निकृष्ट, पिण्याचे पाणी निकृष्ट, रेशन धान्य निकृष्ट मिळत असेल तर जनतेने मारहाण कोणाला करायची? हे पण सरकारने जाहीर करावे. विशेष म्हणजे उभी हयात 'सनातन' मध्ये घालवलेले कार्यकर्तेही जितके कट्टर बोलत नाहीत, जेवढी जातीयवादी गरळ ओकत नाहीत, तेवढी गरळ हे आमदार ओकतात. पण नितेश राणे, गोपीचंद पडळकर, संजय शिरसाट, संजय गायकवाड, सदाभाऊ खोत यांना नियंत्रणात आणणे त्यांच्या नेत्यांना शक्य असूनही त्यांनी डोळ्यावर पट्टी बांधलेली दिसते. राज्यावर दहा वर्षात नऊ लाख बत्तीस हजार कोटींचे कर्ज वाढले आहे. सत्तेतील सर्वजण हे बघत बसले आहेत. त्याचे समर्थनही करतात. कदाचित सत्तेतील लोक भ्रष्टाचाराच्या भीतीने चुकीच्या गोष्टीचे समर्थन करतात की काय अशी शंका जनतेला येत आहे. लोकशाहीच्या मार्गाने आलेले सरकार लोकांसाठी काम करते काय? यांनी सत्तेत येण्यासाठी पक्ष फोडले, निवडणुकीत अशा खोट्या घोषणा केल्या की त्या कधीच पूर्ण होणार नाहीत. विरोधकांवर खोटे गुन्हा दाखल केले, निवडणुकीत लक्ष्मीचा प्रचंड वापर केला असे अनेक उद्योग जनतेला माहीत झाले आहे. पण जनता करणार तरी काय?*

# आम्ही कोण म्हणुनी काय पुसता! आम्ही 'देवा'ची लाडकी अशी लेकरे



## महाराष्ट्र रसातळाला चालला त्याचे काय?

*एकनाथ शिंदे यांचे अनेक शिवेदार अचानक इतकी हिंदुत्ववादी झाले की, ज्यांच्या तीन-तीन पिढ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघात गेल्या ते लोकही इतके विखारी बोलत नाहीत. अनेकजण सध्या अती कडवे हिंदूत्ववादी झाले आहेत म्हणे. कडवट गरळ कोण ओकतो? याची स्पर्धाच लागली आहे. विधानसभेत व विधानसभेच्या बाहेर नेत्यांनी अशी भाषा वापरावी हे दु:खद आहे. त्यांची भाषा, त्यांची सध्याची वाटचाल समाजासाठी लाजिरवाणी ठरत आहे. त्यांनी राजकारणात जरूर मोठी उंची गाठावी, खुप मोठ-मोठी पदे उपभोगावीत. भविष्यात त्यांनी आमदार-खासदारच नव्हे तर मुख्यमंत्री, प्रधानमंत्री व्हावे. पण खाल्ल्या ताटात घाण करून नव्हे. जो विचार घेवून राजकारण सुरू केले त्या विचाराशी आणि ज्या माणसांनी त्यांच्या छातीत, पावलात बळ भरले त्यांच्याशी प्रतारणा करू नये. ज्या लोकांनी त्यांना या उंचीवर नेले त्याच लोकांच्या छाताडात त्यांनी सुरा खुपसू नये. आपल्या राजकीय स्वार्थासाठी विस्थापितांच्या, उपेक्षितांच्या आशा-अपेक्षांना त्यांनी आग लावू नये. त्या आधी स्वत:च्या अंत:करणात डोकावून पाहीले पाहीजे. आपण खरंच हिंदू धर्म जगतो का? खरंच हिंदू धर्माप्रमाणे वागतो का? हे तपासावं मग हिंदूत्वावर बोलावं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नियंत्रणा बाहेर शिंदे गट गेला आहे. त्याला नियंत्रणात आणणे त्यांच्या पक्षालाही शक्य नाही. कारण त्यांचे मूठभर खासदार दिल्लीत सरकारला टेकू देत आहे, याची त्यांना जाणीव आहे. परंतु महाराष्ट्र रसातळाला चालला त्याचे काय?*

पैशाची प्रचंड मस्ती आलेले एक मंत्री जे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आहे, परंतु त्यांच्याही नियंत्रणा बाहेर गेले आहे, त्यांचे नाव चंद्रकांत शिरसाट. त्यांना आधी आयकर विभागाची नोटीस आली आणि आता पैशांच्या बॅगेचा व्हिडीओ संजय राऊतांनी जगजाहीर केला. एकनाथ शिंदेंचे शिलेदार आणि सामाजिक (?) न्यायमंत्री संजय शिरसाट अडचणीत सापडले आहेत, असे अनेकांना वाटत असले, तरी तसा गैरसमज कुणी करून घेवू नये. शिरसाटांच्या घरातल्या बेडरूममधला हा व्हिडीओ समोर आला. या व्हिडीओत दोन बॅगा दिसत आहेत. त्यापैकी एका बॅगेत नोटांची बंडलं असल्याचा दावा ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊतांनी केला. हा व्हिडीओ राऊतांनी आपल्या ट्विटर हँडलवरूनही ट्विट केला. हा व्हिडीओ आपल्याच बेडरूममधला असल्याचं संजय शिरसाटांनी मान्य केलं. पण पैशांची बॅग आपली असल्याचा आरोप त्यांनी फेटाळला. मग प्रश्न असा पडतो की त्यांच्या घरात पैशाने भरलेली बॅग कोणी आणली किंवा पाठविली? त्याबाबतची माहिती त्यांना नसेल तर ती पैशाची बॅग पोलीस ठाण्यात त्यांनी स्वतः नेऊन दिली पाहिजे होती. त्यांचा मुलगा सिद्धांतचे विवाहित महिलेसोबतचे संबंध जाहीर झाले. त्यानंतर हॉटेल विट्सच्या लिलावातून त्यांना बाहेर पडावं लागलं. त्यानंतर लगेच आयकर विभागाने त्यांना नोटीस पाठवली. आता बेडरुममधील पैशांच्या बॅगचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. संजय शिरसाट हे या आधीही वेगवेगळ्या प्रकरणांमुळे अडचणीत आले. पण त्यांना मंत्रिमंडळातून वगळण्याची हींमत मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस करू शकले नाही. शिरसाटांकडून संभाजीनगरातील वीट्स हॉटेलच्या खरेदीत अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला. मुळात हॉटेलची किंमत शंभर कोटी पेक्षा जास्त असताना शिरसाटांसाठी लिलावात किंमत कमी दाखविली होती. कंपनी लिलावात सहभागी होण्यास पात्र नसतांनाही मंत्रीपुत्राने आपल्या बापाच्या भरवशावर उद्योग केला. त्यांच्या अनेक उद्योगापैकी एक उद्योग म्हणजे शेंद्रा एमआयडीसी मधील जमिनीचा मुळ हेतू ट्रक टर्मिनससाठी आरक्षित जागेसाठी होता. मात्र आरक्षण बदलून संजय शिरसाट यांनी मुलाच्या नावे जमीन विकत घेतल्याचे बोलले जाते. छत्रपती संभाजीनगर शहरालगत वर्ग २ ची जमीन नियमबाह्य खरेदी केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. कोट्यवधीची जमीन कवडीमोल किमतीत घेतल्याचा आरोप आहे. शहरातील मुख्य रस्ता असलेल्या जालना



रोडवरील जमीन शिरसाटांनी अत्यंत कमी किमतीत खरेदी केल्याचाही आरोप झाला आहे. नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे जमीन खरेदी केल्याचीही चर्चा आहे. मुलगा सिद्धांत शिरसाट यांच्यावर एका विवाहित महिलेने गंभीर आरोप केले. सिद्धांतने मानसिक आणि शारीरिक छळ केल्याचा आरोप करण्यात आला. नंतर त्या महिलेने ते आरोप मागे घेतले. हे आमचं 'पर्सनल मॅटर' असल्याचं तिने स्पष्टीकरण दिलं होतं. पण हे 'पर्सनल मॅटर' एका क्षणात संपल्यामागची बातमी जनतेपर्यंत केव्हाच पोहोचली आहे. दुसरीकडे शिवसेनेचे खासदार संदीपान भुमरेंची भावजय आणि पीएच्या देशी दारू दुकानांच्या परवान्यांवरून गंभीर आरोप करण्यात करण्यात आला. या देशी दारू दुकानांना एकाच दिवसात परवानगी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. भुमरेंच्या दारू दुकानांना वायूवेगानं परवानगी कशी मिळते, असा सवालही उपस्थित केला जात आहे. छाया भुमरे यांनी खरेदी केलेल्या मुद्रांक शुल्कावर स्वयंघोषणापत्र सादर केले. त्याच दिवशी उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षकांनी छाया भुमरे यांच्या परवान्याबाबत घेतलेला ठराव वैध आहे का, याची विचारणा करणारे पत्र गंगापूर गटविकास अधिकाऱ्यांना दिले. त्यांनी त्याच दिवशी हा अर्ज वैध असल्याचं टपालानं कळवलं. या अर्जावर अतिशय झटपट म्हणजे दुसऱ्या दिवशी रोजी राज्य उत्पादन शुल्क उपअधीक्षकांनी समक्ष जबाब घेतल्याची स्वाक्षरी केली. विशेष म्हणजे त्याच्या आठ दिवसांपूर्वीच छाया भुमरे यांनी १ डिसेंबर २०२३ रोजी मुंबईतल्या ओशिवरा व्हिलेजमधील डिसोझा बारचा




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

नूतनीकरण केलेला परवाना स्थलांतर करण्यासाठी अर्ज केल्यानंतर पुढच्या आठ दिवसांत त्यांना परवाना मिळाला. दारुच्या दुकानासाठी अख्खी यंत्रणा कामाला लागल्याचे दिसले. सर्वसामान्य लोकांसाठी यंत्रणा इतक्या वेगानं काम करणार का? इतरांना दारू दुकानाच्या परवान्यांसाठी वर्षभर खेटे मारावे लागतात. मात्र भुमरेंना एका दिवसात परवाने देण्याची कृपा कशी झाली? पण काहीही होणार नाही कारण भुमरे सत्तेत आहे. उद्या कुणी त्यांना सवाल केलाच तर 'आम्ही कोण' आहे, असे ते उर्मटपणे म्हणतीलही.

# कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांनी काबाडकष्ट करावे आणि राजकीय पुढाऱ्यांनी ऐश आराम करावे हा कुठला न्याय?

शेतकरी हा राबराब राबतो व मेहनत करतो उन, पाऊस, वादळ, सुनामी, अवकाळी पाऊस यांच्याशी संघर्ष करतो तेव्हा त्यांच्या शेतातून धान्य पिकते व उत्पादन होते.अशाप्रकारे अनेक संघर्ष दरवर्षी करीत असतो व जनतेच्या पोटाची खळगी भरण्याचे काम करतो.परंतु आलेल्या पिकाला योग्य भाव मिळेल की नाही याचीही त्याला चिंता असते.कारण पहिलेच तो कर्जामध्ये डुबलेला असतो व परिवार चालविण्यास अडचण निर्माण होते अशा परिस्थितीत शेतकरी आत्महत्या करतांना दिसतात.आज शेतकऱ्यांच्या शेतीची किंमत लावली तर करोडोंची असुन सुद्धा तो गरीबीत वावरतो आणि राजकीय पुढारी मात्र पाच वर्षात आपोआप करोडपती होतात त्यामुळे त्यांना शेतकऱ्यांच्या खऱ्या वेदना राजकीय पुढारी समजूच शकत नाही.कारण राजकीय पुढाऱ्यांवर कधी आत्महत्येची पाळीच येत नाही.शेतकरी वर्ग आत्महत्या करणार नाही अशा योजना सरकारने अमलात आणायला पाहिजे.शेतकरी कष्ट करतो तरी पैशांनी शुन्य! राजकीय पुढारी समाजसेवा करतात म्हटले जाते,मग हे कसे काय करोडपती होतात? असाही प्रश्न उपस्थित होतो!आज राज्यासह देशातील शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत बीकट आहे.कारण आज कोणाजवळ, बैलबंडी नाही तर कोणाजवळ शेती करण्यास पैसा नाही असेही अनेक शेतकरी राज्यासह देशात दिसून येतात.शेतकरी शेतीने व मनाने कितीही मोठा असला तरी मात्र पैशांनी अत्यंत कमकुवत आणि गरीब आहे. त्यामुळेच आज शेतकरीवर्ग मोठ्या प्रमाणात आत्महत्या करतांना दिसतात हे कृषिप्रधान देशाचे व स्वतंत्र भारताचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.या उलक आपण विचार केला तर देशासह राज्यातील आजी-माजी आमदार-खासदार-मंत्री यांच्या जवळ मोठ्या प्रमाणात शेती व चल-अचल संपत्ती दिसून येते व आज करोडपती आहेत याला कोणते व कसले समाजसेवक म्हणावे!ही बाब देशाला व देशाच्या १४० कोटी जनतेला अजून पर्यंत समजलीच नाही. आज आमदार-खासदार-मंत्री करोडोंचे घोटाळे करतात व यांना सरकार आणि न्यायपालिकेकडुन



क्लिनचीट मिळते व राज्याचे मंत्री म्हणून पुन्हा विराजमान होतात हे कोणते समाज सेवक म्हणावे!आज राजकीय पुढारी सर्वसामान्य जनतेच्या डोळ्यात धूळफेक करीत आहे व मेहनत न करता करोडोंची चल-अचल संपत्ती जमा करीत आहे हे लोक एवढी संपत्ती जमा करून ठेवतात की सात पिढ्या बसुन खावु शकेल.परंतु शेतकरी राबराब राबतो दिवसरात्र काबाडकष्ट करून १४० कोटी जनतेच्या पोटाची खळगी भरतो अशा अन्न दात्यावर आज आत्महत्येची पाळी येते ही कीती लाजीरवाणी गोष्ट म्हणावी! म्हणजे आज शेतकरी उपाशी आणि राजकीय पुढारी तुपाशी असल्याचे स्पष्ट दिसून येते.आज भारत स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झालीत तरीही कृषिप्रधान देशातील शेतकरी गरीबीच्या खाईत गुदमरत आहे आणि जेव्हा गरीबी आपली सिमा रेषा ओलांडते तेव्हाच शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ येते. महाराष्ट्रासह देशातील कोणत्याही राज्य सरकारांनी शेतकऱ्यांच्या बाबतीत ठोस असे कोणतेही पाऊल उचलले नाही जर उचलले असते तर शेतकऱ्यांवर आत्महत्ये वेळ कदापि आलीच नसती.परंतु आपल्या देशात उलट आहे जे मेहनत आणि काबाडकष्ट करतात तो शेतकरी दिवसेंदिवस गरीबीच्या खाईत दबत आहे व राजकीय पुढारी दिवसेंदिवस अती श्रीमंत होतांना दिसत आहे.आज राजकीय पुढाऱ्यांजवळ येवढा पैसा आहे की देशाला तब्बल दहा वर्षे कोणाही जवळुन कर्ज घेण्याची गरज नाही.राजकीय पुढारी समाज सेवा करतात असे म्हटल्या जाते मग समाजसेवा करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांजवळ येवढा पैसा येतो कोठून यांच्यावर आत्महत्येची पाळी का येत नाही? यावरून स्पष्ट होते की राजकीय पुढाऱ्यांना अमाप पगार वाममार्गाने पैसा कमविण्याची योग्य सुविधा या सर्वांच उपलब्ध असतात.त्यामुळे यांचे पाप शेतकऱ्यांना भोगावे लागते व आत्महत्येची वेळ येते ही अत्यंत गंभीर बाब आहे यावर सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.आज नंदुरबार जिल्ह्या सारखे अनेक जिल्हे राज्यात आहेत की त्या ठिकाणी सरकारकडून मुलभूत सुविधा अजून पर्यंत उपलब्ध नाहीत. तरीही सरकार फक्त घोषणांचा पाऊस पाडतात व बघ्याची भूमिका घेतांना दिसतात.असे अनेक जीवंत उदाहरण आपण सर्वांनीच पाहिले.राज्यात किंवा देशात कोणतीही सरकार असो ते सर्व एकाच माळेचे मणी असतात.कारण आपण शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा विचार केला तर २००४ ते २०१३ या १० वर्षात ३६८४८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या तर २०१४ ते २०२४ या ११ वर्षाच्या कालावधीत ४०९८२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या यावरून आपण समजू शकतो की शेतकऱ्यांची कीती भयावह स्थिती आहे.कारण शेतकऱ्यांच्या गंभीर व बिकट परिस्थितीमुळे त्यांच्या आत्महत्या थांबता-थांबेना! परंतू राजकीय पुढारी मात्र समाजसेवेच्या नावावर मस्त मजा करतांना दिसतात त्यामुळे यांच्यावर आत्महत्येची पाळी येतच नाही.कारण हे सर्वच शेतकऱ्यांचे रक्त पितांना दिसतात.ज्याप्रमाणे देशात व राज्यात राजकीय पुढाऱ्यांचे कमाईचे साधन आहे तसे साधण शेतकऱ्यांजवळ नसल्याने त्यांच्यावर आत्महत्येची पाळी येते.त्यामुळे हे मायबाप सरकार राजकीय पुढारी कधीच आत्महत्या करीत नाही त्याचप्रमाणे शेतकरी सुध्दा आत्महत्या करणार नाही अशी काही तरी योजना सरकारने ताबडतोब अंमलात आणावी याचे राज्याच्या जनतेसह देशाची जनता स्वागतच करेल.शेतकरी हा मनाने एवढा श्रीमंत आहे की आपण त्याची कल्पना सुद्धा करू शकत नाही. परंतु पैशांने मात्र शुन्य आहे ही मोठी तफावत शेतकरी आणि राजकीय पुढारी यांच्यात दिसून येते.राजकीय पुढारी समाजसेवेच्या नावाखाली करोडो रुपये कमवितात व शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करतात.यावर महामहीम राष्ट्रपती, प्रधानमंत्री, उपराष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष, कृषीमंत्री,केंद्र सरकार व संपूर्ण राज्य सरकारांनी जातीने लक्ष देण्याची गरज आहे.कारण शेतकरी जगला तरच आपण जगू.त्यामुळे शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत करणे काळाची गरज आहे.जय जवान जय किसान; जय हिंद.



रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार) नागपूर.
मो.नं.९९२१६९०७७९

# युवापिढी ऑनलाइन जुगारच्या विळख्यात

सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे आणि या तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल ही जीवनावश्यक गरज बनली आहे. आजची तरुण पिढी मोबाईलच्या इतकी आहारी गेली आहे की या तरुणांना मोबाईलचे व्यसनच जडले आहे. आज प्रत्येक तरुणाकडे स्मार्टफोन आहे. या स्मार्टफोनमध्ये इंटरनेटवर चालणारे अनेक प्रकारचे गेम असतात. या गेमने तरुणांना अक्षरशः वेड लावले आहे. कॅण्डी क्रश, ब्ल्यू व्हेल, अँग्री बर्ड, पोकोमेन, पब्जी असे ऑनलाइन गेम इंटरनेटवर धुमाकूळ घालत आहेत. ऑनलाइन रमी गेम हा देखील त्यापैकीच एक गेम. या ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात तरुणाई अडकली आहे. ऑनलाइन रमी गेम खेळण्याचे वेड तरुण पिढीला आर्थिक नुकसान करणारे ठरत आहे. मोबाईलवर खेळला जाणारा हा गेम म्हणजे एकप्रकारचा जुगाराच आहे. हातात असलेल्या मोबाईलवर ऑनलाइन रमी खेळण्याचे अनेक एप्लिकेशन उपलब्ध आहेत. घरी, शेतात, नोकरी, व्यवसायाच्या ठिकाणी अनेकजण एकत्र येऊन ऑनलाइन रमी खेळताना दिसत आहे. ऑनलाइन रमी हा एकप्रकारचा जुगार असून या जुगारात तरुण पिढी पुरती अडकली असून त्यांना त्यातून बाहेर काढण्याऐवजी चित्रपट तारे आणि क्रिकेट खेळणारे खेळाडू या ऑनलाइन रमी गेमची टीव्हीवर जाहिरात करून तरुण पिढीला जुगारच्या गर्तेत ढकलत आहे. चित्रपट तारे असोत की क्रिकेटपटू हे तरुणांचे आयडॉल असतात. त्यांच्या सर्व गोष्टींचे तरुण मुले अनुकरण करत असतात म्हणूनच ऑनलाइन रमी चालवणाऱ्या कंपन्या या सिलिब्रेटींना करोडो रुपये देऊन आपली जाहिरात करायला लावतात मात्र या सिलिब्रेटींनी आपण पैशासाठी तरुण पिढीला कोणत्या मार्गावर नेत आहोत याचा विचार करावा. केवळ पैसे कमावणे हा सिलिब्रेटींचा उद्देश नसावा सामाजिक दायित्व देखील तितकेच महत्वाचे आहे. चित्रपट तारे आणि क्रिकेटर यांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून ऑनलाइन रमीच्या जाहिराती बंद कराव्यात. ऑनलाइन जुगारच्या विळख्यात अडकल्याने तरुणांना मोठ्या आर्थिक नुकसानिस सामोरे जावे लागत आहे. ऑनलाइन रमी गेमच्या नादाला लागून अनेकजण कंगाल झाले आहेत. ऑनलाइन रमी गेममुळे



अनेक कुटुंबे उध्वस्त होत आहेत. ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात अडकल्याने अनेक कुटुंबे बेघर झाले आहेत. ऑनलाइन रमी खेळून अनेक तरुण कर्जबाजारी झाली आहेत. ही कर्जे फेडण्यासाठी पालकांनी आपली घरे व शेती विकली आहे. सहज पैसे कमवण्याचे आमिष दाखवून लोकांच्या घामाची कमाई लुटली जात आहे. ऑनलाइन रमी खेळताना पैसे हरल्याने तरुणांमध्ये नैराश्य येत आहे. यातून काही तरुणांनी आत्महत्या देखील केल्या आहेत. या गेममुळे हिंसाचार देखील वाढला आहे. दक्षिणेकडच्या राज्यांनी ऑनलाइन गेमवर बंदी घातली आहे. कर्नाटक सरकारने तसा कायदाच केला आहे. केरळ, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा राज्यातही ऑनलाइन रमीवर बंदी आहे. पुरोगामी महाराष्ट्रात मात्र अजूनही ऑनलाइन रमीवर बंदी नाही. गेल्या वर्षी झालेल्या पावसाळी अधिवेशनात देखील हा प्रश्न चर्चेत आला होता मात्र न्यायालयाने ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिल्याचे सरकारतर्फे सांगण्यात आले. न्यायालयाने जरी ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिला असला तरी महाराष्ट्र सरकारने अध्यादेश काढून तसा कायदा करावा. सरकारकडे प्रचंड बहुमत आहे शिवाय विरोधी पक्ष देखील या अध्यादेशाला पाठिंबाच देतील त्यामुळे अध्यादेश काढून ऑनलाइन रमीवर बंदी घालण्याचा कायदा महाराष्ट्र सरकारला करता येऊ शकतो. राज्यातील तरुणांना ऑनलाइन रमी या जुगारातून वाचवायचे असेल आणि तरुणांना ऑनलाइन जुगाराच्या विळख्यातून सोडवायचे असेल तर महाराष्ट्र सरकारने ऑनलाइन रमीवर बंदी घालणारा कायदा करायलाच हवा.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# प्रभूचा ई-मेल :

संत राजिन्दर सिंह जी महाराज

आधुनिक तंत्रज्ञान उपकरणे जसे कम्प्युटर, स्मार्टफोन, टॅबलेटस आणि इतर विकसित साधनांचा प्रसारामुळे या डिजिटल प्रकारामुळे माणसं एक दुसऱ्यांच्या जवळ येत आहेत. अधिक तर माणसं जेव्हा ते एक दुसऱ्यांना भेटू शकत नाही किंवा फोनवर बोलू शकत नाही, तेव्हा ते ई-मेल किंवा टेक्स्ट मेसेज द्वारे संवाद साधतात. कोणत्याही नवीन शोधामुळे नेहमी सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही प्रकारचा प्रभाव होत असतो. हे तथ्य ई-मेल आणि टेक्स्ट मेसेज यासारख्या शोधावर सुद्धा लागू होते.

या माध्यमामुळे आपण आपल्या प्रियजन, परिवार आणि मित्राच्या संपर्कात येत असतो परंतु सोबत आपण काही अवांछित संदेश किंवा नकारात्मक मेसेज मिळत असतात. पुष्कळ निरुपयोगी जाहिराती असू शकतात, जे आपल्या कॉम्प्युटर किंवा फोनच्या इनबॉक्स मध्ये भरले जातात. काही जाहिराती आपल्याला हितचिंतक भासवून आपल्याला काही वस्तू विकू इच्छितात. काही वेळा हैकर आपल्याला इतर माणसाच्या नावे ई-मेल पाठवतात, ज्याच्याशी आपला परिचय आहे. त्यामुळे आपल्या कंप्यूटर मध्ये व्हायरस टाकू शकतात. इतर जे माणसं असतात, त्यांना आपण ओळखत नाही परंतु ते आपल्याला त्रास देण्यासाठी ई-मेल पाठवीत असतात. त्याचे मूळ स्तोत्र कोणतेही असो परंतु जी महत्त्वपूर्ण माहिती आपण ठेवण्याचा प्रयत्न करतो, ते निरुपयोगी अथवा अवांछित ई-मेल मधुन शोधण्याचा बराच वेळ निघून जातो. काहीवेळा महत्त्वाची माहिती काढण्यासाठी आपण त्रस्त होतो, कारण ज्या माहितीला आपण एक किंवा दोन मिनिटात वाचू शकतो किंवा इतरांना पाठवू शकतो, त्या माहितीला आपण एकत्र आलेल्या शेकडो अनावश्यक संदेश मधून काढून शोधून टाकावे लागते.

आपण निरुपयोगी संदेशांना दुर्लक्षित करू शकत नाही कारण हे वाईट मैसेज आपल्या कम्प्युटरच्या हार्ड डिस्कच्या मेमरीज व्यापतात. जेव्हा असे होते, त्यावेळी आपला इनबॉक्स भरून जातो. आपण दुसरे इतर आवश्यक मेसेज प्राप्त करू शकत नाही, ते वास्तविक आपल्या हवे असतात. अशा वेळी आपण काही तास निरोपयोगी आणि अवांछित संदेशांना घालविण्याचा प्रयत्न करतो आणि आपला दिवस व्यर्थ निघून जातो.

ही स्थिती आपल्या अध्यात्मिक मार्गला सुद्धा दर्शवित आहे. प्रभु आपल्याला आपल्या घरी परत बोलवण्यात करिता अंतरिक ज्योती आणि श्रुतीच्या रुपाने ई-मेल / संदेश पाठवत आहेत. अशा ई-मेलला प्राप्त करण्यासाठी आपल्याला ध्यान-अभ्यासाला बसण्याची आवश्यकता आहे. प्रभूची तेजपुज्य ज्योती आणि श्रुती एक विशेष प्रकारचा ई-मेल आहे परंतु या व्यतिरिक्त आपण संसारा कडून प्राप्त होणाऱ्या अवांछित संदेशावर वेळ खर्च करत आहोत. आपले मन मानत नाही की आपण प्रभूकडे परत जावे परंतु आपले ध्यान प्रभुच्या ऐवजी संसारात रमावे यासाठी मन निरूपयोगी मेल्स, बाहेरच्या जगाचे आकर्षणाचा महापूरात ढकलीत आहे. जेव्हा आपण बाहेरच्या आकर्षणामध्ये दंग होऊन जातो, तर आपण आपल्या अंतरी त्या ज्योती आणि श्रुतीच्या संपर्कात राहत नाही. परंतु जेव्हा आपला आत्मा ध्यान-अभ्यासा द्वारे पाठवल्या गेलेल्या ई-मेलला जोडला आहे, तेव्हा ती अंतरीय सुख, आनंद आणि परमानंदाने भरून जाते.

# परिस्थितीला दोष देण्यापेक्षा तिच्यावर हिंमतीने मात करा

आजकाल प्रतिकूल परिस्थितीवर मात करून हिंमतीने जीवन जगण्यापेक्षा व यशाला काबीज करण्यापेक्षा परिस्थितीला दोष देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सध्या समाजात खूप वाढली आहे. उच्च शिक्षण घेण्यासाठी किंवा चांगल्या कॉलेजला प्रवेश घेण्यासाठी बहुतांश विद्यार्थी आपली आर्थिक परिस्थिती तेवढी सक्षम नाही म्हणून परिस्थितीला दोष देत अर्ध्यावर शिक्षण सोडून घरी बसले आहेत. आहे त्या परिस्थितीवर मात करून उच्च शिक्षणाचा पर्वत लीलया सर करायचा सोडून, परिस्थितीला दोष देणे हा आपला वैयक्तिक कमीपणा ठरू शकतो. आपल्यात त्या परिस्थितीचा सामना करण्याची हिंमत व धाडस नाही, असेच म्हणावे लागेल. अशा मुलांना जर एखाद्याने विचारले, बाबा तू अर्ध्यावर शिक्षण सोडून घरी का बसलास? तुला पुढील उच्च शिक्षण शिकू वाटत नाही का? तेव्हा ती मुले म्हणतात की, अहो काका माझी उच्च शिक्षण शिकायची व मोठ्या पदावर रुजू व्हायची खूप इच्छा आहे, पण माझी आर्थिक परिस्थिती हालाखीची व कमकुवत असल्यामुळे मी पुढील उच्च शिक्षण घेऊ शकत नाही. माझे आईवडील गरीब आहेत. शेतात काबाडकष्ट करून कसाबसा घर प्रपंच चालवतात. आणि माझ्या शिक्षणाला पैसा पुरवतात. मला उच्च शिक्षण शिकवण्यासाठी ते आता कुठवर पैसा पुरवतील? आणि मी तरी कुठवर त्यांच्या जीवावर शिक्षण शिकू? असे बोलून ते मोकळे होतात. असे बोलणे त्या मुलाचे कदाचित खरे आहे. पण परिस्थितीला दोष देणे त्या मुलाचे अनुचित आहे. शिक्षण शिकण्यासाठी माणसाला परिस्थिती कधीच आड येत नाही. माणूसच परिस्थितीला घाबरून माघार घेतो. आणि परिस्थितीला दोष देत बसतो. बहुतांश विद्यार्थी म्हणतात की, आई-वडिलांची परिस्थिती मला शिकवण्या एवढी सक्षम नाही, म्हणून मी शिक्षण शिकायचे थांबवले आहे. पण विद्यार्थ्यांच्या मनात असे का येत नाही की, आपण काम करत करत शिकून यश मिळवले पाहिजे. कष्ट करून स्वतःच्या जीवावर शिक्षण घेऊन यश मिळवणारे व मोठ्या पदावर रुजू होणारे या जगात खूप लोक आहेत. त्यांनी परिस्थितीला कधीच दोषी ठरवले नाही. त्यांच्यात काम करून शिकण्याची धमक होती. म्हणून ते यशस्वी झाले. तुमच्यात काम करून शिकायची धमक नाही म्हणून तुम्ही परिस्थितीला दोषी ठरवत आहात. श्रीमंत घरातील मुले कधीच यशस्वी होऊन मोठ्या पदावर रुजू होत नाहीत. ज्यांना आई-वडिलांच्या कष्टाची व गरिबीची जाणीव आहे, आई-वडिलांचा जीवन संघर्ष ज्ञात आहे, तीच मुले प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशाचे उंच शिखर गाठतात. स्वतःच स्वतःच्या जीवनाला घडवतात. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून शिकणारी गरीब घरातील होतकरू मुलेच कोणत्याही परीक्षेत श्रीमंत मुलांच्या पुढे असतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर अतिशय गरीब घरातून मोठ्या उंचीवर पोहोचलेलं एक जबरदस्त व्यक्तिमत्व तरुणांसाठी प्रेरणास्थान व आदर्श आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर परिस्थितीला दोष देत बसले असते, तर कधीच आधुनिक भारताचे राष्ट्र निर्माते व भारतीय घटनेचे प्रमुख शिल्पकार झालेच नसते. डॉ.बाबासाहेबांएवढी बिकट परिस्थिती हल्ली आमच्या कोणत्याच युवकाची नाही, बाबासाहेबांना शिक्षण शिकत असताना किती आर्थिक संकटांना तोंड द्यावे लागले? जातीयतेचे किती विखारी चटके सहन करावे लागले? बाबासाहेबांमुळेच आज आपल्याला यशाचा मार्ग सोपा व सुखकर झाला आहे. तरीपण आजकालची मुले परिस्थितीला दोष देऊन शिक्षणाला रामराम ठोकत आहेत. मेंढपाळ कुटुंबातील बिरदेव डोने हा मुलगा प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आयपीएस अधिकारी झाला आहे. तो युवकांसाठी आदर्श व दीपस्तंभ ठरला आहे. त्याची प्रेरणा आमच्या युवकांनी घेऊन प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशाला काबीज केले पाहिजे. आपल्या देशात असे कितीतरी महात्मे होऊन गेले आहेत, की त्यांनी परिस्थितीला दोष न देता, प्रतिकूल परिस्थितीवर हिंमतीने मात करून यशाला गवसणी घातली आहे. या महापुरुषांचा जीवन संघर्ष व त्यांचा जीवन प्रवास आपण पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञात करावा आणि परिस्थितीला न दोष देता, तिच्यापुढे न डगमगता हिंमतीने तिचा सामना करावा...आणि यशाला आपल्याकडे खेचून घ्यावे... कारण परिस्थितीच आपल्याला घडवत असते...परिस्थितीची जाणीव ठेवून आपण खूप खूप अभ्यास केला पाहिजे... आई-वडिलांवर तेवढे अवलंबून न राहता स्वतःच्या जीवावर कष्ट करून शिकले पाहिजे... कारण जो मनुष्य स्वतःच्या हिमतीवर, कष्ट करून शिकतो आणि परिस्थितीला झुकवून मोठ्या उंचीवर पोहोचतो, त्याची इतिहास सुद्धा नोंद घेतो...हे लक्षात असू द्या...

बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर
मो.७४९८७९५६६१

# गरे पालमा सेक्टर-दोन कोळसा खाण : छत्तीसगड आणि भारताच्या ऊर्जा स्वावलंबन आणि समावेशक विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल

**मुंबई, १३ जुलै :** महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) तर्फे छत्तीसगडच्या रायगड जिल्ह्यात विकसित केल्या जाणाऱ्या गरे पालमा सेक्टर-दोन कोळसा खाण प्रकल्प उभारणीकरिता आवश्यक सर्व परवानग्या सरकारकडून प्राप्त झाल्या असून, या कोळसा खाणीमधून लवकरच प्रत्यक्ष कोळसा उत्पादन सुरू करण्यात येणार आहे. गरे पालमा सेक्टर-दोन कोळसा खाण हा प्रकल्प देशाची ऊर्जा गरज पूर्ण करण्याबरोबरच छत्तीसगड राज्याच्या रोजगार आणि पायाभूत विकासाच्या संधींना चालना देण्यास उपयुक्त ठरणार आहे.

या प्रकल्पांतर्गत सुमारे ६५५.१५ दशलक्ष टन कोळसा साठ्याचा वापर केला जाणार असून याची कमाल उत्पादन क्षमता २३.६ दशलक्ष मेट्रिक टन प्रति वर्ष आहे. या प्रकल्पाकरिता एकूण ७६४२ कोटींची गुंतवणूक केली जात आहे. याशिवाय, छत्तीसगड राज्याला कोळसा खाण संचालन कालावधीत रॉयल्टी, जिल्हा खनिज निधी, जी.एस.टी. आणि इतर शुल्कांद्वारे सुमारे २९ हजार कोटींचा महसूल प्राप्त होईल.

या प्रकल्पांतर्गत सुमारे ३,४०० थेट रोजगार निर्माण होणार असून याव्यतिरिक्त, खाणकाम, वाहतूक, बांधकाम, खाद्य व्यवस्था, सुरक्षा, पुरवठा साखळी आणि इतर सेवा क्षेत्रांत अनेक अप्रत्यक्ष रोजगार संधी उपलब्ध होणार आहेत.

हा प्रकल्प सुरू करण्यासाठी अनेक नियामक प्रक्रिया आणि मान्यता टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात आल्या. २०१५ मध्ये भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाने महानिर्मितीला गरे पालमा सेक्टर-दोन कोळसा ब्लॉकचे वाटप केले. खाण पट्टा हस्तांतरणसाठी २०१५ मध्ये महानिर्मितीतर्फे अर्ज सादर करण्यात आला आणि २०१६ मध्ये या योजनेला मान्यता मिळाली. पर्यावरणीय मान्यता (ईसी) साठी महानिर्मितीतर्फे १२ एप्रिल २०१६ रोजी अर्ज सादर करण्यात आला आणि सन २०१९ मध्ये जनसुनावणी आयोजित केली गेली. ११ जुलै २०२२ रोजी या प्रकल्पाला पर्यावरणीय (ईसी) मान्यता मिळाली तर वन मंत्रालयाकडून स्टेज- आणि स्टेज- मान्यता अनुक्रमे २ जून २०२२ आणि २७ जानेवारी २०२३ रोजी प्राप्त झाल्या.

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

गरे पालमा सेक्टर-दोन कोळसा खाणकरिता अंतिम वन अनुज्ञा २७ ऑगस्ट २०२४ रोजी छत्तीसगड राज्य सरकारकडून प्रदान करण्यात आली. प्रकल्पासाठी एफसी स्टेज- आणि स्टेज- च्या मान्यता अनुक्रमे २०२२ आणि २०२३ मध्ये देण्यात आल्या.

महानिर्मितीतर्फे प्रकल्प क्षेत्रामध्ये सांधिक सामाजिक जबाबदारी (सी.एस.आर.) अंतर्गत छ३५ कोटींच्या प्रारंभिक योजनेसह विविध विकास कामे सुरू करण्यात आली आहेत. याशिवाय, भविष्यात दरवर्षी निव्वळ उत्पन्नाच्या २% निधी हा स्थानिक विकासासाठी वापरण्यात येणार आहे. यामध्ये शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पायाभूत सुविधांचा विकास, प्रशिक्षण, उपजीविका सहाय्य आणि सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन देणे यांचा समावेश आहे.

१४ गावांना प्रभावित करणारा हा प्रकल्प सर्वसमावेशक पुनर्वसन आणि पुनर्स्थापन योजनेच्या माध्यमातून राबवला जात आहे, ज्यामध्ये १६७९ कुटुंबांना निर्धारित धोरणानुसार पुनर्वसन करण्यात येणार आहे. या सर्व कुटुंबांनी सामाजिक आणि आर्थिक उत्थानाच्या दिशेने सकारात्मक पाऊल उचलत या प्रक्रियेत सक्रियपणे सहभाग घेतला आहे, ज्यामुळे त्यांना सुधारित जीवनशैली, रोजगार संधी आणि मूलभूत सुविधा उपलब्ध होणार आहेत.

पर्यावरण संरक्षण आणि शाश्वतता लक्षात घेऊन, महानिर्मितीने खाण प्रकल्पाच्या संपूर्ण कालावधीत व्यापक पर्यावरण व्यवस्थापन योजना अंतर्गत हरित पट्टा विकास, वृक्षारोपण, जलसंवर्धन, प्रदूषण नियंत्रण आणि कोळसा उत्पादनानंतर जमीन सुधार यांसारख्या कार्यांसाठी महत्त्वपूर्ण गुंतवणुकीचा प्रस्ताव ठेवला आहे.

रायगड जिल्हा हा छत्तीसगडची ऊर्जा राजधानी म्हणून ओळखला जातो, जिथे साउथ ईस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड अंतर्गत ४ सक्रिय कोळसा खाणी आणि १ खाण विकासक आधारित ओपन कास्ट प्रकल्प कार्यरत आहेत. हे क्षेत्र कोळसा उत्पादनात अग्रगण्य असून आणि भारताच्या ऊर्जा स्वावलंबनामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत आहे.

गरे पालमा सेक्टर-दोन कोळसा खाण प्रकल्प, ऊर्जा क्षेत्राच्या गरजा पूर्ण करण्याबरोबरच स्थानिक समुदायांचे जीवनमान सुधारणे आणि पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी एक संतुलित प्रारूप (मॉडेल) म्हणून कार्य करेल.

महानिर्मिती ही महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सूत्रधारी कंपनीची पूर्ण स्वामित्वाची उपकंपनी असून महाराष्ट्र राज्यामधील प्रमुख वीज निर्मिती कंपनी आहे. महानिर्मितीची एकूण वीज निर्मिती क्षमता १३,८८०.५५ मेगावॅट आहे, ज्यापैकी सुमारे ७३.५% (१०,२०० मेगावॅट) थर्मल (कोळसा) स्रोतांमधून निर्मिती होते. महानिर्मिती भारतातील सर्वात मोठी राज्य सरकारच्या मालकीची वीज निर्मिती कंपनी आहे. महाराष्ट्रातील २ कोटींहून अधिक ग्राहकांना याद्वारे निर्मित विजेचा पुरवठा करण्यात येतो.

## कलाकारांनी इमोजीच्या भाषेचा आनंद साजरा केला!



**मुंबई, १३ जुलै :** आपल्यापैकी अनेकांसाठी इमोजी भावना व्यक्त करण्याचे दुसरे माध्यम बनले आहे, जसे होकार देण्यासाठी थम्ब अपचे इमोजी, प्रेम व्यक्त करण्यासाठी हार्ट किंवा आनंदमय क्षण शेअर करण्यासाठी हसऱ्या चेहऱ्यांचे इमोजी. आजच्या धावपळीच्या डिजिटल युगामध्ये हे लहान आयकॉन्स जागतिक स्तरावर भावनिक भाषा बनले आहेत, ज्यामधून व्यक्तीच्या मनातील भावना व्यक्त होतात. एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री सोनल पनवार (मलायका, हप्पू की उलटन पलटन') आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, भाबीजी घर पर है') इमोजींनी त्यांच्या संवाद साधण्याच्या व कनेक्ट होण्याच्या पद्धतींना कशाप्रकारे आकार दिला आहे, याबाबत सांगत आहेत.

मालिका हप्पू की उलटन पलटन'मध्ये मलायकाची भूमिका साकारणाऱ्या सोनल पनवार म्हणाल्या, इमोजी माझ्यासाठी भावना व्यक्त करण्याचे शॉर्टहँड आहेत. माझ्या जिवलग मित्रमैत्रिणींना रेड हार्ट पाठवायचा असो किंवा मला एखाद्या गोष्टीचा त्रास होतो तेव्हा रडणारा-हसणारा' चेहरा पाठवायचा असो हे लहान इमोजी शब्दांशिवाय सर्व भावना व्यक्त करतात. मला धमाल व अभिव्यक्त होणारे संवाद करायला आवडतात. माझ्या मते, इमोजी दैनंदिन गप्पागोष्टींमध्ये उत्साहाची भर करतात. मी एका इमोजीचा जास्त वापर करते, ते म्हणजे डोळे बंद केलेल्या माकडाचा इमोजी, ज्यामधून माझ्या ऊप्स' किंवा लाजिरवाण्या प्रतिक्रिया व्यक्त होतात. इमोजींनी मजकूराला अधिक वैयक्तिक व आकर्षक केले आहे. वर्ल्ड इमोजी डे निमित्त मला समजले आहे की हे लहान आयकॉन्स स्वत:ला व्यक्त करण्याचा मोठा भाग बनले आहेत, विशेषत: मनातील भावना शब्दांमध्ये व्यक्त न करता येणाऱ्या क्षणांसाठी अत्यंत उपयुक्त आहेत.''

मालिका भाबीजी घर पर है'मध्ये लोकप्रिय अंगूरी भाबीची भूमिका साकारणाऱ्या शुभांगी अत्रे म्हणाल्या, संवाद म्हणजे फक्त गप्पागोष्टी करणे नाही, तर त्यामधून आपल्या भावना व्यक्त होतात आणि इमोजी त्यासंदर्भात येणारे अडथळे उत्तमरित्या दूर करतात. कधी-कधी, दीर्घकाळपर्यंत शूटिंगनंतर मोठा मेसेज टाइप करण्यासाठी मला कंटाळवाणे वाटते, पण साधा स्माइलिंग इमोजी किंवा फोल्डेड हँड्स इमोजी सर्वकाही सांगून जातो. मला खासकरून उत्साही व फुलांचे इमोजी वापरायला आवडते. ते माझ्या मेसेजमध्ये सकारात्मकता व मोहकतेची भर करतात. अभिनेत्री असल्याने भावना व्यक्त करणे माझी कला आहे आणि इमोजी आपल्या डिजिटल जीवनामध्ये करणारी मदत पाहून खूप आनंद होत आहे. ते संवादांमध्ये उत्साह, विनोद आणि आरामदायीपणाची भर करतात, ज्यामुळे परस्परसंवाद अधिक वास्तविक वाटतो.''

# सबसे पहले लाईफ इंश्युरन्स या मोहिमेद्वारे विमा जागरूकता समितीचे संरक्षणाला प्राधान्य देणाऱ्या आर्थिक नियोजनास समर्थन




**मुंबई, १३ जुलै :** भारतामधील विमा संरक्षणाच्या संदर्भातील लक्षणीय तफावत कायम असून, डिसेंबर २०२३ मधील एनआयए च्या संशोधनानुसार, ती २०१९ पासून २०२३ पर्यंत ८३% वरून वाढून ८७% इतकी झाली आहे. १८ ते ३५ वयोगटाच्या बाबतीत ही तफावत ९०% पेक्षा जास्त असून, अधिक सुस्पष्ट आहे. या वाढत्या असुरक्षिततेमुळे कुटुंबांच्या आर्थिक सुरक्षेसाठी आणि ध्येयांसाठी धोका निर्माण होतो.

बाजार प्रवेशाच्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी, सर्व लाईफ इंश्युरर्सचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विमा जागरूकता समितीने सबसे पहले लाईफ इंश्युरन्स या त्यांच्या राष्ट्रीय मोहिमेचा पुढील टप्पा लाँच केला आहे. वाढत्या जागरूकतेचे रूपांतर अर्थपूर्ण कृतीमध्ये करून, प्रत्येक भारतीयाने लाईफ इंश्युरन्सला आपल्या आर्थिक घडीचा पाया बनवावा यासाठी या उपक्रमाद्वारे सर्वांना नव्या दमाने प्रेरित केले जाईल.

मूलभूत आर्थिक संरक्षणाकडे दुर्लक्ष करून बचतींना आणि गुंतवणुकींना प्राधान्य देण्याची लोकांची सवय मोडणे हा या मोहिमेचा गाभा आहे. कोणत्याही सुरक्षित आर्थिक नियोजनाची सुरुवात ही मुलांचे शिक्षण, स्वतःच्या मालकीचे घर आणि निवृत्ती यांसारख्या दीर्घकालीन ध्येयांसाठी भक्कम पाया उभा करणाऱ्या लाईफ इंश्युरन्सपासून व्हायला हवी हे या मोहिमेद्वारे पुन्हा अधोरेखित केले जात आहे.

विमा जागरूकता समितीचे सदस्य असे म्हणतात, की कोणत्या गोष्टी खऱ्या अर्थाने पणाला लागल्या आहेत हे प्रकर्षाने दाखवणारे रोजच्या आयुष्यातील क्षण या मोहिमेमध्ये प्रामाणिक मांडणीद्वारे आणि भावनिकदृष्ट्या भिडणाऱ्या कथानकांद्वारे जिवंतपणे उभे केले आहेत. लाईफ इंश्युरन्स हा फक्त एक करार नाही, तर जगण्यासाठीचे असे साधन आहे, जे स्वप्नांचे संरक्षण करते, कुटुंबांना आधार देते आणि मनःशांती देते. ही त्याची भूमिका या मोहिमेमधून समोर आणली आहे.

ग्राहकांचे वर्तन बदलण्यास चालना देण्यासाठी आणि जागरूकता व बाजार प्रवेश वाढवण्यासाठी, वर्षभर चालणारा उपक्रम म्हणून या मोहिमेचे नियोजन केले आहे. ही मोहीम लोकांपर्यंत पोहोचावी आणि त्यांना ती आठवत राहावी, यासाठी टेलिव्हिजन, डिजिटल माध्यमे, मुद्रित माध्यमे, बाह्य माध्यमे इत्यादींच्या समावेशासह ती अनेक माध्यमांवर राबवली जाईल.

सबसे पहले लाईफ इंश्युरन्स हे फक्त घोषवाक्य नाही, तर आर्थिक नियोजनाबाबत आपला जो दृष्टिकोन आहे, त्याचा फेरविचार करण्यासाठी केलेले हे आवाहन आहे. श्रीमंत होण्याच्या प्रयत्नांमध्ये आपण संरक्षणाचा विचार सहसा नंतर करतो. ही मानसिकता बदलणे या मोहिमेतून बदलायची आहे. ही मोहीम संरक्षणाला प्राधान्य देणारी आणि स्वप्नांचा पाठलाग करण्यापूर्वी, ती संरक्षित करणारी आहे. जसा प्रत्येक इमारतीचा पाया भक्कम असावा लागतो, तसाच आपणही आपल्या आर्थिक नियोजनासाठी लाईफ इंश्युरन्सचा पाया घडवला पाहिजे. कोणतेही भारतीय कुटुंब आर्थिकदृष्ट्या असुरक्षित राहू नये याची खात्री करण्यासाठी, आम्हाला जागरूकतेचे रूपांतर कृतीमध्ये करायचे आहे.

आर्थिक नियोजनामधील लाईफ इंश्युरन्सचे स्थान फक्त एक चांगला पर्याय इतकेच न राहू देता, तो एक अनिवार्य घटक व्हायला हवा. या टप्प्याचा भाग म्हणून, विमा जागरूकता समितीने या मोहिमेचा महत्त्वाचा घटक म्हणून https://www.sabsepehlelifeinsurance.com/ या डिजिटल नॉलेज हबमध्येदेखील सुधारणा केली आहे. या पोर्टलवर सुलभ आणि उपयुक्त संसाधने आहेत, ज्यांच्या मदतीने लोकांना कव्हरेजच्या गरजांचा अंदाज बांधता येईल आणि माहितीपूर्ण निर्णय घेता येतील.

## पहिल्यांदाच जुळ्या बहिणी सुरभी आणि समृद्धी मेहरा आगामी शो छोरियाँ चली गाँवमध्ये सहभागी होणार!

**मुंबई, १३ जुलै :** भारतीय संस्कृतीचं वैभव आणि भावनिक खोली यांचं प्रतिबिंब असणाऱ्या हटके नॉन-फिक्शन फॉरमॅट्स सादर करण्याच्या आपल्या परंपरेला पुढे नेत, झी टीव्ही एक अनोखा रिॲलिटी शो छोरियाँ चली गाँव सादर करण्यासाठी सज्ज आहे. हा शो इंडिया आणि भारत यांच्यातील दरी कमी करतो, कारण यात ११ स्वतंत्र महिला एकत्र येणार आहेत, ज्या त्यांच्या शहरी जीवनातील धावपळ, वेगवान गती आणि आलिशान सुविधा मागे ठेवून ६० दिवसांपेक्षा अधिक काळ भारताच्या एका गावात राहणार आहेत. त्यांच्याकडे कोणतेही गॅजेट्स, सुविधा किंवा शॉर्टकट्स नसतील. त्या गावातील काम करतील, हळूहळू पण मुळापासून असलेल्या जीवनशैलीशी जुळवून घेतील आणि ग्रामीण जीवनशैलीत पूर्णपणे समरस होतील. या प्रवासात तीन मजबूत कथानकांचे स्तंभ आहेत ग्रामीण जीवनात टिकून राहणे व जुळवून घेणे, सांस्कृतिक व भावनिक समरसतेत सहभागी होणे, शिवाय स्पर्धा व सामाजिक रणनीति या अंगांनी समृद्ध असा हा शो सामाजिकदृष्ट्या अर्थपूर्ण तर असेलच, पण भावनिकदृष्ट्याही प्रेक्षकांना जोडून ठेवेल.

या परिवर्तनाच्या प्रवासात रणविजय सिंग आपली शांत, समजूतदार आणि खास शैली घेऊन आला आहे, जो या शोचा होस्ट, मार्गदर्शक आणि स्थिर प्रेरणास्रोत म्हणून दिसेल. या शोमध्ये तरतरीत आणि तरुण ऊर्जा देण्यासाठी, लोकप्रिय कंटेंट क्रिएटर्स आणि जुळ्या बहिणी सुरभी आणि समृद्धी मेहरा, म्हणजेच आपल्या सगळ्यांना चिंकी-मिंकी म्हणून ओळख असलेल्याही सहभागी होणार आहेत. अलीकडे, त्यांनी त्यांच्या सोशल मीडियावर एक क्रिप्टिक पोस्ट शेअर केली होती भारी मनाने आम्ही आता एक जोडी म्हणून वेगळ्या होत आहोत. आम्ही आमच्या वैयक्तिक प्रवासात जीवनाचा शोध घेण्याचा निर्णय घेतला आहे.

या पोस्टमुळे त्यांच्या चाहत्यांमध्ये आणि मीडियामध्ये खूपच चर्चा आणि कुतूहल निर्माण झाले. थोड्याच दिवसांत, त्यांनी उघड केले की त्या दोघी झी टीव्हीच्या आगामी रिॲलिटी शो छोरियाँ चली गाँव मध्ये भाग घेत आहेत आणि यावेळी त्या जोडी म्हणून नव्हे, तर पहिल्यांदाच स्वतंत्र स्पर्धक म्हणून दिसणार आहेत.

सुरभी मेहरा म्हणाली, मी सततच्या व्यस्त वेळापत्रकात आणि शहरी जीवनातील गडबडीत नेहमी एक वेगवान आयुष्य जगले आहे. माझे आयुष्य वेगवेगळ्या शिफ्ट्समध्ये शूटिंगमध्येच हरवलंय आणि त्याच्याशी सतत जोडलेले राहिले आहे. त्यामुळे छोरियाँ चली गाँव जेव्हा माझ्यासमोर आला, तेव्हा मी खूपच उत्साहित झाले पण थोडीशी घाबरलेही होते. गॅजेट्स, वाय-फाय, आणि शहरातील धावपळ नसेल अशा गावात राहणे हीच एक मोठी गोष्ट आहे, पण हाच भाग मला खूप आकर्षित करतो. माझ्या जुळ्या बहिणीसोबत हे अनुभवणे अजूनच खास आहे आम्ही नेहमीच एकमेकींना पाठिंबा दिला आहे, पण हा अनुभव आम्हाला एक नवीन आव्हान आणि शिकवण देईल. मी या शोकडे एक ब्रेक म्हणून पाहते ज्यामध्ये स्वत:कडे पाहता येईल, नात्यांशी पुन्हा जोडता येईल आणि खरंच वास्तव जगता येईल.

समृद्धी मेहरा म्हणते, आपण बऱ्याच वेळा म्हणतो की आपल्याला आपल्या सोयीच्या चौकटीतून बाहेर यायला हवं पण छोरियाँ चली गाँव मला ती गोष्ट प्रत्यक्षात अनुभवायला मिळवून देणार आहे. मी अशा जगात मोठी झाले जिथे सगळं खूप वेगात चालतं, स्क्रीनवर आधारित आहे आणि अपेक्षांनी भरलेलं आहे. हा शो फक्त एक नवीन सेटिंग नाही ही पूर्ण मानसिकतेतील एक बदल घडवणारी गोष्ट आहे. तो थांबायला भाग पाडतो, स्वतःकडे पाहायला भाग पाडतो, आणि प्रत्येक परिस्थितीला नव्यानं सामोरे जायला शिकवतो. मला माहित आहे की हा प्रवास सोपा नसेल पण मी इथे सोयीसाठी आलेली नाही, मी इथे स्वतःला उलगडण्यासाठी आले आहे. माझी जुळी बहिण सोबत असणे याचा अर्थ असा की आम्ही आमच्यातील नव्या बाजू एकत्र शोधू शकतो.

## सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत कादंबरीच्या कुटिल चालीमुळे पुष्पाची कोंडी

**मुंबई, १३ जुलै :** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेने त्यातील प्रेरणादायक कथानक आणि भावनिक दृष्ट्या समृद्ध व्यक्तिरेखा यांच्या बळावर प्रेक्षकांचे मन काबिज केले आहे. पुष्पा (करुणा पांडे) वकील होण्याच्या आपल्या स्वप्नाचा पाठपुरावा करत आहे या मार्गात तिच्यासमोर आता नवीन समस्या उभ्या आहेत. यामध्ये तिच्या दृढतेची आणि तिच्या मैत्रीची कसोटी लागणार आहे. अलीकडच्या भागांमध्ये, प्रेक्षकांनी पाहिले की, पुष्पाला एका मोठ्या आव्हानाला तोंड द्यावे लागले, जेव्हा तिच्यावर फोन चोरल्याचा आळ आला आणि तिला कॉलेजातून काढून टाकण्यात आले. पुष्पाला धक्क्यातून सावरून, आपले मित्रमंडळ, शिक्षक आणि कुटुंब यांच्यासमोर आपला प्रामाणिकपणा सिद्ध करावा लागला.

आगामी भागांमध्ये, खरा गुन्हेगार सापडतो, ज्यामुळे पुष्पाच्या नावाला लागलेला काळिमा धुतला जातो आणि तिची प्रतिष्ठा परत मिळते. हे वादळ मिटते न मिटते तोच आणखी एक वादळ येते. कादंबरी (वृंदा त्रिवेदी) धूर्तपणे जुगलला त्याची पुष्पा सोबतची जुनी व्यवसाय भागीदारी समाप्त करायला भाग पाडते. यामुळे पुष्पा आणि त्याच्या नात्याच्या मुळाशी असलेला विश्वास आणि मैत्री हलून जाते. या फसवणुकीमुळे पुष्पा खूप दुखावते. कारण त्यांच्यातील ही भागीदारी केवळ व्यावसायिक स्वरूपाची नसते, ती अनेक वर्षांच्या विश्वासावर आणि मैत्रीवर उभी असते. पुष्पाच्या कुटुंबात दीप्तीला दिवस राहिल्याचा आनंदीआनंद सुरू असताना पुष्पाचे विश्व मात्र हळूहळू कोसळू लागले आहे. दरम्यान, कादंबरीच्या नकळत, प्रोफेसर शास्त्री (गौरव चोप्रा) आणि दिलीप (जयेश मोरे) या प्रकरणाचा शोध घेत आहेत आणि ते दोघे मिळून कादंबरीचा डाव उघडकीस आणण्याच्या प्रयत्नात आहेत.

पण व्यवसाय आणि मैत्री या दोन्ही संबंधांमधून विलग होणाऱ्या पुष्पा आणि जुगलला खरा न्याय मिळेल का?

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाची भूमिका बजावत असलेली करुणा पांडे म्हणते, पुष्पाने आजवर नेहमी हसत हसत संकटांना तोंड दिले आहे. पण यावेळी तिच्या तिच्या मनावर खोल आघात झाला आहे. तिची मैत्री, तिचे काम, तिची स्वप्ने सारे काही या हल्ल्याने प्रभावित झाले आहे. ती तुटली नसली, तरी खूप दुखावली आहे. आपल्या कुटुंबाच्या आनंदात सहभागी होताना तिच्या मनातील वेदना पाहून प्रेक्षकांना स्त्रीची ही स्थिती नक्कीच परिचित वाटेल. हा भावनिक टप्पा आहे, पण तितकाच सशक्त आहे. कारण, सारे काही हातातून निसटून जात असताना देखील ताकदीने उभे राहण्याचे महत्त्व या कथेत दाखवले आहे.

# 'चला हवा येऊ द्या' पुन्हा येणार प्रेक्षकांच्या भेटीला?

**मुंबई, १३ जुलै :** छोट्या पडद्यावरील लोकप्रिय मालिकांच्या यादीत फक्त कथा असलेलेच असतात असं नाही. अनेक रिॲलिटी शो आणि कॉमेडी शो आहेत. झी मराठीनं गेल्या अनेक वर्षांपासून अशा अनेक दर्जेदार कार्यक्रमांची मेजवानी प्रेक्षकांना दिली. त्यातच चला हवा येऊ द्या या कार्यक्रमानं संपूर्ण महाराष्ट्राच्या मनात स्थान निर्माण केलं. तब्बल दहा वर्षं, म्हणजे २०१४ ते २०२४ या काळात हा कार्यक्रम प्रेक्षकांना खळखळून हसवलं. मात्र, २०२४ मध्ये या कार्यक्रमात अर्थात तेच ते विनोद आणि त्यात काहीच वेगळेपणा नाही म्हणून हा शो बंद करण्याचा निर्णय वाहिनीनं घेतला. वाहिनीच्या या निर्णयानं अनेक प्रेक्षक नाराज झाले. पण आता हाच शो पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

खरंतर, गेल्या वर्षी अर्थात मार्च २०२४ मध्ये ही मालिका बंद झाली. त्यानिमित्तानं या कार्यक्रमात दिसलेल्या कलाकारांनी प्रेक्षकांचा निरोप घेत सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली होती. हा लोकप्रिय कार्यक्रम पुन्हा एकदा नव्या रुपात प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याची घोषणा झी मराठीकडून अधिकृपणे करण्यात आली नाही, पण वाहिनीच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार लवकरच ही मालिका अर्थात कार्यक्रम प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

नुकताच वाहिनीचा लूक बदलला आहे, गेल्या २६ वर्षांपूर्वी या वाहिनीचं एक रूप आपण पाहत होतो. मात्र, आता पासून वाहिनीचं एक नवं रूप पाहिलं आहे. झी मराठीच्या चीफ चॅनेल ऑफिसर व्ही. आर. हेमा यांनी सांगितलं की, 'सदैव तुमची, झी मराठी हे वाक्यच आपल्या नात्यांमधील भावनिक गुंतवणूक दाखवतं. एकमेकांच्या सुख-दुःखात उभं राहणं ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख आहे. झी मराठी ही केवळ एक वाहिनी नाही, तर घराघरांतली आपुलकीची एक भावना आहे.


## आज का अंदाज

सोमवार १४ जुलै २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| 2 | 5 | 8 | 9 |
|---|---|---|---|
| 156 | 780 | 260 | 199 |
| 390 | 690 | 350 | 289 |
| 246 | 500 | 440 | 379 |
| 21 | 51 | 83 | 93 |
| 20 | 50 | 84 | 94 |
| 27 | 57 | 86 | 96 |

मुंबई बाजार

| 2 | 3 | 6 | 7 |
|---|---|---|---|
| 660 | 229 | 240 | 124 |
| 499 | 166 | 367 | 467 |
| 336 | 599 | 600 | 278 |
| 24 | 34 | 61 | 71 |
| 20 | 30 | 69 | 79 |
| 28 | 38 | 65 | 75 |

१४ जुलै २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 31 | 51 | 48 | 72 |
| 39 | 59 | 46 | 78 |
| 36 | 50 | 40 | 76 |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक
ओपन टू क्लोज

1 5 4 7

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034


## बंधन म्युच्युअल फंडचा बंधन मल्टी-फॅक्टर फंड लाँच



**नागपूर, १३ जुलै :** बंधन म्युच्युअल फंडने आपली नवीन ओपन-एंडेड इक्विटी योजना बंधन मल्टी-फॅक्टर फंड सुरू करण्याची घोषणा केली आहे. ही योजना एक प्रगत आणि विकसित मल्टी-फॅक्टर क्वांटिटेटिव्ह मॉडेल आधारित गुंतवणूक संकल्पना वापरते. या फंडामध्ये चार वेळेवर पडताळलेले गुंतवणूक घटक गती, मूल्य, गुणवत्ता आणि कमी अस्थिरता एकत्रित करून गुंतवणूकदारांना विविधरूप पोर्टफोलिओ उपलब्ध करून दिला जातो.

या योजनेचा न्यू फंड ऑफर (एनएफओ) गुरुवार, १० जुलै २०२५ रोजी उघडेल आणि गुरुवार, २४ जुलै २०२५ रोजी बंद होईल. बंधन मल्टी-फॅक्टर फंडमध्ये गुंतवणूक परवाना असलेल्या सर्व म्युच्युअल फंड डिस्ट्रीब्यूटर्समार्फत विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरून किंवा थेट https://bandhanmutual.com/nfo/bandhan-multi-factor-fund/ या वेबसाइटवरून करता येईल.

या नव्या योजनेबाबत बोलताना बंधन एएमसीचे सीईओ विशाल कपूर म्हणाले, 'जसजसा बाजार अधिक गतिमान आणि प्रभावी होत चालला आहे, तसतशी गुंतवणूकदारांना अशा रणनीतींची गरज आहे, जी बाजार चक्रांशी सुसंगत राहून टिकाव धरू शकतील. मल्टी-फॅक्टर गुंतवणूक ही एक प्रभावी इक्विटी गुंतवणूक रणनीती म्हणून पुढे आली आहे, विशेषतः अशा परिस्थितीत जिथे कोणताही एक घटक सर्वच वेळी आघाडीवर राहू शकत नाही. तेजीच्या बाजारात गती, पुनरुत्थानाच्या टप्प्यात मूल्य, मंदीच्या काळात गुणवत्ता आणि अनिश्चिततेत कमी अस्थिरता चांगले काम करते. बंधन मल्टी-फॅक्टर फंडाचा उद्देश केवळ एका घटकावर अवलंबून राहणे टाळणे आणि एकंदर जोखीम समायोजित परतावा वाढवणे आहे.'

## राशीभविष्य

**मेष :** आज उत्पन्नाच्या क्षेत्रात अशी एखादी घटना घडू शकते ज्यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल. तुम्हाला न्यायालयीन प्रकरणांमध्ये यश मिळेल. तुमच्या बुद्धीने व्यवसायात चांगली प्रगती कराल.

**वृषभ :** काही अपूर्ण काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. नोकरीत, तुम्हाला तुमच्या आवडीचे काम इच्छित पदावर करता येईल. सरकारी योजनेचा तुम्हाला फायदा होईल. जुना वाद दूर होईल.

**मिथुन :** आज परदेश प्रवास किंवा लांब पल्ल्याच्या प्रवासाची शक्यता आहे. तुमच्या सासरच्या मंडळींकडून तुम्हाला एखाद्या शुभ कार्यक्रमाचे आमंत्रण मिळेल.

**कर्क :** नवीन भागीदार बनवून व्यवसायात प्रगती होईल. पैसे आणि मालमत्तेवर खर्च जास्त होऊ शकतो. कोणताही वाद न्यायालयात जाण्यापूर्वी तो थांबवा आणि सोडवण्याचा प्रयत्न करा.

**सिंह :** आज तुम्ही तुमचे काम सोडून मौजमजेत रमून जाल. तुम्हाला सुखसोयींमध्ये रस असेल. कामाच्या ठिकाणी बदल होऊ शकतो. व्यवसायात, तुम्हाला तुमचे काम इतरांवर सोपवण्याची सवय असेल.

**कन्या :** आज दिवसाची सुरुवात काही तणावपूर्ण बातम्यांनी होईल. ज्यामुळे तुम्हाला दुःख वाटू शकते. नोकरीत समन्वयाने काम करा. तुम्हाला कार्यक्षेत्राबाबत काही शुभ संकेत मिळतील.

**तूळ :** कुटुंबात अतिशय शुभ घटना घडेल. राजकारणातील तुमच्या नेतृत्वाचे कौतुक होईल. दूरच्या देशातील एखाद्या प्रिय व्यक्तीकडून तुम्हाला एक चांगली बातमी मिळेल.

**वृश्चिक :** कामाच्या ठिकाणी आराम आणि सोयीचा अभाव असेल. काही महत्त्वाच्या कामात अडथळे येऊ शकतात. तुम्हाला नको असलेल्या प्रवासाला जावे लागू शकते. क्रीडा स्पर्धांमधील अडथळे दूर होतील.


**धनु :** आज तुम्हाला तुमच्या मुलांकडून काही चांगली बातमी मिळेल. अभ्यास आणि अध्यापनाच्या कामात गुंतलेल्या लोकांना विशेष यश मिळेल. तुम्ही सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घ्याल.

**मकर :** बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना नवीन जबाबदाजया मिळतील. तुम्ही सामाजिक कार्यात सक्रिय भूमिका बजावाल. तुमची महत्त्वाची कामे स्वत: करा.

**कुंभ :** व्यवसायात नवीन सहकारी प्रगतीत एक घटक ठरतील. सरकारच्या मदतीने व्यवसायातील अडथळे दूर होतील. तुम्ही परदेश प्रवास किंवा लांब पल्ल्याच्या प्रवासाला जाऊ शकता.

**मीन :** कोणाच्याही प्रभावात येऊ नका. तुमच्या बुद्धिमत्तेने आणि विवेकबुद्धीने काम करा. सामाजिक क्षेत्रात तुमची ओळख होईल. प्रवास करताना अनोळखी लोकांवर आंधळेपणाने विश्वास ठेवू नका.

## शब्दकोडे क्रमांक २१६४



**आडवे शब्द :-**
१) ताजमहालाचा दगड
५) सरसनीरस, बरेवाईट
८) शरीर
१०) शिळाच्या विरुद्ध
११) नगरपलिकेचा अध्यक्ष
१३) सटरफटर, किरकोळ सामान
१५) दुर्दशा
१७) अंधार
१८) बेचव
२०) जन्म
२२) ढीग
२४) पायदळाचा शिपाई
२६) मनाचे श्लोक लिहिणारे
२९) झकास
३०) व्यायाम
३२) पुन्हा
३४) राज्ञी
३६) अनुमती
३९) पोत्याचे कापड
४१) जननी
४२) गुणाकारच्या विरुद्ध
४४) बारा वर्षाचा काळ
४६) धातूचा धागा
४७) रात्रभर
४९) बाजेची सुती पट्टी
५१) विनाकारण
५२) मत देण्याची क्रिया
५४) कौरव पांडवांची कथा
५६) गरळ ओकणारा सरपटी प्राणी
५७) विविध
५९) सूर्याचे एक नाव
६०) डोंगर
६१) शूर पुरुष
६३) अशुभ सावली
६४) मान, प्रतिष्ठा
६६) बशीचा जोडीदार
६८) चित्रपटाचा पडदा
७०) रत्न
७२) माफ
७४) युद्धात आलेले मरण
७६) वर्तुळ
७७) लोकनाट्य
७८) *** निर्यात
७९) स्तुती

**उभे शब्द :-**
१) राग उत्पन्न करणारा
२) गणपतीचे एक नाव
३) इंग्रजीत एक
४) रक्त(ग्रा)
५) उद्देश, जे साधावयाचे ते
६) असुर
७) धोबी
८) कोल्हापुरची महालक्ष्मी
९) हत्ती
१२) वंदनाचा एक शब्द
१४) पोपट
१६) अरण्यातील वाट
१९) दुसऱ्याच्या कबजातील
२१) अर्जुनाचे एक नाव
२३) सद्वर्तन
२५) उणीव, न्यूनता
२७) अभिप्राय
२८) भूपती
३१) वाकबगार
३३) निमग्न
३५) दोरा
३६) उद्याच्या नंतरचा दिवस
३७) बातमी
३८) कवी
४०) फळाचे साल
४१) विश्राम
४२) हिंदुस्थान
४३) अरण्य
४५) पुन्हा पुन्हा
४८) सामन्यातील पराक्रमी खेळाडू
५०) दारूचा एक प्रकार
५१) श्रद्धा नसलेला
५३) गुलामी
५५) फुलाची माळ
५७) बाई
५८) प्रफुल्लित
६१) प्रणयलीलेत नखाने काढलेला ओरखडा
६२) रात्र
६३) सर्प
६५) किंमत
६७) पळून जाणे
६९) जेवायला बसलेल्यांची रांग
७१) वधू
७३) आईचा भाऊ
७५) नदीचा काठ

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# अकोला महापालिकेची गुंठेवारी बंद

▪अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

पंतप्रधान आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात अकोला शहरात २,४९८ ऑनलाईन प्रस्ताव दाखल झाले असले, तरी गुंठेवारी करण्याची नियमानुकूल प्रक्रिया बंद असल्याने हजारो लाभार्थी अडचणीत सापडले आहेत. ज्या लाभार्थ्यांकडे स्वतःचा प्लॉट असून तो गुंठेवारी पद्धतीने खरेदी केलेला आहे, त्यांना ऑनलाईन प्रस्ताव अकोला दाखल करता येत नसल्याने ते मह जनहित योजनेच्या लाभापासून वंचित राहत आहेत. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत 'सर्वांना हक्काचे घर' ही मोहीम राबविण्यात आली आहे.

महापालिका क्षेत्रात पहिल्या टप्प्यात ७,६४० घरकुलांना मंजुरी मिळाली होती, त्यापैकी ३,०७८ घरकुले पात्र ठरली. उर्वरित मंजूर लाभार्थ्यांनी कागदपत्रांची पूर्तता केली नाही. या मंजूर झालेल्या घरकुलांपैकी पालिका सर्वतोपरी२,६४६ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. सध्या,



३९८ घरकुलांचे काम प्रगतीपथावर असून, २३ घरकुलांची कामे अद्याप सुरू झालेली नाहीत.पहिल्या टप्प्यानंतर आतादुसरा टप्पा सुरू झाला आहे.

दुसऱ्या टप्प्यात लाभार्थ्याला स्वतः सेवा केंद्रातून ऑनलाईन प्रस्ताव दाखल करावा लागतो. ऑनलाईन प्रस्ताव दाखल करणे सोपे असले तरी, कागदपत्रांची पूर्तता होत नसल्याने लाभार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. घरकुलाचा लाभ मिळण्यासाठी प्लॉटचा 'ले-आउट' असणे गरजेचे आहे.

मात्र, दुसरीकडे महापालिकेने गुंठेवारीचे नियमानुकूल करण्याचे काम बंद केले आहे. त्यामुळे केंद्र शासनाने हक्काचे घर मिळावे यासाठी योजना सुरू केली असली, तरी स्थानिक प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे लाभार्थी लाभापासून वंचित राहत आहेत. आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात एकूण २,४९८ ऑनलाईन प्रस्ताव दाखल झाले आहेत. यापैकी १,८१० लाभार्थ्यांकडे स्वतःचे प्लॉट आहेत, तर अन्य लाभार्थ्यांकडे स्वतःचा प्लॉट नसला तरी 'कमी किमतीत घर' या योजनेत त्यांनी प्रस्ताव दाखल केला आहे. स्थानिक प्रशासनाने या गंभीर समस्येकडे त्वरित लक्ष देऊन गुंठेवारी नियमानुकूल करण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू करावी, अशी मागणी लाभार्थ्यांकडून होत आहे.

## परमिट रूम बार एक दिवस बंद ठेवणार

▪अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

राज्य शासनाने नुकतीच परमिट रूम बारवर १० टक्के व्हॅट कराची वाढ केली असून, त्याचबरोबर एक्साईज ड्युटीमध्येही लक्षणीय वाढ केली आहे. यामुळे दारूचे दर सामान्य ग्राहकांच्या आवाक्याबाहेर गेले असून, परमिट रूम बार उद्योग अडचणीत सापडला आहे. या वाढीव करांमुळे संपूर्ण बार व्यवसाय उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर असून, अनेकांचे व्यवसाय अडचणीत आले आहेत.

## मारहाणप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल

**तेल्हारा :** तालुक्यातील निंभोरा येथे गुरुवार, १० जुलै रात्री घडलेल्या मारहाण व शिवीगाळ प्रकरणात एकाच कुटुंबातील तिघांविरुद्ध तेल्हारा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तालुक्यातील निंभोरा येथील रहिवासी किशोर हरिदास दामले (वय ५५) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. १० जुलै रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास ते घरासमोर बसलेले असताना तेथे गावातील जीवन बलदेव वानखडे आणि त्यांची दोन मुले निखिल व साहिल हे घटनास्थळी आले.

## अकोट नवीन बायपासला गडकरींची तात्विक मान्यता

▪अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

अकोट शहरासाठी राष्ट्रीय महामार्ग १६१ ए (अकोला-अकोट-बैतुल कॉरिडॉर) आणि राष्ट्रीय महामार्ग २०४ यांना जोडणारा बायपास रस्ता प्रस्तावित करण्यात आला असून, या प्रस्तावाला केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी तात्विक मान्यता दिली आहे. हा प्रस्ताव खासदार अनुप धोत्रे यांनी सादर केला होता.अकोटमधील शहराच्या वर्दळीमुळे अंतर्गत रस्त्यांवर मोठा वाहतूक ताण निर्माण झाला आहे. त्यामुळे बायपास रस्त्याची निकड निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर खा. धोत्रे यांनी आमदार प्रकाश भारसाकळे आणि अकोटकरांच्या मागणीनुसार, अकोट शहराबाहेरून जाणारा बायपास प्रस्तावित करण्याची सूचना केली होती. या मार्गामुळे मध्य प्रदेश, मराठवाडा, आंध्र प्रदेश आणि तेलंगणासह राज्यांमधील विविध वाहतुकीला गती मिळणार आहे. बायपास रस्त्यामुळे केवळ वाहतूक सुलभ होणार आहे.

## खाद्याची दरवाढ पोल्ट्री व्यावसायिक अडचणी

▪अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

पशुखाद्यत सतत वाढ होत असल्याने पोल्ट्री व्यवसाय अडचणीत आला आहे. एका कोंबडीच्या व्यवस्थापनावर सुमारे ८५ रुपये खर्च येत आहे. विक्री मात्र ७० रुपयांत करावी लागत असल्याची स्थिती आहे. जिल्ह्यात शेकडो पोल्ट्री फार्म असून, खाद्याच्या कच्च्या मालाच्या दरात वाढ झाल्याने या उद्योगाला मोठा फटका बसत आहे.

मुख्य म्हणजे जीवघेणी होरपळ आणि उष्णते मुळे कोंबड्या वाचविण्यासाठी पोल्ट्री व्यावसायिकांना कसरत करावी लागत आहे.पिलांच्या दरात घसरण झाली तर उपलब्धता असल्याने संगोपन वाढले आहे. त्यातच सणासुदीच्या काळात मागणी मंदावली. त्याचा फटका दराला बसला. उत्पादन खर्चापेक्षा विक्री दर कमी झाला. त्यामुळे मागील महिनाभरापासून कुक्कुटपालकांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, गेल्या दोन दिवसांपासून दरात सुधारणा होत असल्याने काहीसा दिलासा मिळाला असल्याचे उत्पादक सांगतात. कोंबड्यांच्या खाद्यात विक्रमी भाववाढ झाल्याने कुक्कुटपालन जोडधंदा अडचणीत



आला आहे. खेळते भांडवल वाढून नफा कमी झाला आहे. गत दोन वर्षांपासून कुक्कुटपालकांना मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. महागाईमुळे खर्च काढणेही कठीण होत आहे. गेल्या दोन महिन्यांपासून भाव अस्थिर आहेत.आहे. त्यामुळे त्यातच मका व इतर खाद्याच्या दरात तेजी कायम कुक्कुटपालकांना तोटा सहन करावा लागला आहे. असे असताना काही पोल्ट्री व्यावसायिक मात्र, जुन्याच दराने पक्षी विक्री करीत असून खवय्याच्या खिशाला मात्र कात्री बसत आहे.

## लहान मुले आजारी पडण्याचे प्रमाण वाढले

▪अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

पावसाळा सुरू होताच अनेक आजारांचा प्रसार सुरू होतो. या काळातील वातावरण बदलाचा त्रास लहान मुलांना सर्वाधिक होतो, कारण त्यांची प्रतिकारशक्ती कमकुवत असते. सध्या लहान मुलांमध्ये श्वसनमार्ग संसर्ग, सर्दी, फ्ल्यूसारखे आजार आणि डोळ्यांचा संसर्ग वाढला आहे. लहान मुलांमधील आजारपणात वाढ झाल्याचे निरीक्षण बालरोगतज्ज्ञांनी नोंदविले आहे.ताप, खोकला,सर्दी, जुलाब, उलट्या, अंगदुखी, डोकेदुखी, भूक न लागणे अशा तक्रारी घेऊन अनेक मुले उपचारासाठी येत आहेत. यामध्ये १० वर्षांखालील मुलांचा प्रामुख्याने समावेश आहे. ही मुले शाळेत जाणारी असल्याने तिथे एकमेकांच्या संपर्कात आल्याने हा संसर्ग वाढत असल्याचे दिसून येत आहे. पावसाळ्यात अनेक प्रकारचे जंतू आणि संसर्ग आवळून येतात. पालकांनी आपल्या मुलांना या आजारांना बळी पडण्यापासून वाचवणे आणि आवश्यक ती खबरदारी घेणे गरजेचे आहे. या ऋतूतील वाढत्या आर्द्रतेमुळे जंतूंची संख्या वाढते. शहरामध्ये काही दिवसांपासून डेंग्यूची साथ वाढत आहे. त्यामुळे काळजी घेण्याचा सल्लाही बालरोगतज्ज्ञांनी दिला आहे.लहान मुलांना न चुकता फ्ल्यूची लस देणे आवश्यक आहे. हातांची स्वच्छता, शिंकताना किंवा खोकताना नाक आणि तोंड झाकणे, मास्कचा वापर अशा गोष्टी मुलांना पाळायला सांगाव्यात, रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी आहारात भाज्या आणि फळांचा समावेश करावा. आजारपणात मुलांना शाळेत पाठवणे टाळा. संसर्ग होऊ नये म्हणून पुरेशी खबरदारी घेणे आवश्यक आहे. आमच्याकडे दर महिन्याला डेंग्यूचा संसर्ग झालेली किमान ५ मुले उपचारासाठी येत आहेत. याबाबत बालरोगतज्ज्ञ म्हणाले की, पावसाळ्यात जागोजागी पाण्याची जबकी साचलेली असतात. त्यात पाण पाणी साचून अतिसार, विषमज्वर, कावीळ यांसारख्या आजारांची लागण होते. ताप येणे, डोकेदुखी, जुलाब, ओटीपोटात दुखणे, सांधेदुखी अशी लक्षणे मुलांमध्ये आढळून आल्यास पालकांनी त्वरित वैद्यकीय मदत घ्यावी. मुलाला सर्दी, ताप, खोकला असल्यास तो बरा झाल्यानंतर तीन ते चार दिवसांनी त्याला शाळेत पाठवावे.

## शहरात मोकाट श्वानांच्या झुंडी वर्षात ८१ नागरिकांना घेतला चावा

▪अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

शहरातील मोकाट श्वानांचा बंदोबस्त करण्यासाठी महापालिकेने निर्बीजीकरण व लसीकरण मोहीम राबवली मात्र त्यानंतरही शहरात मोठ्या प्रमाणात मोकाट श्वान दिसून येत आहेत. गत चार वर्षातील संपुर्ण जिल्ह्यातील नोंद पाहता १४ हजार ५८१ श्वानांनी चावा घेतल्याच्या घटना घडल्याचे समोर आले आहे. जिल्ह्यात व महापालिका क्षेत्रात मोकाट श्वानांची संख्या प्रचंड वाढली आहे. यावर नियंत्रण मिळविण्यासाठीमहापालिका प्रशासनाने मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण व लसीकरण कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. या मोहीमेसाठी महापालिकेने लाखोंचा खर्च केला परंतु शहराच्या कानाकोपर्यात मोकाट श्वानांचा त्रास तसुभरही कमी झाला नसून नागरिकांना चावा घेण्याचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ही स्थिती पाहता महापालिकेच्या मोहीमेचा फज्जा उडाल्याचे दिसुन येत आहे. मोकाट श्वानांचा बंदोबस्तकरण्याची जबाबदारी महापालिकेची असतानाही ही मोहीम गुंडाळून ठेवण्यात आली आहे. निबिजीकरण व लसीकरण करुनही



मोकाट श्वानांची संख्या नियंत्रणात का आली नाही असा सवाल उपस्थित होत आहे. लाखोंची उधळपट्टी करुनही मोकाट श्वानांची संख्या नियंत्रणात आली नसल्याचे नोंद झालेल्या आकडेवरुन दिसुन येत आहे. शहर व हद्दवाढ भागात प्रमुख रस्ते व गल्लीबोळात मोठ्या प्रमाणात मोकाट श्वान दिसून येत आहेत. हे श्वान वाहनांचा पाठलाग करीत असल्याने अपघाताचे प्रमाण वाढले आहे. रात्रीच्या वेळी नागरिकांना जीव मुठीत घेऊन ये-जा करावी लागत असल्याची परीस्थिती आहे. लहान मुलांना चावा घेतल्याचा घटनाही मोठ्या प्रमाणात उघडकीस येत आहेत. शहरातील मोकाट श्वानांची संख्या पाहता ही मोहीम गांभीर्याने राबविली नसल्याची तक्रार अध्यक्ष गणेश कुरई यांच्या नेतृत्वात विश्वलोकार्पण बहुउद्देशिय सेवा संस्थेने आयुक्त यांना केली असून मोकाट श्वानांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे.

## प्राची गर्जे सन्मानित

**अकोला :** अकोला शहरातील कु. प्राची सुनील गर्जे हिने केनिया येथे पार पडलेल्या स्केटिंग रोल बॉल वर्ल्ड कप(पिवशी १७) स्पर्धेमध्ये आपल्या भारत देशाच्या टीममध्ये खेळून भारताला विश्वविजेता मान प्राप्त करून दिल्याबद्दल तिची भेट घेऊन जयहिंद लोकचळवळ च्यावतीने सागर कावरे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. प्राची ही त्या टीम मध्ये खेळणारी विदर्भातील एकमेव तसेच महाराष्ट्रातील चार खेळाडूंपैकी एक होती आणि तिची या खेळाप्रती असलेली तळमळ आणि निष्ठा ही वाखण्याजोगी आहे आणि हे करीत असतांना तिने तिच्या शैक्षणिक आयुष्याशी कुठलीही तडजोड केलेली नाही,त्यात सुद्धा ती कायम प्राविण्यप्राप्त करीत आलेली आहे.

## थोडक्यात

### आषाढी एकादशीचा भक्तिमय उत्सव: 'विठ्ठल नामाची शाळा भरली'



**मुर्तिजापुर :** अकॅडमिक हाइट्स पब्लिक स्कूल, मुर्तीजापूर येथे आषाढी एकादशीचा पवित्र उत्सव अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. 'विठ्ठल नामाची शाळा भरली ' या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात संपूर्ण शाळा विठ्ठलमय झाली होती. कार्यक्रमाचे मार्गदर्शन शाळेचे प्राचार्य सन्माननीय श्री. खुशाल थानवी सर यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली पार पडले. या दिवशी संपूर्ण मुर्तीजापूर नगरी विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून गेली होती.उत्सवाची सुरुवात शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांनी एकत्र येऊन विठ्ठल-रखुमाईच्या पालखी सोहळ्याने केली. विठ्ठलनामाचा जयघोष करत, पारंपरिक वेशभूषा परिधान केलेल्या विद्यार्थ्यांसह पालखी शहरभर फिरवण्यात आली. नगरफेरी झाल्यानंतरपालखीचा समारोप पुन्हा शाळेच्याआवारात करण्यात आला. यानंतर मल्टीपर्पज हॉलमध्ये सर्व विद्यार्थी एकत्र जमले आणि महाआरतीचे भक्तिपूर्ण आयोजन करण्यात आले. नर्सरी ते दहावीपर्यंतचे सर्व विद्यार्थी या सोहळ्यात सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी संत ज्ञानोबा, संत तुकाराम, संत नामदेव, संत जनाबाई, संत मीराबाई यांच्यासारख्या थोर संतांच्या वेशभूषेत कार्यक्रमात उपस्थित राहून या भूमीच्या संत परंपरेचा गौरव केला. कार्यक्रमामध्ये सर्व शिक्षकांनी उत्साहाने सहभाग घेत आपले योगदान दिले. विद्यार्थ्यांमध्ये भक्तीभाव, समर्पण आणि सांस्कृतिक जाणीव निर्माण व्हावी यासाठी ही परंपरा शाळेत जपली जाते हे विशेष. हा संपूर्ण सोहळा पाहताना ' याची देही याची डोळा' अशी अनुभूती प्रत्येकाला झाली. शिस्त, संस्कार आणि श्रद्धेने सजलेला हा कार्यक्रम विद्यार्थी आणि शिक्षकांच्या मनात दीर्घकाळ घर करून राहणार आहे.

### क्षत्रिय माळी परिषदेची नवनिर्वाचित कार्यकारिणी जाहीर !

**बाळापूर :** क्षत्रिय माळी परिषद कार्यालय, वाडेगाव (बावीस गाव) यांची नवी कार्यकारिणी नुकतीच जाहीर झाली. बाळापूर तालुक्यातील कासारखेड येथील महात्मा फुले वाचनालयात झालेल्या एका औपचारिक कार्यक्रमात नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.कार्यक्रमास क्षत्रिय माळी समाज बाळापूरचे अध्यक्ष प्रमोद धनोकार यांच्या अध्यक्षतेखाली, वाडेगाव कार्यालयाचे अध्यक्ष गणेश आसोलकार, माजी अध्यक्ष सहदेवराव आसोलकार, आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित समाजबांधवांच्या हस्ते नव्याने नियुक्त झालेल्या पदाधिकाऱ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. नूतन कार्यकारिणीमध्ये अध्यक्षपदी गणेश आसोलकार (शेगाव), उपाध्यक्ष संतोष बिलबिले (कान्हेरी), अरुण काळे (उमरी), सचिव सुरेश लांबे (शेगाव), सहसचिव दत्तात्रय काळे (पुणे), कोषाध्यक्ष नंदकिशोर चिंचोळकर (वाडेगाव), संचालक पदी अमोल मसने (जवळा), अभिमन्यू धनोकार (बाळापूर), संजय धनोकार (खामगाव), संचालिका पदी आशा वरोकार (देगाव), सुनीता गणोरकार (नकाशी) यांची नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमात रमेश लहाने, प्रमोद धनोकार, किरण हुसे यांनी मनोगते व्यक्त केली.यावेळी महात्मा फुले वाचनालयाचे माजी अध्यक्ष सुधाकर लहाने, श्रीकृष्ण धनोकार, विवेक शेगोकार, सुनील घाटोळ, संजय हुसे, अनिल धनोकार, राहुल धनोकार, गजानन जढाळ, शरद धनोकार, अरुण हुसे, विठ्ठल धनोकार, आनंदा सोनटक्के, शरद घाटोळ, संजय पेटकर, अशोक कलोरे यांच्यासह मोठ्या संख्येने माळी समाज बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन हुसे यांनी केले, आभार प्रशांत लहाने यांनी मानले. कार्यक्रमाला माळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्य ओमशाती शाखेचा ४३ वा वर्धापण दिन ब्रम्हभोजनाने साजरा

▪हिवरखेड,दि १३ (प्रतिनिधी) :

ब्रम्हाकूमारी ईर्श्वरीय वीर्श्व विध्यालय माऊंटआबु द्वारा संचालीत गीता पाठशाला हिवरखेड मुख्य ओमशांती शाखेच्या आत्मसंतोष भवन मधे त्रेचाळिस वर्षापुर्वी स्व शांताबाई प्रल्हाद मामनकर यांनी लावलेले रोपट्याचे वटवृक्षात रुपांतर झाले असून ते ज्ञानरुपी शिवबाबाची शाखा आज त्रेचाळीसव्या वर्षात प्रदार्पन करत आहे.

यावेळी ब्रम्हाकुमारी रर्श्मिदिदी च्या अधीपत्याखाली शाखेमधे दैनदीनी मूरली तसेच योग अभ्यास परमात्मा सूमीरण ज्ञानयोग तसेच गिता जंयती महा शिवरात्री असे विवीध कार्यक्रम होत असतात आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ट संचालक देवीदास भाई डांगे प्रमूख अतीथी ए एस आय श्री महादेव नेवारे यांचे हस्ते व रमेश दुंतोडे, रास्तभाव दूकानदार सघटनेचे तालुका अध्यक्ष प्रदीप पाटिल माजी जि प सदस्या सूलभा दूतोंडे,बाळासाहेब नेरकर सदीप ईंगळे संजय हीवराळे, गोवर्धन गावंडे केशव कोरडे याचे




ऊपस्थीतीत केक कापुन सपंन्न झाला यावेळी आपल्या प्रास्ताविकातुन ज्ञानरूपी या वास्तुची जागा स्व गजानन कराळे परीवाराकडून दानदाते म्हणूण मिळाली असून या वास्तू बाधंकामा पासून सकाळ सध्यांकाळच्या मूरली ऐकनारे भाईलोक यांचे सहयोगाने दोनशे लोक सकाळ सध्यांकाळ मूरली मध्ये उपस्थित राहून ज्ञानरूपी अमृत ग्रहन करतात असे प्रास्तावीक करताना बाळासाहेब नेरकर यांनी सांगीतले यावेळी रमेश दुंतोंडे प्रदीप पाटील, सूलभाताई दुंतोडे ज्योत्सनाताई गावंडेताई ईत्यादीनी शाखेची माहीती देत शुभेच्छा दिल्या तर या प्रमोद टोहरे मनोहर दूंतोडे देवीदास फोप्से सौ तारापुरे सौ.मगंला येऊल सौ पार्वती येऊल सूनीता बोडखे चंदाबाई, नंदा सौदे, ब्रम्हकूमार देवीदास ईखार, सतोंष शमा,गजानन येऊल,ईलरकर विलास झगडे सौ अग्रवाल सौ माधानी पेठेवाले या सर्वाचे सहकार्याने पत्रकार बांधवाचे ऊपस्थीतीतवरील कार्यक्रमानंतर ब्रम्हा भोजन कार्यक्रम पार पडला.

## गुन्हेगारांवर वचक बसवण्यासाठी शहरात सीसीटीव्ही यंत्रणेची गरज

तेल्हारा : शहरामध्ये सराफा बाजार किराणा बाजार कापड बाजार बऱ्यापैकी आहे इथे कधीकधी दुकान फोडीचे प्रकार घडतात. तसेच टावर चौक जगद्गुरु संत तुकाराम महाराज चौक बस स्थानक या परिसरामध्ये अनुचित प्रकार टाळण्यासाठी शहरामध्ये मुख्य चौकात सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्याची गरज आहे तेल्हारा शहर शांतता प्रिय व सर्व जाती-धर्माच्या लोकांमध्ये समन्वय व एकोपा असल्याने जातीय तेढ निर्माण होण्याचे प्रकार क्वचितच घडतात. मात्र चोरीच्या घटना शहरांमध्ये अधून मधून घडत असतात पोलीस प्रशासन रात्री गस्त घालत असते चोऱ्या व अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून भरपूर प्रयत्न केला जातात हे जरी खरे असले तरी चाऱ्यां होतातच चोरटे चोऱ्या करून पसार होतात व त्यांना शोधण्यात पोलीस प्रशासनाचा खूप वेळ जातो कारण त्यांना चोरी करणारा बद्दल काहीही माहिती नसते जर शहरातील मुख्य चौकात सीसीटीव्ही यंत्रणा लावलेली असेल तर सीसीटीव्हीचे फुटेज चेक करून चोरी करणारे व्यक्ती दिसू शकतात व तपासाला योग्य दिशा मिळते. तसेच बस स्थानक परिसर टॉवर चौक व जगद्गुरु संत तुकाराम महाराज चौक या ठिकाणी नागरिकांची वर्दळ जास्त असते याच ठिकाणी शहरातील दोन्ही विद्यालय आहेत त्या विद्यार्थ्यांची गर्दी या रस्त्यावर असते त्यामुळे काही टार्गट मुले मुलींना त्रास देतात मुली बदनामीच्या भीतीने तक्रारही देत नाहीत.

# अकोल्यात भावपूर्ण वातावरणात 'गुरुपौर्णिमा महोत्सव' संपन्न!

▪अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

सनातन संस्थेच्या वतीने गुरुपौर्णिमा महोत्सव देशभरात ७७ ठिकाणी साजरा करण्यात आला. अकोल्यात जानोरकर मंगल कार्यालय, केशवनगर येथे हा महोत्सव भक्तिभावाने आणि राष्ट्रनिष्ठ भावनेने पार पडला.प्रारंभी श्री संजय ठाकूर व सौ प्रीती ठाकूर यांच्या हस्ते महर्षी व्यास व प.पू. भक्तराज महाराज यांचे प्रतिमा पूजन करण्यात आले.

सनातन संस्थेचे संस्थापक डॉ. जयंत आठवले यांचा साधना व शौर्य जागरण या संदर्भात संदेश वाचन सौ मंगला पांडे यांनी केले. 'सनातन राष्ट्र शंखनाद' या विषयावर प्रेरणादायी व्हिडिओ सादर करण्यात आला. नंतर रामराज्य स्थापनेसाठी संकल्प आणि सामूहिक नामजपयज्ञ घेण्यात आला.महोत्सवात श्री. अरविंद देठे (अध्यक्ष, स्वयंभू महादेव मंदिर, अंत्री मलकापूर)



यांनी 'युद्ध किंवा गृहयुद्ध यांप्रसंगी हिंदू संघटनांचे महत्त्व' या विषयावर विचार मांडले. त्यांनी सांगितले की, ङ्गसंघटनेतच खरी शक्ती आहे. संकटकाळात एकत्र येणं महत्त्वाचं आहे. संघटनाची सुरुवात घरापासून व्हावी.या वेळी हिंदुत्वासाठी कार्यरत श्री. रवि सोरटे गुरुजी यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी वयाच्या ७०व्या वर्षीही मुला-मुलींना विनामूल्य मर्दानी खेळ प्रशिक्षण देऊन शिवकालीन युद्धकलेला पुनर्जीवित केले आहे. तसेच शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन देखील आयोजित केले होते.महोत्सवात श्री राजू रामदास मंजुळकर उपाध्यक्ष विश्व हिंदू परिषद अकोला यांचा सत्कार करण्यात आला. मनोगत व्यक्त करताना त्यांनी सांगितले की गेल्या २४ वर्षापासून ते हिंदुत्वसाठी कार्य करीत आहेत. गोरक्षण, लव जिहाद यांच्या समस्या व केलेले कार्य सांगितले.या प्रसंगी हिंदू जनजागृती समिती अमरावती येथील श्री. सचिन वैद्य यांनी 'राष्ट्र आणि धर्म यांच्या रक्षणासाठी साधना आणि युद्धकाळातील कर्तव्ये' या विषयावर मार्गदर्शन केले.

ते म्हणाले, ङ्गअंतिम विजय धर्माचाच होतो, कारण भगवंत आणि गुरुतत्त्वाचा आशीर्वाद धर्माच्या रक्षणासाठी कार्य करणाऱ्यांवरच असतो. आज धर्मावर अंतर्गत व बाह्य आघात होत असून, हे केवळ राजकीय नव्हे तर धार्मिक आक्रमण आहे. त्यामुळे धर्मरक्षण ही काळाची गरज आहे.कार्यक्रमात दहावीतील गुणवंत विद्यार्थी श्री धनंजय खांदे (८९%), भक्ती कराळे (९४%) आणि ओम गोरे (९६%) यांचा सत्कार करण्यात आला.महोत्सवा शेवटी अधर्मी व धर्मांध यांचेकडून होणाऱ्या अन्याय व अत्याचार याला प्रत्येकाने , विशेषतः महिला वर्गाने कसे समोर जावे व स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत हिंदू जनजागृती समिती चे जिल्हा प्रतिनिधी श्री अमोल वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वसंरक्षण प्रात्यक्षिके दाखविण्यात आले. रोमहर्षक प्रात्यक्षिकाने उपस्थितांचे लक्ष वेधले.

सनातन संस्थे द्वारे प्रकाशित विविध विषयांवरील ग्रंथ , साहित्य उत्पादने आणि फलकांचे प्रदर्शन लावण्यात आले होते. त्यात धर्म, अध्यात्म, बालसंस्कार, आयुर्वेद, स्वसंरक्षण यांचा समावेश होता.महोत्सवात अनेक धर्मनिष्ठ , मंदिर विश्वस्त , अधिवक्ता , संघटनेचे प्रमुख , राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष व प्रतिनिधी, जिज्ञासू आणि साधक यांनी उपस्थित राहून आपले धर्म कर्तव्य पार पाडले. या कार्यक्रमाचा लाभ ४०० हून अधिक जिज्ञासू , धर्मप्रेमी , हिंदुत्वनिष्ठ व साधक यांनी घेतला.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९६००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम बोले फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# कॅलिडोस्कोप

## अपमानातून चार कोटींची देणगी !

मुलीने वारसा हक्कावरून केलेला अपमान सहन न झाल्याने लष्करातून निवृत्त झालेले जवान एस विजयन यांनी त्यांची चार कोटी रुपयांची संपत्ती एका मंदिराला दान केल्याची घटना समोर आली आहे. ही घटना तामिळनाडूच्या तिरुवन्नामलाई जिल्ह्यातील आहे. या जिल्ह्यातील अरुलमिगु रेनुगांबल अस्मान मंदिराला त्यांनी ही देणगी दिली आहे.

मुलीने वर्षानुवर्षे दुर्लक्ष केल्यामुळे आणि दुखावल्यामुळे आपण हा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. याआधी त्यांचे मुलीसोबत वारसा हक्कावरून अनेकदा वाददेखील झाले होते. मात्र वडिलांनी रागाच्या भरात ही संपत्ती मंदिराला दान केली. त्यानंतर आता कुटुंबीयांनी ही संपत्ती परत मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. निवृत्त लष्करी जवान विजयन हे अराणी शहराजवळ असणाऱ्या केशवपुरम या गावातील रहिवासी आहेत. ते त्यांच्या दोन मालमत्तांची कागदपत्रे घेऊन मंदिरात गेले होते. यामध्ये मंदिराजवळ असणारी एक मालमत्ता



तीन कोटींची असून दुसरी मालमत्ता एक कोटी रुपयांची आहे. मंदिरातील कर्मचाऱ्यांनी २४ जून रोजी दानपेटी उघडली असता त्यांना या दानपेटीत ४ कोटी रुपये किंमतीच्या मालमत्तेची मूळ कागदपत्रे मिळाली.

मंदिर प्रशासनाच्या अधिकाऱ्यांने सांगितले, की दर दोन महिन्यांनी आम्ही दानपेटी उघडून भाविकांनी दिलेले दान मोजतो. ही आमची नियमित परंपरा आहे. मंदिरात एकूण ११ दानपेट्या आहेत. अशाच एका मोजणीवेळी त्यांनी मंदिराच्या समोरच्या बाजूला ठेवलेली दानपेटी उघडली असता त्यांना त्यात नाणे आणि नोटांसोबतच मालमत्तेची मूळ कागदपत्रे मिळाली. त्यांना ही कागदपत्रे पाहून धक्का बसला. या कागदपत्रांसोबत एक चिठ्ठीदेखील त्यांना सापडली. त्यात ते स्वच्छेने ही संपत्ती मंदिराला दान करत असल्याचे म्हटले आहे. दरम्यान त्या ठिकाणी अशी घटना घडण्याची ही पहिलीच वेळ होती. त्यामुळे मंदिराच्या अधिकाऱ्यांनी सांगितले, की अशी कागदपत्रे दानपेटीत टाकून संपत्ती आपोआप मंदिराची होत नाही. दान करायचे असेल तर त्यांनी अधिकृतपणे विभागाकडे नोंदणी करावी.

## नशीबवान आई-वडील


मुलांना प्रगती करताना पाहण्याचा आनंद हा पालकांसाठी सर्वात मोठा असतो. प्रत्येक पालकांना त्यांचा मुलगा किंवा मुलगी आयुष्यात त्यांच्यापेक्षा मोठे नाव आणि स्थान मिळवते तेव्हा सार्वधिक आनंद होत असतो. असाच एक प्रसंग इंडिगो विमानात घडला. एक एअर होस्टेस मुख्य केबिन क्रू म्हणून विमानात नियुक्तीला असताना तिचे पालक या विमानात चढले. त्यावर तिची कृती भारावून टाकणारी आहे. तिच्या पालकांना पाहून एअर होस्टेस भावूक झाली.

विमानातील या दृश्यातून या मुलीचे तिच्या पालकांबद्दलचे प्रेम आणि आदर दिसून येतो. मुलीची प्रगती पाहून पालकांच्या डोळ्यात आनंद दिसून येतो. एअर होस्टेस फ्लाइटमध्ये प्रवेश करणाऱ्या प्रवाशांचे स्वागत करत असते. त्याच वेळी एअर होस्टेसची आई विमानात प्रवेश करते. आईला पाहून एअर होस्टेस आनंदी होते आणि तिच्या पाया पडते. त्यानंतर दोन्ही हात आई तिच्या डोक्यावर ठेवते. त्यानंतर तिचे वडील फ्लाइटमध्ये



चढतात. एअर होस्टेस त्यांच्याही पाया पडते. फ्लाइटमध्ये एअर होस्टेसच्या ड्रेसमध्ये आपल्या मुलीला पाहून दोन्ही पालक भावुक होतात.

## इथल्या रस्त्यांना नावंच नाहीत!




शहर असो किंवा गाव, प्रत्येक चौकाला, रस्त्याला वेगवेगळी नावं दिली जातात. भारतासारख्या देशात तर नावांवरून सतत वाद सुरू असतो. राजकारणी, स्वातंत्र्यसैनिक, विविध क्षेत्रातल्या कर्तबगार व्यक्ती यांची नावं रस्त्यांचा, चौकांना देण्याचा प्रघात आहे. अर्थात अशा नावांशिवाय कोणताही पत्ता पूर्ण होणार नाही. मात्र जर्मनीमधल्या एका ठिकाणच्या रस्त्यांना नावंच नाहीत. जर्मनीमध्ये हिलगर्मिसन नावाचं एक ठिकाण आहे. इथे गेल्यावर पत्ता कसा विचारायचा असा प्रश्न कोणालाही पडेल. इथे रहाणाऱ्या काही नागरिकांना या बिननावांच्या रस्त्यांमुळे बराच त्रास होतो. पत्ता काय सांगायचा असा प्रश्न त्यांना पडतो. याच कारणामुळे २०१९ च्या फेब्रुवारी महिन्यात इथे मतदानाचं आयोजन करण्यात आलं होतं. रस्त्यांना नावं द्यायची किंवा नाही याचा निर्णय मतदानाद्वारे होणार होता. इथल्या लोकांनी रस्त्यांना नाव न देण्याच्या बाजूने मतदान केलं. हिलगर्मिसन हे गाव १९७० च्या दशकात वसवण्यात आलं. इथल्या घरांचे पत्ते फक्त घर क्रमांक आणि गावाचं नाव एवढ्यापुरतेच मर्यादित आहेत. या गावाची लोकसंख्या अवघी २२०० इतकी आहे. मात्र या लोकांना नाव नसण्याची पद्धत पुढे सुरू ठेवायची आहे.

## चार आण्याची कोंबडी, बारा आण्याचा मसाला!

भारतात गाड्यांसाठी व्हीआयपी नंबर प्लेट्सची क्रेझ सवश्रुत आहे. कार किंवा बाईकचे मालक चांगली आणि त्यांना हव्या असलेल्या नंबरची नंबर प्लेट आपल्या गाड्यांना लावतात. त्यासाठी ते कारच्या किंमतीत पाच टक्के जास्त रक्कम खर्च करत असतात. मात्र टू व्हीलरसाठी व्हीआयपी नंबर मिळवण्यासाठी एका व्यक्तीने लाखो रुपये खर्च केल्याचे कधी तुम्ही ऐकले का? हो ते खरे आहे.




हिमाचल प्रदेशमध्ये सोलनच्या संजीव कुमार यांनी त्याच्या बँकेत असलेली एफडी मोडली. त्यांनी नवीन होंडा ॲक्टिव्हा या एक लाख रुपयाच्या स्कूटरसाठी व्हीआयपी नंबर प्लेटवर तब्बल १४ लाख रुपये खर्च केले. संजीव त्यांच्या ॲक्टिव्हाच्या व्हीआयपी नंबरमुळे संपूर्ण परिसरात सगळ्यांमध्ये चर्चेचा विषय ठरले आहेत.

एका व्यक्तीने एक लाख रुपयाची स्कूटर घेतली आणि १४ लाख रुपये हे फक्त व्हीआयपी नंबरसाठी खर्च केले. व्हीआयपी नंबर प्लेट एचपी २१सी-०००१ चे ते मालक आहेत.

नंबर प्लेटचा लिलाव

दरम्यान, त्यांचा मुलगा दिनेश कुमार म्हणतो, वडिलांना पूर्णपणे वेगळा नंबर हवा होता. त्यांनी ही गाडीची खास नंबर प्लेट मिळवण्यासाठी हिमाचल प्रदेशच्या परिवहन विभागाच्या अधिकृत वेबसाइटवर अर्ज केला आणि लिलाव ठेवण्यात आला. ऑनलाइन लिलावात शेवटी दोन जणांमध्ये स्पर्धा होती. दुसऱ्या व्यक्तीने १३.५ लाख रुपयांची बोली लावली होती; पण कुमार यांनी त्या नंबरसाठी ५०००० रुपये जास्त देऊन ती बोली जिंकली. ही नंबर प्लेट आता देशातील सगळ्यात महागडी नंबर प्लेट बनली आहे.




## सिंहासनावर बसा, भरपूर पैसे कमवा!

रशियाची राजधानी मॉस्कोमध्ये तयार करण्यात आलेलं एक सिंहासन सध्या चर्चेचा विषय ठरलं आहे. हे सिंहासन २.५ इंच बुलेटप्रूफ जॅकेटपासून तयार करण्यात आलं आहे. या सिंहासनाचं मुख्य वैशिष्ट्य म्हणजे काचेच्या आत असणाऱ्या नोटा. या नोटा सुमारे एक लाख डॉलर्स म्हणजे सात कोटी रुपये किंमतीच्या असल्याचं बोललं जात आहे. या सिंहासनावर सर्वसामान्य बसू शकतात. 'एक्स १० मनी थ्रोन' या नावाने हे सिंहासन ओळखलं जाणार आहे. रशियन पॉपस्टार ॲलेक्सी सर्गियेंको आणि उद्योजक इगोर राइबाकोव यांनी हे सिंहासन तयार केलं आहे. आता हे पैशांचं सिंहासन तयार करण्यामागचा नेमका उद्देश काय, असा प्रश्न कोणालाही पडू शकतो. या दोघांनी एका वेगळ्या उद्देशाने हे सिंहासन तयार केलं आहे. या सिंहासनावर बसल्यानंतर लोकांना पैशांचं महत्त्व कळेल आणि जास्तीत जास्त पैसे कमवण्याची प्रेरणा मिळेल, असं ॲलेक्सी आणि इगोरचं म्हणणं आहे. रशियातले लोक श्रीमंत व्हावेत, असं या दोघांना वाटतं. या सिंहासनावर बसल्यानंतर लोकांनी पैसे कमावण्याचा गांभिर्याने विचार करावा, अशी त्यांची अपेक्षा आहे.

## घोडी पळाली नवऱ्याला घेऊन!

लग्नाच्या हंगामात प्रत्येक वरात काहीतरी वेगळी असते. काही ठिकाणी नवरदेव हेलिकॉप्टरने येतो, तर काही फिल्मी शैलीत नाचतात. एक घटना मात्र थोडी वेगळीच आहे. नवरदेव घोडीवर बसला होता, बँड तालावर नाचत होते. घोडीदेखील संगीतावर हलकेच नाचत होती. पण नंतर उत्साहात एका खोडकर वऱ्हाडीन मोठा फटाका वाजवला. या मोठ्या



वाजत होता, नातेवाइक नाचत होते आणि सर्व काही शाही शैलीत सुरू होते. तथापि नंतर असे काही घडले ज्याचा कोणी विचारही केला नसेल. सगळ्यांचा नाच सुरू असताना एक फटाका मोठ्या आवाजात फुटला आणि घोडी वरासह गर्दी असलेल्या वरातीतून धावत सुटली. यामुळे काही काळ वरातीत गोंधळ उडाला.

लग्नाची मिरवणूक पूर्णपणे शाही शैलीत सजवलेली होती. वर पारंपारिक पोशाखात घोडीवर स्वार होता आणि वऱ्हडी मंडळी बँडच्या

आवाजाने घोडी खूप घाबरली आणि वराला घेऊन पळून गेली. घोडीचा वेग इतका होता की काही सेकंदात ती दिसेनाशी झाली. वराला खाली उतरण्याचीही संधी मिळाली नाही. काही लोकांनी धावत तिला पकडण्याचा प्रयत्न केला. पण घोडी फक्त धावत राहिली.

फटाक्यांच्या आवाजाने घोडी पळून गेली ही संपूर्ण घटना कोणीतरी मोबाईल कॅमेऱ्यात कैद केली. नंतर वर तिच्या पाठीवरून खाली पडला. घोडी मात्र हाती लागली नाही.

## जॉयनिंगच्या दिवशीच सोडली नोकरी!

कोणी नोकरीच्या शोधात असतो तेव्हा नोकरी मिळणे ही त्याच्यासाठी मोठी गोष्ट असते. पण नोकरीवर रुजू झाल्यावर आणि काम सुरू केल्यावर बरेचदा अनेक लोक निराश होतात. काम त्यांच्या अपेक्षेप्रमाणे नसते किंवा त्यांना ते काम आवडत नाही. बरेचदा लोक त्यांच्या इच्छा दाबून पगारासाठी नोकरी करत राहतात. तर काही लोक अशा परिस्थितीतून पुढे जातात आणि नोकरीचा राजीनामा देतात. पण लोक त्यासाठी थोडा वेळ घेतात, पण एका कर्मचाऱ्याने जॉइनिंगच्या दिवशीच नोकरी सोडली आहे.

नोकरी सोडल्यानंतर, या कर्मचाऱ्याने कंपनीच्या 'एचआर'शी संवाद साधला. तो आता 'सोशल मीडिया'वर व्हायरल होत आहे. कोणीही पहिल्या दिवशी नोकरीवर जातो तेव्हा पहिला दिवस फक्त कामाबद्दल जाणून घेण्यातच जातो. दोन-तीन दिवसांत एखाद्याला त्याचे काम व्यवस्थित समजते. पण 'सोशल मीडिया'वर व्हायरल होणारी बाब ही त्यापेक्षा वेगळीच आहे. येथे एका कर्मचाऱ्याने जॉइनिंगच्या दिवशी नोकरीचा राजीनामा दिला आहे. यानंतर, कंपनीच्या एचआरने त्या कर्मचाऱ्याशी बोलून नोकरीच्या पहिल्याच दिवशी राजीनामा देण्याचे कारण जाणून घेतले.

कर्मचारी आणि 'एचआर'मधील संभाषणाचा स्क्रीनशॉट 'सोशल मीडिया'वर व्हायरल होत आहे. त्यात कर्मचारी म्हणतो, की मी आता पुढे जाऊ शकत नाही. मग 'एचआर' याचे कारण विचारतो. उत्तरात कर्मचारी म्हणतो, 'मला हे काम माझ्यासाठी योग्य वाटले नाही.' मग एचआर विचारतो 'काय योग्य वाटले नाही, ते मला सांगाल का?' कर्मचारी म्हणतो, की कोणतेही काम एका दिवसात परिपूर्ण होत नाही. यानंतर 'एचआर' त्या कर्मचाऱ्याला सांगतो, 'तुम्हाला एका दिवसात काय समजले, तुम्हाला कामात काय आवडले




नाही?' मग कर्मचारी म्हणतो, 'मला काम अजिबात आवडले नाही.' यानंतर खुशी चौरसिया नावाच्या 'एचआर'ने तिच्या लिंक्डइन अकाउंटवर ही संपूर्ण घटना शेअर केली आहे. त्यात तिने लिहिले आहे, कोणीही एका दिवसात परिपूर्ण होत नाही. यासोबतच तिच्या पोस्टमध्ये तिने नोकरीत सामील होणाऱ्या लोकांसाठी विशेष सल्लाही दिला आहे.

## चहाबाज घोडा



चहा म्हणजे अनेकांसाठी जीव की प्राण. गरमागरम वाफाळता चहा समोर आल्याशिवाय अनेकांच्या दिवसाची सुरूवात होत नाही. या जगात चहाबाज माणसांची कमतरता नाही. पण लंडनमधल्या मर्सीसाइड पोलिसांच्या ताफ्यातला एक घोडा कमलीचा चहाबाज आहे. या घोड्याला चहाचं व्यसनच जडलं आहे, असं म्हटल्यास वावगं ठरू नये. जॅक नावाचा हा घोडा २० वर्षांचा आहे. गेल्या पंधरा वर्षांपासून तो नियमितपणे चहा पितो. जॅकला सकाळी तबेल्यातच चहा लागतो. चहा प्यायल्याशिवाय त्याला तरतरी येत नाही. जॅकच्या दिवसाची सुरूवातही होत नाही. चहा प्यायल्याशिवाय तो कामाला जात नाही. जॅक पुढच्या वर्षी निवृत्त होणार आहे. पाच वर्षांचा असल्यापासून जॅक चहा पितो. मालकाच्या कपमधला उरलेला चहा चाटायची सवय त्याला लागली होती. मग या चहाने त्याला वेडंच करून टाकलं. ही सवय आता त्याच्या अंगात भिनली आहे. जॅक जीभ कपात बुडवून चहा पितो. मर्सीसाइड पोलीसही त्याला नियमित चहा देतात. जॅकचे सगळे लाड पुरवतात. जॅकचे चोचले अजिबात कमी नाहीत. त्याला गरम किंवा सायीचा चहा चालत नाही. पूर्ण दुधाचा एक चमचा साखर आणि थोडं थंड पाणी घातलेला चहा त्याला आवडतो. पण चहात जास्त साखर असेल तर तो खूप खूश होतो. चहा पिणाऱ्या जॅकचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्याच्या या व्हिडिओला दोन लाख रुपयांपेक्षा जास्त लाईक्स मिळाले आहेत.

## ...आणि तिचं स्वप्नं पूर्ण झालं

प्रत्येक माणसाचं काही ना काही स्वप्न असतं. कोणाला घर घ्यायचं असं तर कोणाला गाडी खरेदी करायची असते. कोणी जगभ्रमंतीची स्वप्नं रंगवत असतं. आता ही स्वप्नं पूर्ण करायची तर गाठीला पैसे हवेत. पैशांची जमवाजमव करण्यासाठी लोक बरीच मेहनत करतात. विविध मार्गांनी खर्चात कपात केली जाते आणि अखेरीस हे स्वप्न पूर्ण होतं. हे स्वप्न पूर्ण झाल्याचा आनंद वेगळाच असतो. अमेरिकेतल्या टेक्सासमध्ये रहाणारी एड्रिना एडवर्डस 'डेनीस' रेस्टॉरंटमध्ये वेटरचं काम करते. एड्रिनाला गाडी घ्यायची होती. गाडी घेता यावी म्हणून ती कार्यस्थळी चालत जात असे. एड्रिनाच्या कामाचं ठिकाण तिच्या घरापासून जवळ नव्हतं. एड्रिनाला तब्बल २२ किलोमीटर अंतर कापावं लागायचं. रेस्टॉरंटमधून घरीही ती पायीच यायची. एड्रिना जवळपास पाच तास चालायची. या रेस्ट्रॉरंटमध्ये आलेल्या एका जोडप्याला एड्रिनाबद्दल कळलं. त्यांनी एड्रिनाचं स्वप्न पूर्ण करायचं ठरवलं. हे जोडपं रात्री पुन्हा आलं. त्यावेळी त्यांच्या हातात नव्या कोऱ्या गाडीची चावी होती. त्यांनी ही गाडी एड्रिनाला दिली. गाडी बघून एड्रिना खूप खूश झाली. पाश्चात्य देशांमध्ये 'थँक्स गिव्हिंग'ची परंपरा आहे. यानिमित्ताने आपल्याला गाडी




देण्यात आल्याचं एड्रिनाला वाटलं. या गाडीचे पैसे द्यायचे असतील तर गरजवंतांची मदत कर, असंही या जोडप्याने एड्रिनाला सांगितलं. या नव्या गाडीमुळे एड्रिनाचे कष्ट कमी होणार आहेत.

# राजकीय स्वार्थातून राज्यात हिंदी भाषेची सक्ती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

आज राज्यात अनेक समस्या भेडसावत असताना त्रिभाषा सूत्राची सक्ती करून भाषाविषयक राजकारण केल्या जात आहे. समोर येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका समोर ठेवून हिंदी भाषकांची राज्यात निर्मिती करून हिंदी भाषेची सक्ती म्हणजे केवळ मतांचे राजकारण आहे असा सूर हिंदीचे मराठीवर आक्रमण या टॉक शो मधून निघाला.

डॉक्टर गिरीश गांधी फाउंडेशन नागपूर व प्रेस क्लब नागपूर यांच्या संयुक्त विद्यमानातून आयोजित हिंदीचे मराठीवर आक्रमण या टॉक शोचे आयोजन प्रेस क्लब येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान तरुण भारतचे मुख्य संपादक शैलेश पांडे यांनी भूषविले. तर मंचावर डॉक्टर गिरीश गांधी फाउंडेशनचे अध्यक्ष श्रीकांत तिडके व सचिव श्रीराम काळे उपस्थित होते. या टॉक शोमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना चे नेते हेमंत गडकरी, ज्येष्ठ संपादक बाळ कुलकर्णी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलपती डॉक्टर पुरणचंद्र मेश्राम यांनी आपले विचार मांडले. यावेळी डॉक्टर गिरीश गांधी, दैनिक महासागर चे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक, उपस्थित होते.




## हिंदीचे मराठीवर आक्रमण या टॉक शोमधून निघाला सूर

अध्यक्षीय भाषणातून शैलेश पांडे यांनी मत मांडले की वाद हा भाषिक नाही तर मराठी भाषेवर झालेले आक्रमण आहे. महाराष्ट्रामध्ये व्यापार, उद्योग, नोकरीच्या संदर्भाने आलेले हिंदी भाषकांचे येथे बस्तान आहे. आणि या भाषेचे संक्रमण मराठी भाषेत झालेले आहे. भाषा निहाय प्रांतवर रचना झाल्यानंतर तिथली भाषा अवगत असणे ही त्या भाषेची अस्मिता आहे.

यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते हेमंत गडकरी म्हणाले की समोरचा कसा वागतो हे न बघता आमच्या पक्षाने छोटी काच जरी फोडली तरी त्याचा गवगवा होतो. सत्याचा आधार धरून आमच्या पक्षाने परराज्यातून आलेले लोंढे, टोल टॅक्स आणि आता हिंदीच्या सक्तीविरुद्ध आम्ही आवाज उठवत आहोत. राज ठाकरे आणि आमच्या पक्षाची भूमिका माध्यमांनी समजून घेणे गरजेचे आहे. आमच्या उमेदवारांना निवडूनच दिले जात नाही तर आमचे काम कसे दिसणार असे ते म्हणाले. यावेळी बाळ कुळकर्णी यांनी विचार मांडले की भाषा हा संस्कारांचा सहजीवनाचा व्यवहाराचा विचार आहे. सरकारने जेव्हा भाषाचे राजकारण केले तेव्हा हा वाद निर्माण झाली आहे. हिंदीची सक्ती म्हणजे केवळ सामान्य जनतेच्या भावनेला हात घालून आपली सत्ता काबीज करणे आहे असे परखड मत त्यांनी मांडले. यावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलपती डॉक्टर पूर्णचंद्र मेश्राम यांनी विचार मांडले की सहाव्या वगार्पासून शिकवली जाणारी हिंदी भाषा पहिल्या वगार्पासून सक्तिची करणे म्हणजे त्या सहा वर्षे बालकाचा भाषिक बलात्कार आहे. त्रिभाषा सुत्राच्या दुसऱ्या जीआर मध्ये हिंदी भाषा शिवाय दुसरी भाषा घ्यावयाची असल्यास किमान 20 विद्यार्थी असणे आवश्यक आहे शिवाय ही भाषा शिकविणारी शिक्षक नेमले जाणार नाही तर ऑनलाईन पद्धतीने भाषा शिकविले जाईल. मोफत शिक्षणाची योजना असताना शिक्षक नेमणे हे सरकारचे कर्तव्य आहे. सरकार जवळ शिक्षणासाठी पैसा नाही आणि हिंदीच्या साम्राज्यातून आपल्या सत्तेची पोळी भाजायची आहे. असे परखड मत त्यांनी यावेळी मांडले. या टॉक शोमध्ये रेखा दंडिगे घिया व डॉक्टर कोमल ठाकरे यांनी संवाद साधला तर आभार प्रदर्शन स्वाती हुड्डार यांनी केले.

# एमपीएससी परीक्षेत सोलापूरचा तन्मय कटुळे राज्यात पहिला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे १७ डिसेंबर, २०२३ रोजी मुंबईसह छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर, नाशिक व पुणे जिल्हाकेंद्रांवर घेण्यात आलेल्या महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा-२०२३ मधील लिपिक-टंकलेखक या संवगार्तील एकुण २७८ नियुक्ती प्राधिकारी कार्यालयांचा अंतिम निकाल जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार एकूण ६५१९ उमेदवार विषयांकित पदाकरिता शिफारसपात्र ठरले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील तन्मय तानाजी कटुळे हे राज्यातून प्रथम आले आहेत.

मागासवर्गवारीमधून पुणे जिल्ह्यातील किसवे किशोर चंद्रकांत हे राज्यात प्रथम आले आहेत तर महिला वर्गवारीमधून सांगली जिल्ह्यातील गावडे दुर्गा विजयराव या राज्यात प्रथम आल्या आहेत. अंतिम निकालातील ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. या संवर्गाकरिता प्रतीक्षायादी कार्यान्वित राहणार नाही. अधिक माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे आयोगाने कळविले आहे.

एमपीएससीच्या वतीने आठ हजारांहून अधिक पदांसाठी जानेवारी २०२३ मध्ये गट-क लिपिक टंकलेखक पदासाठी जाहिरात देण्यात आली होती. यानंतर उमेदवारांची एप्रिल २०२३ मध्ये पूर्व परीक्षा, डिसेंबर २०२३ मध्ये मुख्य परीक्षा तर जुलै २०२४ मध्ये टंकलेखन कौशल्य चाचणी परीक्षा घेण्यात आली. परंतु, कौशल्य चाचणीच्या पहिल्याच दिवशी तांत्रिक गोंधळ उडाल्याने १ ते ३ जुलैपर्यंतची परीक्षा रद्द करण्यात आली होती. त्यानंतरही पवई, मुंबई येथील परीक्षा केंद्रावर १० आणि ११ जुलै रोजी इंग्रजी टंकलेखन कौशल्य चाचणी देत असताना कीबोर्डमध्ये अडचणी आल्या. किबोर्डमधील बॅकस्पेस, शिफ्ट बटन आणि अन्य बटनांमध्ये टंकखेलन करताना अडचणी येत होत्या. अनेकदा स्पेस बटन पुढे जात नव्हती तर कधी बटन दबत नव्हती. विद्यार्थ्यांनी आयोगाच्या नियमावलीनुसार परीक्षा घेणाऱ्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांना कीबोर्ड बदलून देण्याची विनंती केली.

### बच्चू कडूंच्या सातबारा कोरा यात्रेला

# उद्धव ठाकरेंचा पाठिंबा

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १३ :

शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष आणि माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी १३८ किलोमीटरची पदयात्रा काढली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेपाठोपाठ आता शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षानेही या पदयात्रेला पाठिंबा दिला आहे. शिवसेना ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव हे सोमवारी १४ जुलै रोजी यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातील अंबोडा येथे आयोजित समारोपीय सभेला उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती प्रहार जनशक्ती पक्षातर्फे देण्यात आली आहे.

देशाचे माजी कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव पापळ येथून प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली ७/१२ कोरा कोरा कोरा यात्रेला गेल्या ७ जुलै पासून सुरुवात झाली. चिलगव्हाण या स्व. साहेबराव करपे यांच्या गावामध्ये या यात्रेची सांगता होणार आहे.

पहिल्या शेतकरी आत्महत्येची नोंद या गावी झाली होती. सुमारे १३८ किमीच्या या यात्रेत



शेतकरी, विविध पक्षातील कार्यकर्ते भर पावसातही मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.

मनसेचे नेते बाळा नांदगावकर हे गुरूवारी १० जुलै रोजी यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा तालुक्यातील लालखिंड येथे बच्चू कडू यांच्या पदयात्रेत सहभागी झाले होते. आता शिवसेना ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पाटील हे देखील सोमवारी सकाळी ११ वाजता यवतमाळ जिल्ह्यातील अंबोडा येथे होणाऱ्या समारोपीय सभेला उपस्थित राहणार आहेत.

# इगतपुरी येथे मनसेचे तीन दिवसीय शिबिर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :

हिंदी सक्तीविरोधातील यशानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. सोमवारपासून इगतपुरी येथे मनसेचे तीनदिवसीय शिबीर होणार आहे. मात्र, शिबिर कुठे होणार, याची गुप्तता पाळली आहे. या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी शनिवारी पक्षाचे नेते, सरचिटणीस, शहरप्रमुख आणि विभाग अध्यक्षांना फर्मान जारी केले. सोमवारी सकाळी १० वाजता कपड्यांची बॅग घेऊन शिवतीर्थावर हजर राहा, त्यानंतर दोन दिवसांसाठी मुंबईच्या बाहेर कार्यशाळेसाठी जायचे असून, याबद्दल कुठेही बोलू नये, अशी



तंबीही त्यांनी पक्षातील पदाधिकाऱ्यांना दिली आहे अशी माहिती सूत्रांनी दिली.

सोमवारी ते बुधवार (१४ ते १६ जुलै) इगतपुरी येथे विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत आगामी निवडणूक रणनीती, मराठी अस्मिता, स्थानिक मुद्दे, पक्षशिस्त आणि संघटन बळकटी यावर राज ठाकरे थेट मार्गदर्शन करणार आहेत. यामुळे राज ठाकरे यांनी नेते पदाधिकाऱ्यांना तीन दिवसांच्या तयारीसह येण्यास सांगितले आहे.

राज्य सरकारने काही दिवसांपूर्वीच राज्यातील शालेय शिक्षणात हिंदी सक्तीचा निर्णय घेतला होता. या निर्णयाला मनसेने केलेल्या जोरदार विरोधानंतर हा निर्णय रद्द करण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला होता. मनसेने पुकारलेल्या या आंदोलनात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षही मैदानात उतरला होता. त्यानंतर दोन्ही पक्षाकडून विजयी मेळावा आयोजित करण्यात आला. त्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे एकत्र एका मंचावर आले होते.

# ठाकरे बंधूंच्या विरोधात याचिका दाखल करणार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :

गुणरत्न सदावर्ते यांचा इशारा



हिंदी भाषेचा इतका तिरस्कार असेल तर उद्धव ठाकरे यांनी 'दोपहरचा सामना' बंद करावा, अशी मागणी ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी केली आहे. हिंदी भाषा शिकवण्या विरोधात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या भूमिकेला त्यांनी विरोध केला आहे. राज्यामध्ये तृतीय भाषा म्हणून हिंदी लागू करण्यात यावी. यासाठी तसेच ठाकरे बंधूंच्या विरोधात आपण पुढच्या आठवड्यात न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे देखील सदावर्ते यांनी सांगितले आहे. या संदर्भात बोलताना गुणरत्न सदावर्ते म्हणाले की, देशाला तोडणाऱ्यांनी राज्यात दोन कोटी हिंदी भाषिक असल्याचे लक्षात ठेवावे. सात कोटी बहुभाषिक होण्यास इच्छुक आहेत तर दोन कोटी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे सारखे आहेत. मालदीव मध्ये देखील हिंदी भाषा अनिवार्य असल्याचे राज ठाकरे यांनी लक्षात घ्यावे.

# 'त्या' एसटी ड्रायव्हर, कंडक्टरचे निलंबन

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १३ :

पंढरपूर-अकोट एसटी बस चालक व वाहकाने मद्यधुंद अवस्थेत चालवल्याचा धक्कादायक प्रकार प्रवाशांच्या सतर्कतेमुळे बीड जिल्ह्यात उघडकीस आला होता. या प्रकरणी बीड पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. आता एसटी विभागाने देखील कठोर पावले उचलली आहेत. मद्यप्राशन करून बस चालवणाऱ्या चालक आणि वाहकाला निलंबित करण्यात आले आहे. त्यांची चौकशी केली जात आहे. मद्यधुंद अवस्थेत चालक व वाहकाने बस चालवण्याच्या बेपर्वाईमुळे तब्बल ३७ प्रवाशांचा जीव धोक्यात आला होता.

वारकऱ्यांना पंढरीची वारी घडण्यासाठी दरवर्षी एसटी महामंडळाकडून विशेष नियोजन केले जाते. राज्यभरातून पंढरपूरसाठी विशेष गाड्या सोडण्यात येतात. अकोला जिल्ह्यातून सुद्धा पंढरपूर यात्रेसाठी नियोजन करण्यात आले होते. अकोट आगाराची एमएच-१४ - ६१४० क्रमांकाची बस पंढरपूरला वारकऱ्यांना घेऊन गेली होती. मात्र, ही बस परत येत असतांना एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ३७ प्रवाशांच्या जीवावर हा प्रवास उठला होता.

पंढरपूरवरून वारकऱ्यांना घेऊन बस अकोटकडे परत येण्यासाठी दुपारी ४ वाजता निघाली होती. चालक संतोष रहाटे आणि वाहक संतोष झालटे हे दोघे बसमध्ये कर्तव्यावर होते. बसमध्ये ३७ प्रवासी प्रवास करीत होते. त्यात महिला, पुरुष तसेच दोन लहान मुलांचा देखील समावेश होता.

बीड-अंबड मार्गावर चालक आणि वाहक मद्यधुंद अवस्थेत असल्याचा संशय प्रवाशांना आला. दोघांचीही वागणूक विचित्र होती. दारूच्या नशेत वाहक अक्षरशः बसमध्ये खाली पडला होता, तर चालकाला देखील बस चालवणे अत्यंत अवघड जात होते. प्रवाशांनी दोघांना हटकले. मात्र, ते ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते.

अखेर प्रवाशांनी एसटी प्रशासन व पोलिसांशी संपर्क साधला. काही प्रवाशांनी आपल्या नातेवाईकांना देखील या प्रकाराची माहिती दिली. बीड पोलिसांनी याची तत्काळ दखल घेतली. एसटी बस थांबवून मद्यधुंद अवस्थेतील चालक व वाहकाला पोलिसांनी ताब्यात घेतले.

### अजित पवारांचे जनसंपर्क अधिकारी

# संजय देशमुख यांचे निधन

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १३ :



माहिती व जनसंपर्क विभागातील वरिष्ठ सहाय्यक संचालक आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे जनसंपर्क अधिकारी संजय देशमुख (५५ वर्षे) यांचे शनिवारी (दि.१२) हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने पत्रकारिता आणि शासकीय जनसंपर्क क्षेत्रातील शांत, संयमी, संवेदनशील आणि अभ्यासू व्यक्तिमत्त्व हरपले आहे. संजय देशमुख हे गेल्या पंधरा वर्षांपासून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत होते. आपल्या संयमित आणि प्रभावी कामकाजामुळे त्यांनी प्रशासन व प्रसारमाध्यमांमध्ये दुवा म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडली.

पत्रकारितेतील कारकीर्दीची सुरुवात त्यांनी मुंबई दिनांक आणि दैनिक सकाळ या माध्यम समूहातून केली होती. माध्यमांतील अनुभवामुळेच त्यांच्या शासकीय जनसंपर्क कार्यात व्यावसायिकता आणि सुसूत्रता होती. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी व मुलगी असा परिवार आहे. सोमवार दि १४ रोजी सकाळी दादर येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

संजय देशमुख यांच्या निधनानंतर अजित पवार यांनी दुःख व्यक्त केले आहे. ते म्हणाले, मागील दहा वर्षांहून अधिक काळ माझे जनसंपर्क अधिकारी म्हणून उत्कृष्टपणे काम पाहणारे श्री. संजय देशमुख यांच्या आकस्मिक निधनाने अतीव दुःख झाले, असे अजित पवार म्हणाले.

# आप्पासाहेब के.पाटील यांना देण्यात आलेली बढती रद्द करून कारवाई करण्यात यावी

## देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडेंची प्रधान सचिवाकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी
देसाईगंज, दि. १३ :

तहसील कार्यालय देसाईगंज जिल्हा-गडचिरोली येथील पुरवठा विभागात तत्कालीन निरिक्षण अधिकारी (पुरवठा) या पदावर कार्यरत आप्पासाहेब कल्याणराव पाटील यांना सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी म्हणून पदोन्नती देण्यापुर्वी विभागीय आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक पुरवठा/कार्या १६(१)/कावि-५१६/२०२३ दि.१० नोव्हेंबर २०२३ नुसार पाटील यांचे विरुद्ध मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ स्विकारणे प्रकरणी तात्काळ निलंबित करण्यासंदर्भात कारवाई प्रस्तावित होती. असे असतांना पाटील यांना पदोन्नती संदर्भात शासन आदेश क्रमांक-पदोन्न-२०२३/प्र.क्र.२०४/ना.पु.१५ दि.२५ जानेवारी २०२४ नुसार हिंगोली येथे सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. आप्पासाहेब पाटिल हे देसाईगंज तहसील कार्यालयात निरिक्षण अधिकारी पदावर कार्यरत असतांना निकृष्ठ तांदुळ स्विकारणे प्रकरणी दोषी आढळून आले असल्याने त्यांना देण्यात आलेली बढती यथाशिघ्र रद्द करून प्रस्तावित निलंबनाच्या कारवाई नुसार कारवाई करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी राज्याच्या अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.

दिलेल्या तक्रारीत कऱ्हाडे यांनी म्हटले आहे की आप्पासाहेब पाटील हे आठ वषार्पासून तहसील कार्यालय देसाईगंज (वडसा) जिल्हा-गडचिरोली येथे कार्यरत असतांना त्यांचे इतरत्र स्थानांतरण न करता एक वर्षे मुदतवाढ देण्यात आली होती. चौकशीत सन २०१८-१९ मध्ये मायाश्री राईस इंडस्ट्रीज देसाईगंज यांनी पुरवठा केलेल्या निकृष्ठ तांदुळ प्रकरणी पाटील यांना चौकशी समितीने दोषी ठरविले होते.त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी त्यांचे पत्र क्रमांक पत्रक्र./ पुरवठा/ कार्या-११/अ.का.३/कावि/ २०३/१८ दि. ३० नोव्हेंबर २०१८ रोजी विभागीय आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांना अप्पासाहेब के. पाटील, निरिक्षण अधिकारी तहसील कार्यालय देसाईगंज यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) १९७९ अन्वये कारवाई करण्याची शिफारस केली होती.

दरम्यान राजुरा विधानसभा क्षेत्राचे तत्कालीन आमदार सुभाष धोटे यांच्या तक्रारीवरून अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांनी उपायुक्त (पुरवठा)नागपूर विभाग नागपूर यांना आप्पासाहेब पाटील यांनी मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ स्विकारणे मध्ये केलेल्या गैरव्यवहार प्रकरणी कारवाई करण्याकरीता प.क्र.तक्रार-४०२३/प्र.क्र.१०१/नापु.-१५ दि.१४ ऑगस्ट २०२३ रोजी आदेश दिले होते.

त्यानुसार उपायुक्त (पुरवठा)नागपूर यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक पुरवठा/कार्या १६ (१)/कावि-३१६/२०२३ दि.१० नोव्हेंबर २०२३ रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी गडचिरोली यांना पाटीलला मानवी खाण्यास अयोग्य तांदुळ स्विकारणे मध्ये गैरव्यवहार प्रकरणी तात्काळ निलंबित करण्याकरीता त्यांचे विरूद्ध गैरशिस्तीचे किंवा गैरवर्तणुकिच्या दोषारोपाचा गोषवारा जिल्हाधिकारी गडचिरोली यांचे मान्यतेने परिशिष्ट १ ते ४ अभिप्रायासह सादर करण्याचे आदेश दिले होते.

# फायर मॅन घडविणारे कळमना प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्र

## विदर्भातील एकमेव प्रशिक्षण केंद्र

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

नागपूर महानगरपालिकेच्या कळमना येथील प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्र फायर मॅन घडविणाऱ्या एका महत्त्वाच्या संस्थेच्या रुपात उदयास आले आहे. या प्रशिक्षण केंद्रातून गेल्या ९ वर्षात शेकडो उमेदवारांना फायरमॅनचे प्रशिक्षण मिळाले असून, अनेक ठिकाणी हे उमेदवार आपली सेवा देत आहेत. याशिवाय अग्निशमन जवानांना अधिक दर्जेदार प्रशिक्षण मिळावे, म्हणून मनपातर्फे नवीन जलतरण तलाव बांधला आहे. या जलतरण तलावाचे लोकार्पण राज्याचे मुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. विदर्भातील महानगरपालिकेतर्फे संचालित होणारे हे एकमेव अग्निशमन प्रशिक्षण केंद्र आहे.




मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांच्या मार्गदर्शनात मुख्य अग्निशमन अधिकारी तुषार बाराहाते यांच्या नेतृत्वात अग्निशमन विभागात अत्याधुनिक सेवा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. कळमना येथील प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्रात अग्निशमन जवानांना दर्जेदार प्रशिक्षण देण्यसाठी नवीन जलतरण तलाव तयार केल्याने अग्निशमन विभागाला अधिक बळ मिळाले आहे.

**विदर्भातील महानगरपालिकेचे एकमेव केंद्र**

नागपूर व विदर्भातील उमेदवारांना मुंबई, पुणे, ठाणे येथे प्रशिक्षणासाठी जावे लागत असे. या नवीन प्रशिक्षण केंद्रामुळे विदर्भातील विद्यार्थ्यांना इतरत्र ठिकाणी जाण्याची गरज भासत नाही. या प्रशिक्षण केंद्रामुळे विदर्भात फायर मॅन करिअर म्हणून निवड करणाऱ्या उमेदवारांना पंख दिले आहे.

नागपूर महानगरपालिकेने शहरातील आगीच्या घटनांवर तसेच आपत्कालिन स्थितीवर अधिक प्रभावीपणे नियंत्रण मिळवण्यासाठी महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. शहराच्या वर्दळीच्या ठिकाणी, बाजारातील अरुंद रस्ते असलेल्या वस्त्यातील आगीच्या घटनांवर त्वरित नियंत्रण आणण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ असणे आवश्यक आहे. ही गरज लक्षात घेऊनच मनपातर्फे प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्राची सुरुवात ७ नोव्हेंबर २०१६ करण्यात आली. राज्यभरातील अग्निशमन दलाच्या जवानांना प्रशिक्षण देण्याचे काम प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्र करत आहे. गेल्या ९ वर्षात १४ तुकड्यांच्या प्रशिक्षणातून शेकडो उमेदवारांना दर्जेदार प्रशिक्षण मिळाले आहे.

या प्रशिक्षण केंद्राचे क्षेत्रफळ १०८८३.७२ चौ.मी असून त्यापैकी २४२.८२० चौ.मी जागेवर प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्र उभारण्यात आले आहे. प्रशिक्षण केंद्राची इमारत २ मजली असून यात उपमुख्य अग्निशमन अधिकारी, व प्रशिक्षण केंद्राचे मुख्य पर्यवेक्षक यांचे कार्यालय, विश्राम कक्ष, कॅन्टीन, स्टोअर रूम, प्रशिक्षणार्थी उमेदवारांकरीता २ डॉरमेट्री, मेस व क्लास रुम आहेत. प्रशिक्षणार्थ्यांकरीता कवायत व प्रात्याक्षिके करीता पटांगण, त्याचबरोबर प्रशिक्षणार्थ्याकरीता १ ड्रिल टावर सुद्धा उपलब्ध करून देण्यात आले आहे.

प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्रात येण्यापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबईतर्फे उमेदवारांची शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात येते. यात उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची १०० गुणांची परीक्षा घेतली जाते. या परीक्षेत उर्त्तीण झालेल्या उमेदवारांना नागपुरातील प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्रासह राज्यातील इतर प्रशिक्षण केंद्रात पाठविले जाते.

नागपुरातील मनपाच्या प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्रात एकाच वर्षी जानेवारी ते जुलै आणि जुलै ते डिसेंबर दरम्यान दोन बॅच चालतात. सहा महिन्याच्या प्रशिक्षणात उमेदवारांना अग्निशमन विभागाशी संबंधित सर्वच प्रशिक्षण दिले जाते. या सहा महिन्यात प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांची महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबईतर्फे परीक्षा घेतली जाते. या परीक्षेत उर्त्तीण झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ प्रमाणपत्र दिले जाते. विशेष असेकी देशात कुठेही अग्शिनम विभागात नोकरीची संधी उपलब्ध असल्यास या प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाते अशी माहिती प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख मो. अकलिम करीम शेख यांनी दिली.

# अल्पवयीन मुलीवर बलात्कार

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १३ :

पुण्याच्या आळंदी येथे एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अहिल्यानगर येथील एका तरुणीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार करण्यात आला आहे. पीडित तरुणीने ११२ या हेल्पलाइन क्रमांकावर फोन करून पोलिसांना माहिती दिल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले. या प्रकरणी ५ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यात एका महिला कीर्तनकाराचा समावेश असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

पीडित तरुणी अहिल्यानगर जिल्ह्यातील असून, गेल्या महिन्यात, म्हणजेच २ जून रोजी, तिचे अपहरण करण्यात आले होते. तिला आळंदी येथील केळगाव रोडवर असलेल्या मुलींच्या एका खासगी वारकरी शिक्षण संस्थेमध्ये जबरदस्तीने डांबून ठेवण्यात आले होते. या कालावधीत तिच्यावर सतत बलात्कार करून लग्नासाठी दबाव टाकला जात होता. या प्रकरणी पीडित तरुणीने शेवगाव पोलिस ठाण्यात पाच जणांविरुद्ध तक्रार दिली आहे. २ जून रोजी पीडित तरुणी तिच्या घरी एकटीच होती. त्यावेळी तिच्या ओळखीच्या कीर्तनकार सुनिता आंधळे तिच्या घरी आल्या. एका काळ्या चारचाकी गाडीत तिला ढकलण्यात आले. वारंवार बलात्कार करून लग्नासाठी दबाव टाकला जात होता.